CMYK


४२ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT



सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २५५ । पाने १२+८ । किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# 'तरुण भारत'वर शुभेच्छांचा वर्षाव!












**दैनिक 'सोलापूर तरुण भारत'च्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, आ. सुभाष देशमुख, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सु.स. देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. प्रकाश महानवर, 'प्रिसिजन'चे यतिन शहा, अश्विनी रुग्णालयाचे बिपीनभाई पटेल, श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, माजी आ. दिलीप माने.**

## ४२ वर्षांच्या वाचकसेवेचा करण्यात आला गौरव

## विविध क्षेत्रातील मान्यवरांची जमली होती मांदियाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

राष्ट्रीय विचाराचे दैनिक म्हणून सर्वदूर परिचित असलेल्या दै.'सोलापूर तरुण भारत'च्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवार, दि.११ ऑगस्ट २०२६ रोजी होटगी रोडस्थित दैनिक तरुण भारत प्रेसच्या पाठीमागे असलेल्या दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मान्यवरांनी आवर्जून उपस्थित दर्शवत शुभेच्छांचा वर्षाव केला. दैनिक 'सोलापूर तरुण भारत' पत्रकारितेतील एक मानदंड ठरला आहे, असे सांगत दैनिक 'सोलापूर तरुण भारत'कडून चार दशकाहून अधिक काळापासून तेही अखंडितपणे सुरु असलेल्या वाचकसेवेची आणि दि.१ ऑगस्ट २०२६ पासून काढण्यात आलेल्या पुरवण्यांचे मुक्तकंठाने कौतुक करण्यात आले. प्रिंटींग क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या 'प्रिसिजन प्रिंटस्'च्या ग्राहकसेवेचाही गौरव करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची जणू मांदियाळी जमली होती.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी आमदार दिलीप माने, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते, भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, सहाय्यक आयुक्त विनोद कुलकर्णी, कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर, प्र. कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा, अ‍ॅड.रामभाऊ देशपांडे, सु.स. देशमुख अ‍ॅड.धनंजय माने, अ‍ॅड.मिलींद थोबडे, अ‍ॅड. जयदीप माने, अ‍ॅड. श्रीनिवास कटकूर, अ‍ॅड. भारत कट्टे, अ‍ॅड. बसवराज सलगर, 'शिवस्मारक'चे आर.जी. बंकापुरे, होटगी रोड औद्योगिक वसाहतच्या उपाध्यक्षा सुवर्णा पेठे, भाजपाचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, राम तडवळकर, शहाजी पवार, युवा नेते मनिष देशमुख, 'प्रिसिजन'चे यतीन शहा, डॉ. सुहासिनी शहा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संतोष कुलकर्णी, अश्विनी रुग्णालयाचे बिपीनभाई पटेल, अशोक लांबतुरे, श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, विभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र टाकणे, पोलिस निरीक्षक कुंदन गावडे, मनपा विधी समितीचे सभापती सत्यजित वाघमोडे, मंड्या व उद्यान समितीचे सभापती राजशेखर पाटील, नगरसेवकद्वय ज्ञानेश्वर म्याकल, किसन जाधव, अमोल शिंदे, अजय पोन्नम, ऋषिकेश मेट्रे, अक्षय अंजिखाने, नगरसेविका श्रीकांचना यन्नम, श्रीदेवी फुलारे, अर्चना वडनाल, संगीता जाधव, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघम्चे डॉ.सूर्यप्रकाश कोठे, हेडगेवार रक्तपेढीचे मिलींद फडके, अ‍ॅड.भारत कट्टे, अ‍ॅड.बसवराज सलगर, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, डॉ.सतीश महामुनी, दयानंद महाविद्यालयचे डॉ.विजयकुमार उबाळे, ह.दे.चे प्रशालेचे सुरेशबाबू मंकणी, सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक महादेव न्हावकर, जि.प.सदस्य नेताजी खंडागळे व दयानंद शिंदे, महापालिकेचे क्रीडाधिकारी नजीर शेख, डॉ. श्रीकांत येळेगांवकर, गुलचंद व्यवहारे, दिलीप दुलंगे, माधव देशपांडे, हाजीमलंग नदाफ, मनीष सलगर, राजकुमार सलगर, नागेश सरगम, अभिषेक चिंता, अंबादास बिंगी, बाशाभाई शेख, सुधा अळ्ळीमोरे, कविता घोडके, पतसंस्था फेडरेशनचे दिलीप पतंगे, नरेंद्र गुंडेली, तिपण्णा गणेरी, किसन आडम, गीता पाटोळे, सनतकुमार बंडी, ज्ञानेश्वर संगा, गायक दीपक कलढोणे, उच्च शिक्षणचे विभागीय सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव, पद्माकर कुलकर्णी, यशवंत इंदापुरे, पद्मशाली शिक्षण संस्थेच्या संचालिका संगीता इंदापुरे, अविनाश महागांवकर, विठ्ठल बडगंची, ज्येष्ठ पत्रकार राजा माने, नारायण कारंजकर, अनिल कुलकर्णी, दशरथ वडतीले, महेश रामदासी, विजयकुमार पिसे, श्रीकांत कांबळे, रमेश बसाटे, अविनाश कुलकर्णी, व्यंकटेश पटवारी, अभय दिवाणजी, शांतकुमार मोरे, राजकुमार नरुटे, सुंद्रीवादक जाधव, आशुतोष नाटकर, नागेश दंतकाळे, स्वाती पुंजाल, श्रीकांत डांगे, कुमुद अंकारम, कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, सचिव राजेंद्र गिड्डे, जनसेवा पक्षाचे श्रीनिवास यन्नम-कामटे, डॉ.व्यंकटेश मेतन, बाळासाहेब वाघमारे, पप्पू गायकवाड, विद्या सिंगम, ममता तलकोकुल, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते हाजीमलंग नदाफ, एम. शफी, मरगू जाधव, राजीव देसाई, दशरथ गुरव, संतोष खेंडे, प्रा.राजू प्याटी, सुमूख गायकवाड, प्रमोद चुंगे, प्रकाश कंपली, विजय तडसरे, डॉ. उज्वल मलजी, नंदकुमार जगधने, सुनील भालेराव, प्रकाश केकडे, शोभना सागर, चन्नवीर चिट्टे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### भारतमाता प्रतिमापूजन

दैनिक तरुण भारतच्या वर्धापनदिन सोहळ्याचा प्रारंभ दै.तरुण भारतचे समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, प्रकाशक दिलीप दुलंगे यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आला. यावेळी संचालक तथा पेठे फुडस्चे चैतन्य पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, होटगी रोड औद्योगिक वसाहतीच्या उपाध्यक्षा तथा पेठे फुडस्च्या सुवर्णा पेठे, 'भाजपा'चे ज्येष्ठ नेते राम तडवळकर, तरुण भारतचे सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायनी, मराठवाडा विभाग प्रमुख राजाराम मस्के, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, मुख्य वरिष्ठ उपसंपादक श्रीनिवास गाजूल, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादक आरती कुसेकर, विकास चाटी, मयुरी तारे, किरण बनसोडे, मकरंद ढोबळे, यशवंत गुरव आदी उपस्थित होते.



# ४२ वर्षांच्या समृध्द वाटचालीचा उत्सव ठरला अविस्मरणीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

प्रबोधन, लोकशिक्षण आणि समाजाभिमुख पत्रकारितेची ४२ वर्षांची समृध्द परंपरा जपणाऱ्या दैनिक सोलापूर तरुण भारतचा वर्धापन दिन सोहळा अविस्मरणीय असा उत्सव ठरला. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, धार्मिक, औद्योगिक यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर, वाचक, हितचिंतक आणि जाहिरातदार मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.



नेटके नियोजन, प्रसन्न वातावरण, मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती यामुळे सोहळ्याला विशेष रंगत आली. काही मान्यवरांनी पुस्तके तर काहींनी रोपे भेटीदाखल देत अनुक्रमे वाचन व वृक्षारोपण चळवळीचे महत्व अधोरेखित केले. दैनिक सोलापूर तरुण भारतचे समूह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, संचालक चैतन्य पेठे यांनी शुभेच्छांचा स्वीकार केला.

*** प्रबोधन आणि लोकशिक्षणाची चळवळ**

यावेळी उपस्थितांनी दैनिक सोलापूर तरुण भारतच्या गेल्या ४२ वर्षांच्या समृध्द वृत्तकार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. या प्रदीर्घ वाटचालीतील विविध आठवणींना उजाळा देताना 'तरुण भारत'ने केवळ वृत्तपत्र म्हणून नव्हे, तर प्रबोधन आणि लोकशिक्षणाची चळवळ म्हणून आपली भूमिका बजावली, अशा भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केल्या.

*** अनेक घडामोडींचा साक्षीदार**

सोलापूरच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, क्रीडा आणि औद्योगिक क्षेत्रातील अनेक घडामोडींचा साक्षीदार राहिलेल्या 'तरुण भारत'ने सामान्य माणसाच्या प्रश्नांना सातत्याने व्यासपीठ दिले. बदलत्या काळानुसार पत्रकारितेचे स्वरूप बदलत असतानाही वाचकांशी असलेले विश्वासाचे नाते कायम राखण्यात वृत्तपत्राला यश आले, असा गौरवपूर्ण सूर यावेळी उमटला.

*** विश्वासार्हता, सातत्य आणि समाजाभिमुख पत्रकारिता**

विश्वासार्हता, सातत्य आणि समाजाभिमुख पत्रकारिता या त्रिसूत्रीच्या बळावर दैनिक तरुण भारतने वृत्तपत्रसृष्टीत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. ४२ वर्षांची वाटचाल ही केवळ एका वृत्तपत्राची नव्हे, तर वाचकांशी निर्माण झालेल्या विश्वासाच्या नात्याची कहाणी असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

*** 'तरुण भारत'ला मिळाली नवी उर्जा**

वृत्तपत्रसृष्टीतील दैनिक तरुण भारत हा एक मानदंड आहे, असा गौरवपूर्ण उल्लेखही विविध मान्यवरांनी आपल्या चर्चेतून केला. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी दिलेल्या शुभेच्छांमुळे 'तरुण भारत'च्या पुढील वाटचालीला नवी उर्जा मिळाली.

*** राजकीय गप्पा ठरल्या रंगतदार**

दै.सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिन सोहळ्यास आमदार, नगरसेवक, राजकीय पक्षसंघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्र आले होते. यानिमित्ताने सोलापूर शहर-जिल्ह्यासह राज्य व देशपातळीवरील राजकीय घडामोडींविषयीच्या गप्पा रंगतदार ठरल्या.

*** द केसिज दॅट इंडिया फॉरगॉट...**

सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्यासह इतर मान्यवरांनी 'बुके'ऐवजी 'बुक' देत तरुण भारतला शुभेच्छा दिल्या. महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी 'द केसिज दॅट इंडिया फॉरगॉट,'अ मस्ट-रीड.' फॉल नरीमन''हे पुस्तक देऊन शुभेच्छा दिल्या आणि आवर्जून वाचण्याची नम्र सूचनाही केली.

MGM UNIVERSITY
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
(AURANGABAD)

MGMUNIVERSITY

Join A Research-Driven University



ADMISSIONS OPEN 2026-27

Join Our UG, PG & Ph.D. Programs

**JAWAHARLAL NEHRU ENGINEERING COLLEGE**
- **B.Tech.:** Computer Science and Engg., Electrical and Computer Engg., Electronics and Computer Engg., Artificial Intelligence and Data Science, Mechanical Engg., Mechanical and Mechatronics Engg. (Additive Manufacturing), Robotics & Artificial Intelligence, Chemical Engg., Civil Engg.
- **B. Architecture** • **M. Arch.:** Environmental Architecture, Interior Design
- **M.Tech.:** CSE (Digital Transformation), Mechanical Engineering, VLSI &ES, Electrical Power System, Structural Engg.
- **MCA:** Master of Computer Applications 9404474266, 9657170664

**INSTITUTE OF INFORMATION & COMMUNICATION TECHNOLOGY**
- **B. Tech.:** Information Technology, AI & ML, Data Science, Computer Science & Engg. (AI) with IBM • **M. Tech.:** Data Science, AIML 9404494299

**SCHOOL OF ENGINEERING & TECHNOLOGY** 9371714253
- **Integrated B.Tech. (After 10th, 6 years):** Computer Science and Engg. (IoT, Cyber Security Including Block Chain Technology), Computer Science and Engg. (Data Science), Robotics and Artificial Intelligence, Civil Engg.
- **B.Tech.:** Computer Science and Engg. (IoT, Cyber Security Including Block Chain Technology), CS and Engg. (Cyber Security), Electronics Engg. (Semiconductor), Mechanical and Automation Engg., Electrical Engg.

**UNIVERSITY DEPT. OF INSTRUMENTATION & CONTROL ENGG.**
- **B.Tech.:** Instrumentation & Control Engineering 9823087784

**UNIVERSITY DEPARTMENT OF PHARMACEUTICAL SCIENCES**
- **B. Pharmacy** • **D. Pharmacy** 9371714265

**INSTITUTE OF MANAGEMENT & RESEARCH**
- **BBA:** Business Analytics, General, Fin Tech • **MBA**
- **Executive MBA (1 year)** • **B.Com | M.Com** 7666878389

**INSTITUTE OF HOTEL MANAGEMENT**
- **B.Sc.:** Hotel Operations Catering Services, Culinary Arts
- **B.B.A.:** in Aviation, Hospitality and Travel & Tourism Studies
- **M. Sc.:** Hotel Operations Catering Services 8793047544

**DR. G.Y. PATHRIKAR COLLEGE OF CS & IT** 9371714254
- **B. Sc.:** Computer Science, Information Technology, Animation, Artificial Intelligence and Machine Learning (IBM)
- **BCA:** Science, Digital Marketing
- **Integrated M.Sc.Data Science (5 Years)**
- **M. Sc.:** Computer Science, Information Technology, Data Science

**INSTITUTE OF BIOSCIENCE & TECHNOLOGY** 9371714255
- **B. Tech.:** Biotechnology, Food Processing Tech., Biomedical, Bioinformatics
- **M. Tech.:** Biotechnology, Food Technology
- **B. Sc.:** Biotechnology, Bioinformatics, Microbiology, Food Nutrition & Dietetics
- **M. Sc.:** Biotechnology, Bioinformatics, Microbiology / Virology

**SCHOOL OF BASIC AND APPLIED SCIENCES** 9325211386
- **B.Sc.:** Physics, Chemistry, Mathematics, Statistics, Forensic Science, Geology, Environmental Science, Community Science
- **M.Sc.:** Physics, Chemistry, Mathematics, Community Science Applied Geology, Forensic Science, Environmental Science, Geoinformatics, Digital and Cyber Forensic Science, Quantum Technology • **B.Tech. | M.Tech.:** Cosmetic Technology

**COLLEGE OF COMMUNICATION, CULTURE AND MEDIA**
- **B.A.:** Multimedia Journalism, International Journalism and Electronic Media • **M.A.:** Mass Communication, Broadcast Communication 9371714257, 8806255507

**DEPARTMENT OF PHOTOGRAPHY**
- **B.A.:** Photography • **M.A.:** International photography
- **PG Diploma** 8767875258

**INSTITUTE OF INDIAN & FOREIGN LANGUAGES**
- **B.A.:** English • **M.A.:** English, Marathi, Hindi, Urdu, Sanskrit
- **Diploma (1 year):** French, German, Japanese 9371714259

**INSTITUTE OF SOCIAL SCIENCES** 9371714261
- **BSW** • **B.A.:** Psychology, Economics • **MSW**
- **M.A.:** Clinical Psychology, Economics Sustainable Entrepreneurship, Economics, Political Science, Sport Psychology, Child Psychology, History & Archaeology

**SCHOOL OF LEGAL STUDIES & RESEARCH**
- **LL.B** • **BBA-LL.B.** • **LLM** 9371714264

**MAHĀGĀMI GURUKUL CENTER FOR PERFORMING ARTS**
- **BPA:** Kathak Dance Kalā Vid Kathak, Odissi Dance Kalā Vid Odissi, Kalā Vid Bharatanatyam • **M.A.:** Musicology, Indology
- **MPA:** Kathak Kalā Kovid, Odissi Kalā Kovid 9372093189

**LEONARDO DA VINCI SCHOOL OF DESIGN**
- **BFA.:** Applied Art, Drawing & Painting
- **B. Des.:** Interior Design, Fashion Design, Textile Design, Visual Communication, UI/UX Design, Industrial Design
- **M. Des.:** Textile Design, UI/UX Design • **MFA.:** Drawing & Painting • **M.F.M** Fashion Management 7972988179

**SCHOOL OF FILM ARTS**
- **B.Des. | M.Des. Filmmaking** 9371714258, 9699039209

**SCHOOL OF INTERDISCIPLINARY STUDIES**
- **M.LISc.** • **M.A:** Philosophy, Women and Gender Studies, Gandhian Studies, Buddhist Studies 9371714260

**DEPT. OF SPORTS, PHYSICAL EDUCATION & YOG SCIENCE**
- **BPES** • **M.A:** Physical Edu., Yog Science 9326203741

**DEPT. OF EDUCATION**
- **B.A | M.A:** Education 9860341002

**DEPT. OF MUSIC & THEATER**
- **BPA.:** Theatre, Music 9371714262

90676 12000 | 0240 6481111 | mgmu.ac.in
MGM Campus, N-6, Cidco, Chhatrapati Sambhajinagar, Maharashtra.

Scan To Apply

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विचारपुष्प



एखादे उदात्त ध्येय हे संघटनेद्वारा प्राप्त होऊ शकते. भारताच्या पुरातन काळामध्ये संघटना उभ्या करण्यामध्ये आपण तज्ज्ञ होतो. मोठमोठ्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संघटना आपल्या देशात निर्माण झाल्या. म्हणूनच भारत शतकानुशतके अनेक आव्हानांना तोंड देऊ शकला.

- **पद्मविभूषण**
**स्व. पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र, पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

# अखेर जपतलाई येथील आश्रमशाळेची मान्यता रद्द

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आदेश; सर्पदंशाने तीन मुलींच्या मृत्यूनंतर निर्णय

**मुंबई, ११ ऑगस्ट**

गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील निवासी आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन चिमुकल्या विद्यार्थिनींचा झालेला दुर्दैवी मृत्यू आणि इतर तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना समोर आल्यानंतर तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचे अत्यंत तीव्र पडसाद आज पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या गंभीर निष्काळजीपणाची दखल घेत संबंधित जपतलाई आश्रमशाळेची मान्यता रद्द केली आहे. तसेच याप्रकरणी एका अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले.

ही घटना रविवारी मध्यरात्री धानोरा तालुक्यापासून सुमारे १० किमी अंतरावर असलेल्या जपतलाई गावातील वसतिगृहात घडली. वसतिगृहात जमिनीवर झोपलेल्या सहा मुलींना विषारी सापाने दंश केला. त्यापैकी तिघींचा मृत्यू झाला. यातील सर्वांत लहान मुलगी आठ वर्षांची होती. सर्पदंश झालेल्या अन्य तीन मुलींवर उपचार सुरू आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या मुद्यावर विरोधी पक्षांच्या टीकेचा सामना करीत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी त्या निवासी शाळेचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याचा तसेच त्रुटी असूनही संस्थेची पाहणी करून अनुकूल अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित करण्याचा आदेश दिला. राज्यात कार्यरत असलेल्या आदिवासी मुलांच्या ५०० पेक्षा जास्त आश्रम शाळांचे त्रयस्थ संस्थेमार्फत लेखापरीक्षण करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. परवाना रद्द करण्यात आलेली आश्रम शाळा काँग्रेसचे माजी मंत्री मारोतराव कोवासे चालवतात.

सरकारी अनुदान मिळूनही या शाळेत शिक्षक किंवा वॉर्डन नव्हते आणि तिथे मूलभूत सुविधांचाही अभाव होता, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. फडणवीस यांनी मुख्य सचिवांना बैठक बोलवण्याचे आणि राज्यभरातील आश्रम शाळांसाठी एक सर्वसमावेशक तपासणी यंत्रणा उभारण्याचा निर्देश दिला. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी मंगळवारी मंत्रिमंडळाला या घटनेची माहिती दिली.

वसतिगृहात साप शिरला त्यावेळी जवळपास ५० मुली जमिनीवर झोपलेल्या होत्या आणि त्यावेळी तिथे कोणताही वॉर्डन उपस्थित नव्हता, असे त्यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)



### राज्यभरातील आश्रमशाळांचे लेखापरीक्षण

राज्यभरातील जवळपास ५११ अनुदानित आदिवासी निवासी शाळांचे सरकारकडून त्रयस्थ संस्थेद्वारे लेखापरीक्षण केले जाईल, असे उईके यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. महिन्यातून एकदा जपतलाई शाळेला भेट देण्यासाठी जबाबदार असलेल्या पर्यवेक्षकाला देखील भेटपुस्तकात खराब स्थितीची नोंद करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल निलंबित केले जाईल, असे उईके यांनी सांगितले तसेच त्यांनी या प्रकरणी चौकशीचे आश्वासन दिले.

### चौकशी करून कठोर कारवाई - डॉ. अशोक उईके

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी मंत्रिमंडळ बैठकीत या दुर्घटनेबद्दल तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. ज्या आश्रमशाळेचे संचालक तीन-तीन वेळा आमदार आणि खासदार राहिले आहेत, तेथेच जर सुरक्षेच्या मूलभूत सुविधा नसतील, तर ही बाब अत्यंत लाजीरवाणी आहे. अशा निष्काळजी संस्थाचालकांना आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, असे उईके म्हणाले.

**अधीक्षक निलंबित, अन्य कर्मचारीही रडारवर**
(शेवटच्या पानावर)



भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी सोमवारी विधानसभेला घेराव घातला. आंदोलनादरम्यान, पोलिसांनी विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी लाठीचार्ज केला. या लाठीचार्जच्या निषेधार्थ भाजपा व 'एबीव्हीपी'ने मंगळवारी झारखंड बंदचे आवाहन केले होते.

# झारखंड विधानसभा अधिवेशन गुंडाळले

**विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईमुळे गदारोळ**

**रांची, ११ ऑगस्ट**

राज्यातील भरती परीक्षांमधील कथित अनियमिततांविरुद्ध आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमाराच्या मुद्यावरून भाजपाच्या आमदारांनी सभागृहात घातलेल्या गोंधळानंतर विधानसभा अधिवेशनाचे कामकाज नियोजित वेळेच्या एक दिवस आधी म्हणजे मंगळवारी गुंडाळण्यात आले.

दिवसाच्या सुरुवातीला विधानसभा अध्यक्ष रवींद्रनाथ महतो यांनी सभागृहाचे कामकाज दोनदा तहकूब केले. दुपारी दोन वाजताच्या सुमारास कामकाज पुन्हा सुरू होताच सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे आमदार हौदात उतरले आणि त्यांनी एकमेकांविरुद्ध घोषणाबाजी केली. भरती परीक्षामधील अनियमिततेबाबत सीआयडी चौकशी सुरू आहे तसेच आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सुचवलेले सुधारणात्मक उपाय सरकारने स्वीकारले आहेत, असे सभागृहात गदारोळ सुरू असताना मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सांगितले.

विधानसभेत चलनी नोटा हवेत झळकावल्याबद्दल त्यांनी सीपी सिंह यांच्यासह भाजपाच्या अनेक आमदारांवर टीका केली आणि त्या नोटा हेच त्यांच्या अस्तित्वाचे व राजकारणाचा मूळ आधार आहेत, असा आरोप केला.

**विद्यार्थ्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक**

निषेध मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक देण्यात आली. पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात अनेक आंदोलक विद्यार्थी जखमी झाले, असा आरोप भाजपाने केला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### रामतुंड शिखरावर चार अतिरेकी

**जम्मू, ११ ऑगस्ट -**

जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यातील रामतुंड शिखरावर चार संशयित दहशतवादी चढताना दिसत असलेला एक व्हिडीओ समोर आला असून त्यानंतर मोठी दहशतवादविरोधी मोहीम हाती घेण्यात आली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली.रामकुंड परिसर उधमपूर जिल्ह्यातील सिओज धार पट्ट्याला लागून आहे.

### शेअर बाजारात पुन्हा घसरण

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारात मंगळवारी मोठी घसरण पाहायला मिळाली. आर्थिक क्षेत्रातील समभागांची झालेली विक्री आणि भूराजकीय तणावामुळे कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींमुळे बाजारावर दबाव निर्माण झाला.



सुरुवातीच्या मंद व्यवहारानंतर दिवसभरात बाजारात सातत्याने मंदीचे वातावरण राहिले. यादरम्यान निफ्टीने २४,४२९.२५ ची सत्रातील नीचांकी पातळी गाठली. दुपारनंतर खालच्या स्तरावर काही प्रमाणात खरेदी झाली असली, तरी दिवसाच्या अखेरीस दोन्ही निर्देशांक घसरणीसह बंद झाले. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ३८८.१९ अंकांच्या घसरणीसह ७८,१५४.२५ वर बंद झाला. तर निफ्टी ११२.१० अंकांनी घसरून २४,४७१.७० च्या पातळीवर आला.

# भेसळखोरांवर आता थेट 'मकोका'!

## लहान मुलांच्या जिवाशी खेळणाऱ्यांची गय नाही



**मुंबई, ११ ऑगस्ट**

राज्यात दुधात आणि पनीरसारख्या रोजच्या आहारातील पदार्थांमध्ये भेसळ करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या भेसळखोर माफियांचे धाबे आता दणाणणार आहेत. या गुन्हेगारांवर कोणतीही दयामाया न दाखवता त्यांच्यावर थेट संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत म्हणजेच 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्याचे अत्यंत कडक आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे अन्नात विष कालवणाऱ्या या समाजकंटकांची आता गय नाही.

सह्याद्री अतिथीगृहावर 'विकसित महाराष्ट्र २०४७' च्या उद्दिष्टांचा आढावा घेण्यासाठी आयोजित एका विशेष बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा संताप व्यक्त केला. अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाच्या सादरीकरणादरम्यान त्यांनी अधिकाऱ्यांना कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले. अन्नात भेसळ करणे हा काही साधासुधा गुन्हा नाही, तर तो थेट निष्पाप नागरिकांच्या आणि विशेषतः लहान मुलांच्या जीवाशी चाललेला भयंकर खेळ आहे, अशा शब्दांत त्यांनी या प्रवृत्तीवर कडक ताशेरे ओढले. लहान मुले मोठ्या प्रमाणावर दूध पितात. बाजारात राजरोसपणे विकले जाणारे बनावट पनीर आणि भेसळयुक्त अन्नामुळे नागरिकांना कर्करोगासारख्या महाभयंकर आजाराला सामोरे जावे लागत आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

**जामीनही मिळणार नाही**

गुन्हेगारांना जुन्या कायद्याच्या पळवाटा शोधून सहजासहजी बाहेर पडता येऊ नये, यासाठी त्यांच्यावर अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. केवळ कारवाई करून भागणार नाही, तर न्यायालयात हे खटले टिकले पाहिजेत आणि आरोपींना कडक शिक्षा झाली पाहिजे, यावर भर दिला.

# वाऽऽरे पायलट! गांजा पिऊन उडविले विमान!

## । एअर इंडिया विमान अपघात प्रकरणात महत्त्वाचा खुलासा । दुसरी डोप चाचणी पॉझिटिव्ह

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

फुकेतहून दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या एआय-२३७९ विमानाचे मुख्य पायलट दुसऱ्या मादक पदार्थांच्या चाचणीत पॉझिटिव्ह आढळले आहेत. चार ऑगस्टच्या घटनेनंतर दोन्ही चालकांची अनिवार्य तपासणी करण्यात आली होती. सह-पायलटच्या चाचणीत कोणतीही चिंताजनक बाब आढळली नाही. परंतु, मुख्य पायलटाच्या प्राथमिक अहवालानंतर त्याचा नमुना पुष्टीकरणासाठी अधिकृत प्रयोगशाळेत पाठवण्यात आला असता तो पॉझिटिव्ह आला. या पायलटने गांजा पिऊन विमान चालविल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.



सूत्रांनुसार, प्राथमिक चाचणीनंतर मुख्य पायलटाच्या नमुन्याचे अधिक विश्लेषण करणे आवश्यक होते. त्यानंतर तो नमुना पुष्टीकरण चाचणीसाठी एका विशिष्ट प्रयोगशाळेत पाठवण्यात आला. आता या चाचणीचा अहवालही पॉझिटिव्ह आला आहे. पायलटाच्या नमुन्यात मादक पदार्थ आढळले आहेत. चाचणीत गांजाच्या सेवनाची पुष्टी झाली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत दोन्ही वैमानिकांना उड्डाण कर्तव्यावरून हटवण्यात आले आहे.

एअर इंडियाचे विमान एआय२३७९ चार ऑगस्टला फुकेतहून दिल्लीसाठी निघाले. हवेत असताना विमानाने अचानक अंदाजे ३०० फूट उंचीवर हेलकावे खावू लागले. या विमानात तीन लहान मुलांसह १३७ प्रवासी होते. याव्यतिरिक्त आठ कर्मचारी सदस्य होते. दिल्लीत सुरक्षित लँडिंगनंतर जखमी १३ प्रवासी आणि चार केबिन क्रू सदस्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)




# विधिमंडळ पक्षाची स्वतंत्र बैठक म्हणजे पक्षात फूट नव्हे

## ॲड. सिब्बल यांचा युक्तिवाद; आजही सुनावणी

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

शिवसेना पक्ष आणि चिन्ह वाटपाबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. मंगळवारी ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या आदेशातील कायदेशीर त्रुटींवर बोट ठेवत जोरदार युक्तिवाद केला. चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अंतर्गत निवडणूक आयोगाने घेतलेला निर्णय पूर्णपणे बेकायदेशीर आणि अधिकारक्षेत्राबाहेरचा असल्याचा दावाही त्यांनी केला.

आजच्या युक्तिवादात कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या आदेशाचे चार मुख्य टप्प्यांत वर्गीकरण केले. यामध्ये शिवसेनेमध्ये फूट पडल्याचा निष्कर्ष काढणे, पक्षाच्या घटनेचा निकष विवाद सोडवण्यासाठी अयोग्य ठरवणे, संघटनीय बहुमतापेक्षा विधिमंडळ पक्षातील बहुमत निर्णायक मानणे आणि विधिमंडळ पक्षातील बहुमताच्या आधारे पक्षचिन्ह दुसऱ्या गटाला (शिंदे गट) देणे, पक्षात फूट पडल्याच्या निवडणूक आयोगाच्या निष्कर्षावर आक्षेप घेताना सिब्बल म्हणाले, आमदारांची वेगळी बैठक होणे, स्वपक्षीय गटनेता व मुख्य प्रतोद नियुक्त करणे किंवा एकमेकांविरोधात अपात्रतेची कारवाई सुरू करणे या बाबी केवळ विधिमंडळ पक्षाशी संबंधित आहेत. विधिमंडळ पक्षातील फुटीला मूळ राजकीय पक्षातील फूट मानता येत नाही. निवडणूक आयोगाने २१ जून, २५ जून आणि १ जुलैच्या पत्रांच्या आधारे पक्षात फूट पडल्याचे गृहीत धरले, जे परिच्छेद १५ आणि सर्वोच्च न्यायालयाच्या कायदेशीर तत्त्वांच्या पूर्णपणे विरोधात आहे.

१० व्या अनुसूचीच्या तत्कालीन परिच्छेद ३ आणि 'राणा प्रकरण' तसेच 'सुभाष देसाई प्रकरणातील' निर्णयांचा दाखला सिब्बल यांनी न्यायालयाला दिला. ◂ (वृत्तसंस्था)

### राजधानी दिल्लीत हाय अलर्ट

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याच्या पृष्ठभूमीवर, राष्ट्रीय राजधानी दिल्लीत अभेद्य सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांनी पाळत वाढवली आहे. १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावर होणाऱ्या राष्ट्रीय सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी प्रमुख सार्वजनिक ठिकाणे आणि संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा वाढवली. १९ मोस्ट वॉन्टेड दहशतवाद्यांचे पोस्टर प्रसिद्ध केले आहे. त्यात इंडियन मुजाहिदीन, अल-कायदा अशा विविध दहशतवादी संघटनांच्या फरार दहशतवाद्यांची माहिती आहे.

### ध्रुव राठीचा व्हिडीओ भारतात रोखला

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

सोशल मीडिया इन्फ्लुएंसर ध्रुव राठीचा 'मानहानीकारक' आणि कथितरीत्या धार्मिक भावना दुखावणारा युट्यूब व्हिडीओ भारतात रोखून धरल्याचे गुगलने मंगळवारी दिल्ली उच्च न्यायालयाला सांगितले.

युट्यूबची मालकी असलेल्या गुगलने, वकील अमिता सचदेवा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्या. स्वर्ण कांता शर्मा यांच्यासमोर ही माहिती दिली. ध्रुव राठीने २१ मार्च रोजी अपमानजनक आणि जातीयदृष्ट्या संवेदनशील असा व्हिडीओ प्रकाशित केला. या व्हिडीओला युट्यूबवर लाखो व्ह्यूज मिळाले आणि त्यात भगवान श्री राम, भगवान श्री कृष्ण आणि सीता देवी यांचा अपमान करणारी असत्य, दिशाभूल करणारी आणि प्रक्षोभक विधाने होती, असा दावा सचदेवा यांनी केला होता. केंद्र सरकारच्या 'तक्रार निवारण अपील समिती'ने दिलेल्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे गुगलच्या वकिलांनी सांगितले. उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर जागतिक स्तरावर व्हिडीओ रोखण्याबाबतचा मुद्दा प्रलंबित असल्याने, हा व्हिडीओ केवळ भारतातच रोखून धरण्यात आला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पारंपरिक महाविद्यालयांत आता स्वतंत्र विद्याशाखा सुरू होणार

## मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय; पुढील वर्षापासून जागा वाढणार

**मुंबई, ११ ऑगस्ट**

राज्यातील सामाजिक क्षेत्रातील गरजा आणि नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दिशा विचारात घेऊन राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी निर्णय घेतला आहे. सध्याच्या पारंपरिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य विषयाची स्वतंत्र विद्याशाखा किंवा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास, तसेच हयात असलेल्या समाजकार्य महाविद्यालयांमध्ये कायम विनाअनुदानित तत्त्वावर नवीन अभ्यासक्रम किंवा अतिरिक्त तुकडी सुरू करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यात काही वर्षांपूर्वी समाजकार्य महाविद्यालयांची संख्या अचानक वाढल्याने आणि त्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध न झाल्याने नवीन महाविद्यालयांना मान्यता न देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. यासाठी एप्रिल २००१ आणि ऑगस्ट २००४ मध्ये शासन निर्णय जारी करण्यात आले होते. मात्र, फेब्रुवारी २०२४ मध्ये हा विषय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला. त्यानंतर नियुक्त समितीच्या शिफारशींनुसार हे जुने धोरण बदलणे गरजेचे असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून पारंपरिक महाविद्यालयांत स्वतंत्र विद्याशाखा आणि समाजकार्य महाविद्यालयांत अतिरिक्त तुकड्यांना परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला. ◂ (तभा वृत्तसेवा)

# 'वंदे मातरम्'चा अपमान आता गुन्हा

### विधेयकावर केली राष्ट्रपतींनी स्वाक्षरी

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'चा अपमान हा आता गुन्हा मानला जाणार आहे. नव्या कायद्याने 'वंदे मातरम्'ला जन गण मनचा दर्जा मिळाला आहे.

लोकसभा आणि राज्यसभेत यासंदर्भातील विधेयक पारित झाल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या विधेयकावर मंगळवारी स्वाक्षरी केली. त्यामुळे त्याचे कायद्यात रुपांतर झाले आहे.

या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यामुळे आतापर्यंत देशात जो दर्जा जन गण मनला होता, तो आता 'वंदे मातरम्'लाही मिळाला आहे. यामुळे वंदे मातरम् म्हणणे जाणूनबुजून रोखणे वा त्यात अडथळा आणणे हा आता गुन्हा मानला जाणार आहे. आतापर्यंत जन गण मनचा अपमान करणाऱ्याला तीन वर्ष तुरुंगवासाची आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद होती. हीच शिक्षा आता 'वंदे मातरम्'चा अपमान करणाऱ्यालाही होणार आहे. राज्यसभेने २९ जुलैला तर लोकसभेने ३० जुलैला या विधेयकाला मंजुरी दिली. दोन्ही सभागृहांच्या मंजुरीनंतर हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले होते.

बंकिम चंद्र चटर्जी यांनी लिहिलेल्या या गीताने स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. त्यामुळे जन गन मन प्रमाणेच 'वंदे मातरम्'चाही सन्मान केला जाईल, असे संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २४ जानेवारी १९५० रोजी म्हटले होते. ◂ (तभा वृत्तसेवा)

### लाल किल्ल्यावरून प्रथमच गायिले जाणार




'वंदे मातरम्' गीताचे सहा कडवे असून गृहमंत्रालयाने यासंदर्भात निर्देश जारी केले आहेत. राष्ट्रपतींचे आगमन, राष्ट्रध्वज फडकाविणे आणि राज्यपालाचे भाषण आदी कार्यक्रमांमध्ये हे गीत गायिले जाणार आहे. या गीताची गाण्याची वेळ ३ मिनिटे १० सेकंद आहे. विशेष म्हणजे यावर्षी स्वातंत्र्य दिनाला प्रथमच लाल किल्ल्यावरून 'वंदे मातरम्' गायिले जाणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापुरात १७ ऑगस्टला दाखल होणार पहिल्या २० इलेक्ट्रिक बसेस

## १०० बसेसचा टप्प्याटप्प्याने प्रारंभ : महापौर कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महापालिकेकडून १०० इलेक्ट्रिक बसेस सुरू करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १७ ऑगस्ट रोजी रेल्वेच्या मालवाहतूक गाडीतून केसरी रंगाच्या २० इलेक्ट्रिक बसेस सोलापुरात दाखल होणार आहेत. उर्वरित ८० बसेस डिसेंबरअखेरपर्यंत दाखल होणार असल्याची माहिती महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

इलेक्ट्रिक बसेसचा रंग केसरी निश्चित केला आहे. बससेवा सुरू करण्यापूर्वी बसेसच्या रंगासह अन्य बाबींवर चर्चा करून मान्यता घेण्यासाठी हा विषय महापालिकेच्या सभेत मांडण्यात येणार आहे. शहरात ५० स्मार्ट बसस्टॉप उभारण्यात येणार असून, या बसस्टॉपवर सौरऊर्जेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बसस्टॉपच्या एका बाजूला खासगी कंपन्यांच्या जाहिराती, तर उर्वरित दोन बाजूंना महापालिकेच्या जाहिराती असतील. जाहिरातींचा मक्ता लोटस कंपनीला देण्यात आला असून, कंपनीकडून प्रत्येक बसस्टॉपमागे प्रतिमहा दीड हजार रुपये भाडे महापालिकेला मिळेल.

**प्रत्येक बस रोज १८० किलोमीटर धावणार**

महापालिकेने इलेक्ट्रिक बसेसचे बसमार्ग निश्चित केले आहेत. प्रत्येक बसने दररोज किमान १८० किलोमीटर धावणे बंधनकारक राहणार आहे. त्यासाठी जेबीएम कंपनीला महापालिकेकडून प्रति किलोमीटर २३ रुपये मोबदला देण्यात येणार आहे. याशिवाय केंद्र व राज्य सरकारकडून संबंधित कंपनीला अनुदान मिळणार आहे.

या प्रकल्पासाठी महापालिका आणि जेबीएम कंपनीमध्ये तीन वर्षांचा करार करण्यात आला आहे. बसेसचे संपूर्ण व्यवस्थापन जेबीएम कंपनीकडे राहणार आहे.

**१५ ऑगस्टचा मुहूर्त हुकला**

शहरात १०० इलेक्ट्रिक बसेस सुरू करण्यासाठी महापालिकेने जेबीएम कंपनीशी २०० पानी करार केला आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १५ ऑगस्ट रोजी ३० इलेक्ट्रिक बसेस सोलापुरात येणार होत्या. मात्र, १५ ऑगस्टचा मुहूर्त हुकला असून आता १७ ऑगस्ट रोजी पहिल्या २० बसेस सोलापुरात दाखल होणार आहेत. प्रत्येक बसने दररोज किमान १८० किलोमीटर धावणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच २०३७ पर्यंत या बसेसची मालकी जेबीएम कंपनीकडे राहणार आहे.









## मुजम्मील कमलीवाले, डॉ. चंदाराणी क्षीरसागर यांना सोलापूर जिल्हा युवा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

युवकांमधील सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि समाजोपयोगी कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणारा जिल्हा युवा पुरस्कार सन २०२५-२६ जाहीर करण्यात आला आहे. जिल्हा युवा पुरस्कार व युवा महोत्सव समिती, सोलापूरच्या बैठकीत सविस्तर छाननी, गुणांकन व चर्चेनंतर युवक, युवती आणि संस्था या तीन प्रवर्गातील पुरस्कारार्थींची सर्वानुमते निवड करण्यात आली असल्याचे जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहारे यांनी सांगितले.

युवा व युवती पुरस्काराचे मानकरी मुजम्मील कमलीवाले, डॉ. चंदाराणी क्षीरसागर तर संस्था पुरस्काराचे मानकरी कोंडीचे जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ हे ठरले आहेत. या पुरस्काराचे वितरण येत्या स्वातंत्र्यदिनी, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी येथे करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील युवक, युवती आणि समाजोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे तसेच त्यांच्या कार्यातून इतर युवकांना प्रेरणा मिळावी, हा या जिल्हा पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे.

**कोंडीचे जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संस्था युवा पुरस्काराचे मानकरी**

### निवड झालेले मानकरी:

**युवक- मुजम्मील खलील कमलीवाले (पंढरपूर) :**



श्री. कमलीवाले यांनी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण व मानवतावादी क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्य केले आहे. आरोग्य शिबिरे, रक्तदान, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि स्वच्छता अभियान यांसारख्या विविध उपक्रमांतून त्यांनी समाजसेवेचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे.

---

**युवती- डॉ. चंदाराणी अशोक क्षीरसागर (कुरुल, ता. मोहोळ):**



वैद्यकीय व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी ग्रामीण व गरजू नागरिकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे. आषाढी वारीच्या काळात वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी, औषधोपचार व विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवून राष्ट्रउभारणीत योगदान दिल्याबद्दल त्यांची युवती प्रवर्गातून निवड झाली आहे.

---

**संस्था - जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ (कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर) :**



या संस्थेने शिक्षण, महिला सबलीकरण, दुर्बल घटकांसाठी कार्य, आपत्ती व्यवस्थापन, क्रीडा, पर्यावरण आणि आरोग्यासोबतच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. संस्थेच्या या बहुआयामी व व्यापक कार्याची दखल घेत संस्थेची संस्था प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे.
















सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# अस्वस्थ स्पंदनांशी हवा संवाद...

संवादाच्या वाटा दिसेनाशा झाल्या की, माणसे रस्त्यावर उतरतात. झारखंडच्या रस्त्यांवर सध्या नेमके हेच बघायला मिळत आहे. संवादाची-प्रतिसादाची वाट बघणारी अस्वस्थ पिढी रस्त्यावर उभी ठाकली आहे. हातात फलक घेऊन, घोषणा देत आंदोलन करणारे हे युवक केवळ परीक्षेचा निकाल बदलावा किंवा भरती प्रक्रिया नव्याने घ्यावी, एवढ्यासाठी रस्त्यावर आलेले नाहीत. त्यांच्या आंदोलनाला बळ देणारी भावना म्हणजे विद्यमान व्यवस्थेवरील अविश्वास! त्यांनी वर्षानुवर्षे अभ्यास केला. घरच्यांनी त्यांच्या स्वप्नांसाठी कष्ट घेतले. कुणी शेतीतून पैसा उभा केला, कुणी कर्ज काढले, कुणी आपल्या गरजा बाजूला सारून मुलाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. सरकारी नोकरी मिळविण्याचे स्वप्न त्यांच्या दृष्टीने कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याची, स्वतःच्या पायावर उभे राहण्याची आणि आयुष्याला दिशा मिळण्याची आशा. अशा वेळी परीक्षेच्या प्रक्रियेबद्दलच प्रश्न निर्माण झाले, तर अस्वस्थता निर्माण होणार नाही तर काय? ज्या समाजात प्रश्न विचारण्यासाठी जागा उरत नाही, ज्या व्यवस्थेत उत्तर मिळण्याची आशा संपते आणि ज्या पिढीला आपले भविष्य आपल्या हातातून निसटत असल्याची जाणीव होते, त्या समाजात अशी अस्वस्थता अपरिहार्य असते. आधी ती घरातून सुरू होते, मग वर्गखोल्यांत जाते, नंतर सोशल मीडियावर उमटते आणि शेवटी रस्त्यावर येते. दिल्लीनंतर पुन्हा रस्त्यावर उतरलेल्या 'जेन-झी'ला समजून घ्यायचे असेल, तर त्यांच्याकडे केवळ आंदोलकांची गर्दी म्हणून पाहून चालणार नाही. त्यांच्या प्रश्नांवर चर्चा करावी लागेल, त्यांची अस्वस्थता समजून घ्यावी लागेल आणि त्यांना स्वतःच्या भवितव्याबद्दल वाटणाऱ्या चिंतेला गांभीर्याने घ्यावे लागेल. या पिढीला दूषणे देऊन गप्प बसवण्यापेक्षा त्यांच्याशी बोलणे अधिक गरजेचे आहे.

झारखंडमध्ये सध्या जे घडत आहे, त्याकडे याच व्यापक संदर्भातून पाहण्याची गरज आहे. रांचीच्या रस्त्यांवर उतरलेली हजारो मुले केवळ एखाद्या परीक्षेसाठी किंवा एका निकालासाठी लढत आहेत असे नाही. भरती प्रक्रियेतील कथित गैरप्रकार, पेपरफुटीचे आरोप, परीक्षा पुढे ढकलली जाणे, तपासाच्या विश्वासार्हतेबद्दल निर्माण झालेली शंका आणि सरकारी नोकरीच्या संधीभोवती वाढलेली अनिश्चितता, या सगळ्याचा एकत्रित परिणाम या आंदोलनामागे आहे. १० ऑगस्टला विधानसभेकडे निघालेल्या विद्यार्थ्यांच्या मोर्चावर अश्रुधूर, पाण्याचा मारा आणि लाठीचार्ज झाला. काही ठिकाणी आंदोलक आणि पोलिसांमध्ये झटापटही झाली. मूळ प्रश्न मात्र वेगळाच आहे. ही तरुणाई एवढी अस्वस्थ का? हा प्रश्न विचारताना तिच्यावर 'जेन-झी' असा शिक्का मारून मोकळे होणे सोपे आहे. 'आजची मुले जरा जास्तच भावनिक आहेत', 'त्यांना संयम नाही', 'मोबाईलच्या दुनियेत वाढलेली पिढी आहे', 'त्यांना कुणीतरी भडकवले असेल' असे बोलणे सोपे आहे. पण अशा चर्चेमुळे मूळ समस्येकडे दुर्लक्ष होत आहे. झारखंडच्या रस्त्यावर उभा असलेला युवक उद्या काय होईल, याची चिंता करत आहे.

ही अस्वस्थता केवळ झारखंडपुरती मर्यादित नाही. देशभरातील स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, निकाल, भरती प्रक्रिया आणि संस्थांच्या विश्वासार्हतेबद्दल तरुणांच्या मनात गेल्या काही काळात प्रश्न निर्माण झाले आहेत. दिल्लीत झालेल्या विद्यार्थी आंदोलनानेही याच अस्वस्थतेला राष्ट्रीय व्यासपीठ दिले होते. झारखंडमधील आंदोलनाची कारणे आणि मागण्या वेगळ्या असल्या तरी दोन्ही ठिकाणी एक समान धागा आहे, 'आमच्या भवितव्याशी खेळू नका', असा त्यांचा सूर आहे. आजची पिढी म्हणतेय की, परीक्षा घ्या, पण वेळेवर घ्या आणि पारदर्शकपणे घ्या. निकाल द्या, पण विश्वासार्ह पद्धतीने द्या. गैरप्रकार झाले असतील तर चौकशी करा. दोषी असतील तर कारवाई करा. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आम्हाला अंधारात ठेवू नका. झारखंडमधील आंदोलक विद्यार्थ्यांनी कथित गैरप्रकारांची स्वतंत्र चौकशी आणि भरती प्रक्रियेत पारदर्शकता यासह अनेक मागण्या केल्या आहेत. इथे सरकारची भूमिका देखील महत्त्वाची आहे. आंदोलकांच्या काही मागण्या मान्य झाल्या आहेत, काही प्रक्रियात्मक पावले उचलली गेली आहेत, आयोगातील काही सदस्यांनी राजीनामेही दिले आहेत. पण प्रश्न फक्त तात्कालिक निर्णय घेण्याचा नाही; प्रश्न आहे विश्वास निर्माण करण्याचा.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी अलिकडे तरुण पिढीबद्दल बोलताना याच वास्तवाकडे लक्ष वेधले. आजची पिढी प्रश्न विचारते; तिला केवळ आदेश देऊन चालणार नाही. तिच्याशी चर्चा करावी लागेल, तर्काने समजावून सांगावे लागेल, प्रेमाने आणि विश्वासाने संवाद साधावा लागेल, असे त्यांनी सांगितले. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे हे विचार केवळ कौटुंबिक संस्कारांपुरते मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. त्याचा व्यापक सामाजिक आणि राजकीय अर्थही आहे. आजच्या तरुणाला हुकूम नको, तर उत्तर हवे आहे. हे समजून घेतले नाही तर आपण प्रत्येक आंदोलनाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहू. मग प्रश्न विचारणारा विद्यार्थी 'आंदोलक' होईल, आंदोलक 'उपद्रवी' ठरतील आणि उपद्रवी समजल्या गेलेल्या माणसाला उत्तर देण्याऐवजी त्याला बाजूला हटवण्याची यंत्रणा सक्रिय होईल. माणसाला रस्त्यावरून हटवता येते; त्याच्या मनातील प्रश्न हटवता येत नाहीत. पण 'माझ्या भविष्याची हमी कोण देणार?' हा प्रश्न बळाच्या वापराने सुटत नाही. म्हणूनच या आंदोलनाकडे पाहताना दोन गोष्टी वेगळ्या कराव्या लागतील. हिंसा झाली असेल तर तिचे समर्थन होऊच शकत नाही. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले असेल तर त्याचीही चौकशी झाली पाहिजे. पोलिसांवर हल्ला झाला असेल तर हल्ला करणाऱ्यांना शिक्षा व्हायलाच हवी. आंदोलनाच्या नावाखाली अराजकाला मोकळीक देता येणार नाही. पण त्याच वेळी शांतपणे प्रश्न विचारणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या मूळ अस्वस्थतेकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही.

तरुणांच्या आंदोलनात किती लोक होते, पोलिसांनी किती अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या, कोणत्या नेत्याने कोणता आरोप केला, या बातम्या महत्त्वाच्या असतीलही. पण त्यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न आहे- त्या मुलांच्या हातात आंदोलनाचा फलक का आला? त्यांनी अभ्यासाची पुस्तके बाजूला का ठेवली? त्यांना व्यवस्था आपल्याविरुद्ध आहे, असे का वाटते? 'जेन-झी'ला केवळ 'डिजिटल पिढी' म्हणून ओळखणेही चुकीचे आहे. हो, ही पिढी मोबाईलवर रमते. तिच्या हातात इंटरनेट आहे. ती एका क्षणात देशाच्या दुसऱ्या टोकाला घडलेली घटना पाहते. पण त्याचबरोबर ही पिढी आपल्या भविष्याबद्दल अत्यंत व्यवहार्य प्रश्न विचारते. तिला करीअर हवे आहे. तिला रोजगार हवा आहे. तिला स्वतःच्या कौशल्याला किंमत मिळालेली हवी आहे. तिला संधी हवी आहे. आणि संधीच्या शर्यतीत नियम सर्वांसाठी समान असावेत, एवढीच तिची अपेक्षा आहे. कदाचित म्हणूनच ती अधिक अधीर दिसते. कारण माहितीचा वेग प्रचंड आहे; पण व्यवस्थेच्या उत्तरांचा वेग तितका नाही. या वेगातील तफावत ही अस्वस्थता निर्माण करते. म्हणून संवादाची गरज आज पूर्वीपेक्षा जास्त आहे. संवाद म्हणजे आंदोलकांच्या प्रत्येक मागणीला मान्यता देणे नव्हे. संवाद म्हणजे सरकारने शरण जाणे नव्हे. संवाद म्हणजे विरोधकांनी आपली राजकीय भूमिका सोडणे नव्हे. संवाद म्हणजे समोरचा माणूस ऐकण्याइतका महत्त्वाचा आहे, हे मान्य करणे. शेवटी प्रश्न आंदोलनाचा नाही, तर त्या आंदोलनामागच्या अस्वस्थतेचा आहे. या तरुण स्पंदनांशी मनापासून संवाद साधला गेला, तर ही अस्वस्थता कमी होईल. व्यवस्थेबद्दल संपूर्ण विश्वास निर्माण करणे हे या संवादाचे ध्येय असेल तर वाटचाल अधिक सोपी होईल. ■

## विशेष

# आधुनिक वाहतुकीचा नवा अध्याय

**प्रा. सुखदेव बखळे**



पुणे हे शहर गेल्या दोन दशकांमध्ये ज्या वेगाने विस्तारले, त्या वेगाने त्याची वाहतूक व्यवस्था विकसित होऊ शकली नाही, ही वस्तुस्थिती आहे. एके काळी सायकलींचे शहर म्हणून ओळख असलेल्या पुण्यात आज वाहनांची संख्या कोट्यवधींच्या घरात पोहोचली आहे. हिंजवडी, बाणेर, वाकड, बालेवाडी, औंध आणि शिवाजीनगर हा परिसर माहिती-तंत्रज्ञान उद्योगामुळे देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या भागांपैकी एक बनला; मात्र या विकासाची किंमत वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि नागरिकांच्या वेळेच्या अपव्ययाच्या रूपाने मोजावी लागली. अशा परिस्थितीत पुणे मेट्रो मार्गिका-३ हा केवळ एक वाहतूक प्रकल्प नाही, तर शहराच्या भविष्यातील विकासाची दिशा ठरवणारा महत्त्वाचा टप्पा आहे. या मार्गिकेचे वैशिष्ट्य म्हणजे ती अत्याधुनिक ७५० व्होल्ट 'डीसी थर्ड-रेल' विद्युतीकरण प्रणालीवर चालणारी देशातील पहिली सार्वजनिक-खाजगी भागीदारीत उभारलेली मेट्रो ठरणार आहे; मात्र या प्रकल्पाचे महत्त्व केवळ तांत्रिक नवकल्पनांपुरते मर्यादित नाही. त्यातून भारताच्या शहरी नियोजनातील बदलती विचारसरणीही स्पष्ट होते. पुणे शहराची सर्वांत मोठी समस्या म्हणजे वाहतूक. हिंजवडी 'आयटी पार्क'मध्ये काम करणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी दररोजचा प्रवास ही एक मानसिक आणि शारीरिक परीक्षा बनली आहे. केवळ २० ते २५ किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी दीड ते दोन तास लागणे, ही कोणत्याही विकसित शहरासाठी अभिमानाची बाब नाही. वाहतुकीत अडकून पडणारा वेळ हा केवळ वैयक्तिक तोटा नसतो, तर उत्पादकतेवर, उद्योगांवर आणि अर्थव्यवस्थेवरही परिणाम करणारा घटक असतो. या पृष्ठभूमीवर हिंजवडी ते शिवाजीनगर अवघ्या ४५ मिनिटांमध्ये जोडण्याचा दावा करणारी मेट्रो मार्गिका निश्चितच आशादायी वाटते.

या प्रकल्पाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'थर्ड-रेल' विद्युतीकरण प्रणाली. भारतातील बहुतांश मेट्रो प्रकल्पांमध्ये ओव्हरहेड वीजवाहिन्यांद्वारे वीजपुरवठा केला जातो. पुणे मेट्रो मार्गिका-३ मध्ये मात्र रेल्वेरुळालगत असलेल्या स्वतंत्र विद्युतवाहक रेलद्वारे गाड्यांना वीजपुरवठा केला जाणार आहे. प्रथमदर्शनी हा बदल तांत्रिक वाटत असला, तरी त्याचे परिणाम दूरगामी आहेत. शहरात उंच खांब आणि विजेच्या तारा नसल्यामुळे दृश्य प्रदूषण कमी होईल. देखभाल खर्चात बचत होईल. वीजपुरवठा अधिक स्थिर राहील. अत्याधुनिक सिग्नलिंग प्रणालीमुळे कमी अंतराने गाड्या चालवणे शक्य होईल. शिवाजीनगर ते हिंजवडी पुणे मेट्रो मार्गिका-३ हा प्रकल्प केवळ एका शहराचा नाही, तर भारतातील शहरी विकासाच्या नव्या मॉडेलचा प्रयोग आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारी, अत्याधुनिक 'थर्ड-रेल' तंत्रज्ञान, 'डिजिटल सिग्नलिंग' आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक या सर्व बाबी एकाच प्रकल्पात एकत्र आल्या आहेत. या प्रयोगाचे यश केवळ पुण्यासाठीच नव्हे, तर देशातील इतर शहरांसाठीही दिशादर्शक ठरू शकते. म्हणजेच यातून प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळेल. आज जगातील अनेक आधुनिक महानगरांनी अशा प्रकारच्या प्रणालीचा स्वीकार केला आहे. भारतात कोलकाता आणि बंगळुरूच्या काही मार्गांवर हे तंत्रज्ञान वापरले जात असले, तरी पुणे मार्गिका-३ मध्ये त्याचा व्यापक वापर होणार आहे. त्यामुळे पुणे हे केवळ आणखी एक मेट्रो शहर न राहता नवीन तंत्रज्ञान स्वीकारणारे शहर म्हणूनही ओळखले जाईल.

या प्रकल्पाची आणखी एक विशेष बाब म्हणजे तो सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर उभारला जात आहे. भारतातील बहुतांश मेट्रो प्रकल्प सरकारी निधीतून उभारले गेले. त्यासाठी हजारो कोटी रुपयांचा सार्वजनिक पैसा खर्च झाला. पुणे मार्गिका-३ मात्र डिझाईन, बांधकाम, वित्तपुरवठा, संचालन आणि हस्तांतरण (डीबीएफओटी) या मॉडेलवर विकसित होत आहे. त्यामुळे खागी गुंतवणूक, तांत्रिक कौशल्य आणि सरकारी नियमन यांचा संगम या प्रकल्पात दिसतो. हा प्रयोग यशस्वी झाला, तर भविष्यात देशातील इतर शहरांसाठीही आदर्श ठरू शकतो; मात्र कोणत्याही मोठ्या पायाभूत प्रकल्पाकडे केवळ कौतुकाच्या नजरेने पाहणे पुरेसे नाही. त्याच्या अंमलबजावणीची गती, खर्च, वेळापत्रक आणि प्रत्यक्ष परिणाम यांचाही वस्तुनिष्ठ आढावा घ्यावा लागतो. पुणे मेट्रोच्या विविध टप्प्यांमध्ये अनेकदा विलंब झाला. कोविड महामारी, जमिनीचे प्रश्न, तांत्रिक बदल आणि प्रशासकीय प्रक्रिया यामुळे प्रकल्पाची मुदत वाढली. परिणामी, नागरिकांच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. आता पहिला टप्पा सुरू होत असताना सर्वांत मोठे आव्हान म्हणजे विश्वासार्ह सेवा देणे. केवळ उद्घाटन करून प्रकल्प यशस्वी होत नाही; तर त्यातून दररोज लाखो नागरिकांचा विश्वास संपादन केला जातो का, हे पाहणे अधिक महत्त्वाचे असते. पुणेकरांनी यापूर्वीही अनेक मोठे प्रकल्प पाहिले आहेत. उड्डाणपूल बांधले गेले, रस्त्यांचे रुंदीकरण झाले, बस रॅपिड ट्रान्झिट प्रणाली उभारण्यात आली; परंतु अनेक ठिकाणी अपेक्षित परिणाम दिसले नाहीत. त्यामुळे नागरिक आता घोषणांपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाला अधिक महत्त्व देतात.

मेट्रो मार्गिका-३ लाही हीच कसोटी पार करावी लागणार आहे. या प्रकल्पाचे यश केवळ मेट्रोच्या गाड्या चालवण्यावर अवलंबून राहणार नाही. मेट्रो स्थानकांपर्यंत पोहोचण्यासाठी सुरक्षित पदपथ, सायकल मार्ग, बसेस, पार्किंग सुविधा आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत (लास्ट माईल कनेक्टिव्हिटी) सक्षम व्यवस्था आवश्यक आहे. भारतातील अनेक शहरांमध्ये मेट्रो असूनही लोक स्वतःची वाहने वापरतात, कारण स्थानकापर्यंत पोहोचणेच कठीण असते. पुण्यात ही चूक टाळावी लागेल. मेट्रो ही स्वतंत्र व्यवस्था नव्हे, तर संपूर्ण सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा केंद्रबिंदू बनली पाहिजे. आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले असता या प्रकल्पामुळे इंधनाची बचत, वाहतुकीतील वेळ कमी होणे आणि प्रदूषणात घट होणे हे तीन मोठे लाभ अपेक्षित आहेत. हिंजवडी 'आयटी पार्क'कडे जाणाऱ्या लाखो वाहनांमुळे दररोज प्रचंड प्रमाणात इंधन जळते. त्यातून कार्बन उत्सर्जन वाढते. या वाहनांपैकी मोठा हिस्सा मेट्रोकडे वळल्यास पर्यावरणीय लाभही मोठा असेल. हवामानबदलाच्या काळात सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे हा पर्याय नसून गरज बनली आहे. मेट्रोमुळे शहराचा आर्थिक चेहरामोहराही बदलतो. जगभरातील अनुभव सांगतो, की मेट्रो स्थानकांभोवती व्यापारी केंद्रे, निवासी प्रकल्प आणि नवीन रोजगार निर्माण होतात. जमिनींचे मूल्य वाढते, गुंतवणूक वाढते. पुणे मार्गिका-३ मुळे हिंजवडी, बाणेर आणि शिवाजीनगर परिसरातही अशीच आर्थिक चैतन्याची अपेक्षा आहे; मात्र या विकासात नियोजनाचा अभाव राहिला, तर वाहतुकीच्या नव्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे मेट्रोसह 'ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट' धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक ठरेल.

या प्रकल्पाच्या तांत्रिक बाजूचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) ही अत्याधुनिक डिजिटल सिग्नलिंग प्रणाली भविष्यात अधिक वारंवार सेवा आणि स्वयंचलित मेट्रो संचालनासाठी उपयुक्त ठरणार आहे. भारतातील शहरी वाहतुकीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल नियंत्रण आणि स्वयंचलित प्रणालींचा वाढता वापर ही सकारात्मक बाब आहे. भविष्यातील स्मार्ट शहरांसाठी अशी तंत्रज्ञानाधारित सार्वजनिक वाहतूक अत्यावश्यक ठरणार आहे. अर्थात, मेट्रो हा सर्व समस्यांवर रामबाण उपाय नाही. पुण्याची लोकसंख्या आणि शहराचा विस्तार पाहता बससेवा, उपनगरी रेल्वे, रिंग रोड, सायकल मार्ग आणि पादचारी सुविधा यांनाही समान प्राधान्य द्यावे लागेल. मेट्रो हा त्या व्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक आहे. संपूर्ण व्यवस्था नव्हे. त्यामुळे विविध वाहतूक साधनांचे एकात्मीकरण हे पुढील दशकातील सर्वांत मोठे आव्हान असेल. पुणेकरांनी अनेक वर्षे वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय आणि प्रदूषण सहन केले आहे. आता त्यांना आधुनिक, विश्वासार्ह आणि वेळेवर धावणारी सार्वजनिक वाहतूक हवी आहे. मेट्रो मार्गिका-३ त्या अपेक्षा पूर्ण करू शकली, तर ती केवळ प्रवासाचे साधन राहणार नाही, तर पुण्याच्या शहरी संस्कृतीत बदल घडवून आणणारी विकासरेषा ठरेल; मात्र त्यासाठी तंत्रज्ञानाइतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे सातत्यपूर्ण सेवा, प्रभावी व्यवस्थापन आणि नागरिकांचा विश्वास. शेवटी कोणत्याही मेट्रोचे यश उद्घाटनात नसते, तर रोज लाखो नागरिकांना ती किती सहज, सुरक्षित आणि वेळेवर गंतव्यस्थानी पोहोचवते, यातच खरे मूल्य दडलेले असते. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## प्रासंगिक

# स्वतःच्या बळावर उभे असलेले एक स्वयंपूर्ण न्यायाधिकरण


**एन. व्यंकटरामन्**

न्यायाधिकरणांची स्थापना या विषयावर आपल्या सार्वजनिक कायद्यात वारंवार विचारमंथन झाले आहे असे काही दिसत नाही. १९८७ मधील एस. पी. संपत कुमार प्रकरणापासून ते मद्रास बार असोसिएशन मालिकेतील नोव्हेंबर २०२५ च्या निर्णयापर्यंत, न्यायालयांनी कायदे रद्दबातल ठरवले, निर्देश जारी केले आणि नंतर पुन्हा त्याच मुद्यावर नव्या कायद्याची फेरतपासणी करावी लागली. या मुद्यावर इतक्या फेऱ्या व्हाव्यात, यावरूनच ही समस्या किती किचकट होती हे दिसून येते. न्यायाधिकरण सुधारणा विधेयक, २०२६ याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, कारण या विधेयकाने शेवटी मूळ समस्येचा अचूक वेध घेतला आहे आणि बहुधा त्यावर एक योग्य उत्तरही शोधले आहे.

**इतर ठिकाणचे धडे आणि आपला स्वतःचा अनुभव :** ही समस्या केवळ भारतापुरतीच मर्यादित नाही. इतर देशांनीही या समस्येचा सामना केला आहे आणि त्यांनी त्यावरील उपाययोजनांसाठी केलेला विचार अभ्यासण्याजोगा आहे. जेव्हा २००१ मध्ये युनायटेड किंगडममध्ये सर अँ*ू लेगॅट यांनी या क्षेत्राचा आढावा घेतला, तेव्हा त्यांना असे आढळले की ७० पेक्षा जास्त न्यायाधिकरणांचा कारभार त्या विभागांमार्फत चालवला जात होता, ज्या विभागांच्या निर्णयांवर हे न्यायाधिकरण न्यायदान करत होते. त्यांनी हाच मुख्य दोष असल्याचे मानले. त्यावर उपाय म्हणून त्यांनी कार्यकाळात फेरबदल करणे किंवा अर्हतेमध्ये सुधारणा करणे यांसारख्या उपाययोजनांची निवड केली नाही, तर न्यायाधिकरणांना त्यांच्या पुरस्कर्त्या विभागांपासून वेगळे करून त्यांचे प्रशासन एकाच स्वतंत्र व्यवस्थेकडे सोपवणे हा मार्ग निवडला. पुढे जाऊन याच उपायाचे रूपांतर २००७ च्या कायद्यात झाले. ही सुधारणा मूलभूत आणि संरचनात्मक होती. तिने पारतंत्र्य किंवा अवलंबित्वाच्या लक्षणांवर नव्हे, तर त्याच्या मूळ कारणावरच घाला घातला.

भारताने न्यायाधिकरणांची व्यवस्था खूप लवकर स्वीकारली आणि एकंदरच ती यशस्वीही ठरली. १९४१ मध्ये स्थापन झालेले प्राप्तिकर अपिलीय न्यायाधिकरण हे विशेष न्यायदानाचे जगभरातील उत्कृष्ट उदाहरणांपैकी एक आहे. हे मॉडेल कलम ३२३ ए आणि ३२३ बी द्वारे, तसेच प्रशासकीय न्यायाधिकरण कायदा, १९८५ द्वारे अधिक विस्तारले गेले आणि त्यानंतर नियामक क्षेत्रांमध्ये अशा प्रमाणात पसरले जे उच्च न्यायालयांना सामावून घेणे शक्य झाले नसते. आपली समस्या मात्र वेगळ्या प्रकारची होती. २०२० मध्ये न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे, जेव्हा न्यायाधिकरणांना कार्यकारी व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत नाही, तेव्हाच त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राखले जाऊ शकते.

**पूर्वीचे प्रयत्न या समस्येचा निपटारा का करू शकले नाहीत? :** सुधारणा एकापेक्षा जास्त वेळा आणि प्रत्येक वेळी प्रामाणिक हेतूने करण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर झालेला बहुतांश युक्तिवाद हा कार्यकाळ तीन वर्षांचा असावा, चार की पाच वर्षांचा असावा; किमान वय ५० वर्षे असणे ग्राह्य आहे का; आणि एकाच नावांची की दोन नावांच्या पॅनेलची शिफारस केली जावी, याभोवतीच फिरत राहिला. अगदी आदरपूर्वक सांगायचे तर, यापैकी कशाचाही या समस्येच्या मुळाशी संबंध नाही. स्वातंत्र्य हे



गणितावर किंवा आकड्यांवर अवलंबून नसते. कार्यकाळ, वय आणि नावांची संख्या ही केवळ अशी लक्षणे आहेत ज्यांच्याद्वारे रोगाचे निदान केले गेले आहे. ती स्वतः रोग नव्हेत.

**समस्येचे मूळ :** समस्येचे मूळ यात आहे की, न्यायाधिकरण ही एक स्वयंपूर्ण संस्था असणे आवश्यक आहे. तिची स्वतःची स्थापना, तिच्यात काम करणाऱ्या व्यक्तींची निवड करण्याची स्वतःची पद्धत, त्यांच्यावर देखरेख आणि शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी स्वतःची यंत्रणा, तसेच जागा, कर्मचारी आणि निधीची स्वतःची स्वतंत्र तरतूद असली पाहिजे. जिथे या गोष्टी अस्तित्वात असतात, तिथे स्वायत्तता सहज प्राप्त होऊ शकते. हे नवे विधेयक न्यायालयाने ज्या मुद्यांवर भाष्य केले आहे त्या मुद्यांची उत्तरे देते. एवढेच नाही तर ते यापेक्षाही अधिक काही करते. ते एक अशी संस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करते जी ही उत्तरे आपोआप लागू करेल. एका कायद्याद्वारे राष्ट्रीय न्यायाधिकरण आयोगाची स्थापना केली जात आहे. याचे अस्तित्व, रचना आणि कार्ये कोणत्याही कार्यकारी आदेशातून नव्हे, तर या कायद्यातूनच प्राप्त होतात; तसेच निवड करणे, देखरेख ठेवणे, शिस्तपालन आणि न्यायाधिकरणांच्या गरजांचे आकलन करण्याची जबाबदारी या आयोगावर सोपवण्यात आली आहे. या आयोगाच्या पाठीशी एक कायमस्वरूपी व्यावसायिक सचिवालय उभे असेल.

**श्रेष्ठत्व, समान अंतर आणि ही व्यवस्था कार्यक्षम बनवणारे नियंत्रक घटक :** हे विधेयक महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या प्रत्येक टप्प्यावर न्यायालयीन श्रेष्ठत्व कायम ठेवते. या आयोगाचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषवतील आणि त्यात न्यायालयीन सदस्यांचे बहुमत असेल. समित्यांचे अध्यक्षपद न्यायालयीन सदस्यांकडेच असेल, तसेच निर्णायक मत देण्याचा अधिकारही न्यायालयीन अध्यक्षांकडेच असेल. निवड, देखरेख, शिस्त आणि कामगिरीचे मूल्यमापन या सर्व बाबींचे नेतृत्व न्यायालयीन घटकाद्वारेच केले जाते. हे आर. गांधी प्रकरणापासून न्यायालयाने दिलेल्या निर्णयांना सुसंगत आहे; कारण मुख्य पक्षकार असलेली कार्यकारी यंत्रणा तिच्या स्वतःबाबत न्यायदान करणाऱ्या व्यक्तींच्या निवडीत वर्चस्व गाजवू शकत नाही.

त्याच प्रकारे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे की, 'श्रेष्ठत्व' म्हणजे 'नियंत्रण' नव्हे. संपूर्णपणे न्यायालयीन व्यवस्थेच्या स्वाधीन केलेल्या संस्थेला किंवा यंत्रणेला देखील आव्हाने असू शकतात. म्हणूनच हे विधेयक न्यायाधिकरणाला कार्यकारी आणि न्यायव्यवस्था या दोघांपासूनही समान अंतरावर ठेवते आणि हे कार्य तीन स्तरांद्वारे केले जाते. केंद्र सरकार नियमांमध्ये व्यापक तत्त्वे निर्धारित करते. आयोग हे काम कसे केले जाईल हे नियंत्रित करणारी नियमावली तयार करतो. सचिवालय या चौकटीत राहून प्रत्यक्ष अंमलबजावणी करते. त्याला आपल्या कामकाजाच्या पद्धतीबाबत मार्गदर्शन केले जाते, परंतु परिचालनात्मक स्तर किंवा दैनंदिन कामकाजाच्या स्तरावर थेट निर्देश दिले जात नाहीत; तसेच ते आपली कार्ये हस्तांतरणाद्वारे नव्हे, तर थेट कायद्यातून प्राप्त करते.

याचा परिणाम असा होतो की, आयोग, सचिवालय आणि कार्यकारी यंत्रणा यांच्या समोरासमोर येण्यामुळे नियंत्रण आणि संतुलनाची एक वास्तविक कार्यक्षम व्यवस्था तयार होते. सचिवालय पात्रतेची छाननी करते आणि ज्याच्या आधारे प्रत्येक निर्णय घेतला जातो तो अभिलेख संकलित करते. हे सचिवालय प्रसिद्ध केलेल्या नियमावलीने बांधील असते आणि ते आपल्या प्रत्येक कार्याचा नोंदवहीमध्ये हिशेब ठेवते. हेच ते सूक्ष्म संतुलन आहे जे हे विधेयक साधते. यामध्ये प्रशासनात न्यायालयीन हस्तक्षेप नाही आणि मुख्य बाबींमध्ये कार्यकारी यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत नाही; तसेच निवड, देखरेख, शिस्त आणि कामगिरीच्या मूल्यमापनात न्यायालयीन श्रेष्ठत्व कायम राहते. कॅनडाने २०१४ मध्ये असाच दृष्टिकोन स्वीकारला होता, जेव्हा त्यांनी आपल्या फेडरल न्यायाधिकरणांची न्यायिक स्वायत्तता कायम ठेवून त्यांच्या सहायक सेवांना एकाच संस्थेत समाविष्ट केले होते.

या प्रकारच्या कायद्यांचे मूल्यमापन केवळ ते आव्हानांवर टिकून राहतात की नाही यावरून केले जाऊ नये. ज्या परिस्थितींमुळे ही आव्हाने निर्माण झाली, ती परिस्थिती हा कायदा दूर करतो का, यावरून त्याचे मूल्यमापन झाले पाहिजे. या कसोटीवर हे विधेयक तंतोतंत खरे उतरते. हे विधेयक ज्या उद्देशाने तयार केले आहे त्यानुसार कार्य करत राहिले, तर न्यायाधिकरण व्यवस्थेत याने लक्षणीय सुधारणा होतील यात शंका नाही. पक्षकारांना अशी न्यायपीठे उपलब्ध होतील जी योग्यप्रकारे स्थापन केलेली असतील, जिच्याकडे पुरेशी पायाभूत सुविधा असेल, जिथे पदे तातडीने भरली जातील आणि जी आपल्या कामगिरीसाठी उत्तरदायी असेल. तसेच इथे विकसित केलेले मॉडेल यशस्वी ठरले, तर भविष्यातील इतर निवडींसाठीही ते उपयुक्त ठरू शकते. ■

(लेखक भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल आहेत. त्यांनी व्यक्त केलेली मते वैयक्तिक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# मुथूट फिनकॉर्प प्रकरणाचा धडा

पैशांच्या स्वरूपातील गुंतवणूक असो की चल व अचल मालमत्ता तारण ठेवून कर्ज घेण्याचा व्यवहार असो, नेहमी काळजी घेणे आवश्यक असते. ज्या संस्थेसोबत आपण आर्थिक व्यवहार करण्याचा विचार करतो आहे, त्या संस्थेबद्दल पुरेशी माहिती गोळा करून विश्वसनीयतेची खातरजमा करणे आवश्यक असते. सोने तारण ठेवून झटपट पैसे देण्याचे खेळ आपल्या देशात अनेक ठिकाणी होत आहेत. चिट फंड, नेटवर्क मार्केटिंगच्या माध्यमातून आतापर्यंत देशातल्या कोट्यवधी लोकांची फसवणूक झाली आहे. अपहार व फसवणुकीची लाखो प्रकरणे पुढे आल्यावरही अशा घटना थांबायचे नाव घेत नाहीत.

वित्तीय संस्था शासकीय असो, निमशासकीय असो की खाजगी, आर्थिक व्यवहार ज्या व्यक्तीमार्फत आपण करतो तो नियमात आणि पारदर्शक तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार असावा. नेहमीच संबंधातला, खूपच जवळच्या ओळखीतला आहे म्हणून जर कोणी व्यवहार करीत असेल तर फसवणूक किंवा अपहार होण्याची शक्यता खूपच जास्त असते. अमरावतीत उघड झालेले मुथूट फिनकॉर्प प्रकरण असेच आहे. मुथूट फिनकॉर्प लिमिटेड ही गैरबँकिंग वित्तीय कंपनी केरळची आहे. नावाजलेली ही जुनी कंपनी असून त्यांच्या देशभरात ३ हजार ७०० शाखा आहेत. साडेबारा लाख ग्राहकांना ते दररोज सेवा देतात. सोने तारण ठेवून कर्ज देणे हा या कंपनीचा मुख्य व्यवसाय आहे. याशिवाय छोट्या आणि मध्यम व्यवसायासाठी कर्ज देणे, वाहन, मालमत्ता, गृहकर्ज सुविधा सदर कंपनी देते. पण, अमरावती शाखेत कंपनीच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासण्याचे काम व्यवस्थापकाने केले. त्याचे नाव शुभम वासेवाय आहे. धीरज शिरसाट व सूरज खैरकार या दोन सहकाऱ्यांनी त्याला मदत केली. या तिघांनी अनेक ग्राहकांकडून तारण स्वरूपात सोने घेऊन ग्राहकांना कर्जाची रक्कम दिली. मात्र, तारण घेतलेल्या सोन्यापैकी काही सोन्याची नोंद कंपनीकडे तर उर्वरित काही सोने सोनार किंवा अन्य बँकांमध्ये तारण ठेवले व त्यावर कर्ज रकमेची उचल करून मजा मारली. सुरुवातीला हा प्रकार ग्राहकांच्या किंवा कंपनीच्या लक्षात आला नाही. मात्र, मागील आठ दिवसांपूर्वी काही ग्राहक तारण ठेवलेले सोने सोडवण्यासाठी गेले. त्यांनी सोन्यावरील घेतलेल्या कर्जाची व्याजासह परतफेड केली होती. मात्र, त्यांना सोने परत मिळाले नाही. उलट नोंदीत तफावत आढळून आली. तारण ठेवलेले सोने आणि त्यांनी व्याजापोटी भरलेली रक्कम अशा दोन्ही बाजूंनी फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

आतापर्यंत एकूण ७१ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. अपहार केलेले सोने २ किलो ८१९ ग्रॅम तसेच ५१ लाख रुपये रोख असा एकूण ४ कोटी ५९ लाख रुपयांचा अपहार उघड झाला आहे. हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. या प्रकरणात आणखी काहींना अटक होऊ शकते. हा गुन्हा करणारे तिघेही पोलिस कोठडीत असून त्यांच्या मालमत्तांची कागदपत्रे पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. देशभरात विस्तारलेल्या मुथूट फिनकॉर्पचा अमरावती शाखा व्यवस्थापक व त्याचे सहकारी असा बेलगाम कारभार करत असताना कंपनीच्या वरिष्ठांना तो लक्षात आला नाही, याचे आश्चर्य ग्राहकांना तर आहेच पण पोलिसांनासुद्धा आहे. हे प्रकरण सखोल तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्याचा विचार सुरू आहे. कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल पोलिसांना दिला आहे. त्यातून मुथूट फिनकॉर्पला मोठा फटका बसल्याचे दिसत नाही. पण, ग्राहकांना बसला आहे. या सर्व ग्राहकांनी जेवढे सोने दिले होते ते किंवा आजच्या बाजारभावानुसार त्याची रक्कम त्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी आरोपींची मालमत्ता विकावी लागली तरी चालेल. त्यातून येणारी रक्कम कमी असेल तर कंपनीने थोडा भुर्दंड सोसावा. याची जबाबदारी पोलिसांनी घ्यावी. शासनाने या प्रकरणावर लक्ष ठेवून ग्राहकांना दिलासा द्यावा. इतकेच! ■

९४२०७२१२२५

## वाचक पत्र

### दीप अमावास्या : मांगल्याचा सण

श्रावण महिन्याची सुरुवात एका अत्यंत पवित्र सणाने होते, तो सण म्हणजे 'दीप अमावास्या'! हा आपल्या संस्कृतीतील आनंदाचा आणि मांगल्याचा मोठा सण मानला जातो. दिवा हा अंधार दूर करून प्रकाशाकडे नेण्याचे प्रतीक आहे. दीप अमावास्येच्या दिवशी घरातील सर्व दिवे स्वच्छ धुवून, तेला-तुपाची वात लावून मनोभावे पूजा केली जाते. घरातील सर्व जण एकत्र येऊन देवाला प्रार्थना करतात की, 'आमच्या आयुष्यातील अंधार दूर होऊन ज्ञानाचा आणि आनंदाचा प्रकाश नेहमी तेवत राहो.' या दिवशी गोडाधोडाचा नैवेद्य दाखवून सर्व जण आनंदाने एकत्र जेवण करतात. या पवित्र दिवसाला काही जण चुकीच्या पद्धतीने 'गटारी' नाव देतात; मुळात तो शब्द 'गत आहारी' असा आहे. 'गत' म्हणजे संपलेले आणि 'आहार' म्हणजे खाणे, म्हणजेच श्रावणात आहारावर नियंत्रण आणण्यापूर्वीचा किंवा आहाराची सांगता करणारा हा दिवस होय. पावसाळ्याच्या या दिवसात शरीराची पचनशक्ती मंदावलेली असते आणि निसर्गातील जीवसृष्टीचे व पर्यावरण संतुलनाचे रक्षण करणे आवश्यक असते. त्यामुळे या दिवसाचे चुकीचे उदात्तीकरण टाळणे गरजेचे आहे. 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा दिवा आपल्या घरात सुख, शांती आणि समृद्धी आणतो. चला तर, यंदा दीप अमावास्येला आपल्या घरात आनंदाचा दिवा प्रज्वलित करूया आणि पवित्र श्रावण महिन्याचे स्वागत करूया! ■

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



महत्वाचे...

# मॉडेल रायफल शूटिंग अकॅडमी बंद; सोलापूरच्या खेळाडूंचे भविष्य अंधारात

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

गेल्या १३ वर्षांपासून अविरतपणे गुणवान रायफल शूटर खेळाडू घडवणारी आणि सोलापूरचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल करणारी येथील इंडियन मॉडेल स्कूल मध्ये सुरू असणारी मॉडेल रायफल शूटिंग अकॅडमी अचानक बंद करण्यात आली आहे. रेंज शिफ्टिंगमुळे ही शूटिंग रेंज गेल्या दोन महिन्यांपासून बंद असल्याने ३० हून अधिक प्रतिभावान खेळाडूंच्या सरावासमोर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. या रेंजमध्ये राष्ट्रीय आणि इंडिया ट्रायल देणाऱ्या खेळाडूंसह जवळपास ३० खेळाडू दररोज नियमित सराव करत होते. सध्या नॅशनल ट्रायल आणि शालेय स्पर्धा तोंडावर असताना रेंज बंद असल्याने आणि ती कधी सुरू होणार याबाबत खेळाडू व पालक वर्गात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**अकॅडमीची गौरवशाली परंपरा**

अविनाश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या या अकॅडमीने आजवर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू घडवले आहेत. विशेष म्हणजे, विश्वचषक विजेता आंतरराष्ट्रीय खेळाडू पार्थ राकेश माने याने याच शूटिंग रेंजवरून बंदूक धरण्याचे प्राथमिक धडे गिरवत आपल्या यशाची सुरुवात केली होती. गेल्याच वर्षी येथील खेळाडूंनी खेलो इंडिया स्पर्धेत चमकदार कामगिरी करत पदक पटकावले. सोलापूर विद्यापीठाच्या इतिहासात शूटिंग स्पर्धेत ऑल इंडिया स्पर्धेत टॉप ८ मध्ये स्थान मिळवणे आणि त्या माध्यमातून खेलो इंडियासाठी निवड होणे, असे उल्लेखनीय यश या अकॅडमीच्या खेळाडूंनी मिळवून दिले आहे.



### इनडोअर हॉल उपलब्ध करून द्यावा

सोलापुरातील क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांनी किंवा प्रशासनाने पुढे येऊन या अकॅडमीसाठी तातडीने ४० बाय ५०चा इनडोअर हॉल उपलब्ध करून द्यावा, अशी आर्त हाक खेळाडू आणि पालकांकडून दिली जात आहे. योग्य जागा मिळाल्यास ही हक्काची शूटिंग रेंज पुन्हा सुरू होईल आणि खेळाडूंचा सराव पूर्ववत होऊ शकेल.

### अकॅडमीतून घडलेले खेळाडू

या अकॅडमीच्या माध्यमातून सोलापूरचे नाव देशपातळीवर पोहोचवणारे प्रमुख खेळाडू याप्रमाणे:आंतरराष्ट्रीय: पार्थ माने. राष्ट्रीय : रोहित गायकवाड, ओंकार घोडके, वैष्णवी गायकवाड, सुयोग गायकवाड, कृष्णा बनसोडे, आदिती चोपडे, अवंतिका नारायणकर, जागृती चाकोते, शुभम क्षीरसागर, अलीशा पुरी,श्रद्धा दिवटे,त्वरिता खटके, कैलास शिवशरण.

### अतिशय खर्चिक खेळ

शूटिंग हा अतिशय खर्चिक खेळ आहे. एका खेळाडूची रायफल अंदाजे ४ ते ५ लाख रुपयांना येते, तर शूटिंगसाठी लागणाऱ्या विशेष ड्रेसची किंमत ५० ते ७५ हजार रुपयांच्या घरात असते. तसेच, एक खेळाडू सरासरी महिन्याला ५ ते ६ हजार रुपयांच्या गोळ्या (ॲम्युनिशिन) सरावावर खर्च करत असतो. पालकांचा हा लाखो रुपयांचा खर्च आणि खेळाडूंची मेहनत ऐन महत्त्वाच्या स्पर्धांच्या तोंडावर वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

## दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमीच्या ७ खेळाडूंना सुवर्ण



**दक्षिण सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

हरियाणातील रोहतक येथे झालेल्या स्टुडन्ट ऑलिम्पिक राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्कांडो अकॅडमी, मंद्रूपच्या खेळाडूंनी सात सुवर्णपदके पटकावली. या कामगिरीलवर सातही सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय तायक्कांडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत देशभरातील कर्नाटक, हरियाणा पंजाब, आसाम असे अनेक राज्यांतील हजारो खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या आणि उच्च दर्जाच्या सामन्यांमध्ये मंद्रूप दक्षिण सोलापूर तायक्कांडो अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, वेग, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या बळावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्ण यशाची नोंद केली.

**सुवर्णपदक प्राप्त खेळाडू :**श्रेया पवार, आरोही कदंले, श्रावणी नंदुरे, सफीना शेख, समर्थ चव्हाण, प्रेम चव्हाण, सोहम चव्हाण.



## डॉ. जयकर ठोंबरे यांना समाजरत्न गौरव राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत सोलापूरचे डॉ. जयकर ठोंबरे यांना 'समाजरत्न गौरव' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोल्हापूर येथील मराठा रेजन्सी, शाहूपुरी येथे 'द रेस रिलेशन बोर्ड एसी, भारत सरकार' आणि बिग मॅडी वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदिवासी सांस्कृतिक महोत्सव २०२६ मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.अभिनेत्री व चित्रपट निर्मात्या अर्चना तेंडुलकर, मिसेस कोल्हापूर २०२३ प्रिया नझारे, रेस रिलेशन बोर्डचे डेप्युटी डायरेक्टर डॉ. विजय सादळेकर, दक्ष राज्य प्रेसचे संपादक राजेश वाघमारे, एक्झिक्युटिव्ह ऑफिसर निलेश जाधव, महाराष्ट्र-गोवा रेस रिलेशन बोर्डचे अध्यक्ष डॉ. मेडी तामगावकर यांच्या हस्ते डॉ. ठोंबरे यांचा सन्मान करण्यात आला.

# हूपर्स, जग्वार्स, वॉरियर, टायटन्सला विजेतेपद

## सांगोल्यात रायझिंग स्टार्स बास्केटबॉल स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

रायझिंग स्टार्स बास्केटबॉल स्पर्धेत हूपर्स, जग्वार्स, वॉरियर, टायटन्स संघाने अनुक्रमे ८, १२ व १६ वर्षांखालील गटातून विजेतेपद पटकाविले.

सांगोला विद्यामंदिर प्रशालेच्या बास्केटबॉल इनडोअर कोर्टमध्ये बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकॅडमी व संभाजी कदम अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत आठ, बारा, सोळा वर्षांखालील मुले, मुलींच्या १६ संघानी भाग घेतला होता. विजेत्या संघांना प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, प्रायोजक डॉ.शैलेश डोंबे, डॉ.विनीत दिघे, अक्षय शास्त्रे, संजय चौगुले यांच्या हस्ते मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व सामने यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विश्वेश झपके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत मस्के, गणेश नागणे, अकॅडमीचे समन्वयक नरेंद्र होनराव यांनी परिश्रम घेतले.

**अंतिम तीन संघ : ८ वर्षाखालील मुले/मुली :** टीम हूपर्स, टीम जग्वार्स, टीम टायटन्स.

**१२ वर्षाखालील मुले :** टीम जग्वार्स, टीम हूपर्स, टीम वॉरियर्स.

**१६ वर्षाखालील मुले :** टीम वॉरियर, टीम टायटन्स, टीम हूपर्स. मुली : टीम टायटन्स, टीम जॅग्वार्स, टीम हूपर्स.

**अल्पावधीतच गरुडझेप**

२६ जानेवारीला सुरू झालेल्या या अकॅडमीने अवघ्या काही महिन्यांतच १०० विद्यार्थ्यांचा टप्पा ओलांडून एक मोठी गरुडझेप घेतली आहे. अत्यंत कमी कालावधीत वाढलेली ही विद्यार्थी संख्या अकॅडमीच्या उत्कृष्ट प्रशिक्षणाची व पालकांच्या विश्वासाची पावती आहे. याच १०० प्रशिक्षणार्थी मुलांचे सामने या लीगच्या निमित्ताने अतिशय चुरशीने खेळवण्यात आले.




## बार्शी नगरपरिषद बार्शी

**स्थापत्य विभाग**

**ई-निविदा सुचना क्र.९ सन-२०२६/२७**

नगरपरिषद कार्यालय, बार्शी
जा.क्र.स्थापत्य/ ४५०८
दिनांक- ११/०८/२०२६

बार्शी नगरपरिषद, स्थापत्य विभागाकडील **न.पा.निधी अंतर्गत १ ते ८ कामांसाठी** सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मान्यताप्राप्त ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. उपरोक्त कामा संबंधीचा सविस्तर तपशील http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक - १२/०८/२०२६ पासून पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**बार्शी नगरपरिषद**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दवाढमधील कसबे सोलापूर येथील पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेतर्फे बांधण्यात आलेल्या विडी कामगारासाठीचे गाळे योजना, जुळे सोलापूर भाग २, हैदराबाद रोड येथील विडी घरकुल इ ग्रुपमधील घरकुल गाळा क्र. १८२३ यासी सोडत क्र. ७७६, अर्ज क्र. २६४९ दि.२९/०३/१९८८ रोजीच्या मंजूर आदेशानुसार मिळालेली घरकुल गाळा याची चतुःसीमा :- पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस :- घरकुल गाळा नं.१८१८, दक्षिणेस :- घरकुल गाळा नं. १८२२, उत्तरेस :- घरकुल गाळा नं.१८२४. येणेप्रमाणे ही मिळकत अंबुबाई नरसय्या दोरनाल यांना मिळालेली असून त्यानुसार त्यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची होती. सदरची मिळकत अंबुबाई नरसय्या दोरनाल यांनी विक्रीस काढण्याचे ठरवून त्यानुसार आमचे अशिलांकडून मोबदला स्विकारुन ही मिळकत विक्री केली होती. त्यानुसार दि. १८/०३/२००२ रोजी अंबुबाई नरसय्या दोरनाल यांनी आमचे अशिलाच्या हक्कात खरेदीखत / लेख लिहून दिला आहे.

त्यानुसार पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सोलापूर यांचे रेकॉर्डला अथवा दप्तरी आमचे अशिल हे त्यांचे नावाची नोंद होणेकरिता म्हणून रितसर अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर घरकुल मिळकत बाबत कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, जप्ती बोजा, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, कब्जापावती, पोटगी, करार मदार इत्यादी प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखीस्वरुपात खालील पत्यावर तसेच पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, सोलापूर यांच्या कार्यालयात हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत / तक्रार न आल्यास सदरहु घरकुल मिळकत ही निर्वेध, निजोखमी आहे असे समजून पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सोलापूर यांचे दप्तरी आमचे अशिल त्यांचे नांवाची नोंद करतील तद्नंतर येणाऱ्या हरकती चालणार नाहीत. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस देत आहे. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली दि. ११/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑफिस - १६२८, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**



## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे नागोबाचीवाडी, ता. बार्शी व बार्शी पंचक्रोशीतील, आसपासचे लोकांना आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून, दाखविलेल्या कागदपत्रावरून व सदरची जाहीर नोटीस देणेस सांगितलेवरून त्यांचे तर्फे या सावधानतेच्या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील जमिन गट नं. २५४/१ यापैकी क्षेत्र ०२ हे.०५ आर, आकार ०१ रु. ८९ पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस - पायघन यांची जमीन, दक्षिणेस - कैलास धस यांची जमीन, पश्चिमेस - येळे यांची जमीन, उत्तरेस - रोहीत व्हनकळस यांची जमीन. येणेप्रमाणे वर्णनाची जमीन शरद रंगनाथ पवार, सचिन रंगनाथ पवार, सिमा सचिन पवार, शोभा मोहनलाल पवार, शशिकांत मोहनलाल पवार, संतोष मोहनलाल पवार, ललीता गजेंद्र जाधव, लक्ष्मीबाई भगवान घोलप, रा. सर्व बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील असून सदरील मिळकत पोकळ स्वरुपात ७/१२ यांच नाव आहे. आमचे अशिल भगवान गोरख बसाटे, रा. नागोबाचीवाडी यांचा कब्जा सुमारे ७० वर्षापूर्वीपासून आहे व सध्या ही तेच सदरील जमीन कब्जेवहिवाटीत आहेत. सदरील मिळकतीबाबत आमचे अशिलाने वरील लोकांविरुद्ध बार्शी येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ४८/२०२६ चा विरुद्ध कब्जाने आमचे अशिल सदरील मिळकतीचे मालक झाले आहेत, असे जाहीर होवून मिळणेकामी दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे. सदरील दावा आमचे अशिलाने दुय्यम निबंधक साहेब बार्शी यांचेकडे ५२६१/२०२६ नुसार मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ चे कलम ५२ (२) प्रमाणे नोंदवला असून ७/१२ सदरी नाव इतर हक्कात सदरील दावा नोंदविणेकामी संबंधीत तलाठ्याकडे रितसर अर्ज दिलेला आहे. असे असताना वरील लोक पोकळ नोंदीच्या आधारे सदरील मिळकत विक्री हस्तांतरण अथवा इतर त्रयस्थ व्यक्तीचे हक्क प्रस्थापित होतील असे हक्क सदरील मिळकतीबाबत करण्याचे विचारात आहेत. त्यामुळे कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून सदरील जाहीर नोटीस दिली आहे. सदरील मिळकतीबाबत वरील लोकांबरोबर कोणीही, कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये केल्यास तो आमचे अशिल व सदरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे. ता. १०/०८/२०२६

**सही/-**
**अशिल**
**भगवान गोरख बसाटे,**
**रा. नागोबाचीवाडी, ता. बार्शी,**
**मो.नं. ७४९८४३४३५९**

**सही/-**
**ॲड.श्री. एस.एस. ठोंबरे**
**फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी,**
**मो.नं. ९३७११६२४२५**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**


## सोलापूर जिल्हा पुरुष गट व्हॉलीबॉल स्पर्धा रविवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट -**

सोलापूर जिल्हा पुरुष गट व्हॉलीबॉल स्पर्धा रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी हरीभाई देवकरण प्रशाला येथे होणार आहे.

ही स्पर्धा व्हॉलीबॉल संघटना, सोलापूर यांच्या मान्यतेने व प्रो स्पोर्ट्स व्हॉलीबॉल अकॅडमी, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा एक दिवसाची (दिवस, रात्र) होणार असून स्पर्धेसाठी प्रवेश फी ३०० रुपये प्रति संघ असणार आहे. यासाठी ( मो. ९४२२४ ५८०३५) या नंबरवर संपर्क साधावा. स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. रुपये १५, १०, ७ व ५ हजार व सन्मानचिन्ह असे या स्पर्धेतील प्रथम चार पारितोषिके आहेत, असे प्रो स्पोर्ट्स व्हॉलीबॉल अकॅडमीचे संयोजक अनिल गिराम यांनी कळविले आहे.

## नॅशनल रेल्वे मजदूर युनियनच्या शिबिरात १२६ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

क्रांती दिनानिमित्त नॅशनल रेल्वे मजदूर युनियनच्या रक्तदान शिबिरात १२६ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे आयोजन सोलापूर रेल्वे स्टेशन बुकिंग ऑफिस समोर करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन अप्पर मंडल रेल प्रबंधक अंशुमाली कुमार, वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी विपिन कुमार, मुख्य चिकित्सक अधिकारी डॉ. जी.एस. मंजूनाथ आणि दमाणी ब्लड बँकेचे सचिव तथा रोटरी क्लबचे गवर्नर जयेश पटेल यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी विभागीय सचिव कॉ. राजीव पुरुषोत्तम यांनी मान्यवरांचे स्वागत केले. विभागीय अध्यक्ष कॉ. संभाजी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. हे शिबीर युनियनचे विभागीय सचिव राजीव पुरुषोत्तम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाले.


## सोलापूर जनता सहकारी बँक लि.

SJSB Multi-State Scheduled Coop.Bank

मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक

'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

### शेड्युल्ड - ४(२)
### जाहीर लिलाव

ज्या अर्थी बँकेने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माध्यमाद्वारे सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (SRFESI) च्या कलम १३ (४) अंतर्गत वसुलीसाठी कर्जदार व जामीनदार यांच्या खालील तपशीलातील तारण मालमत्तेचा पुढील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विक्रीसाठी बंद पाकिटात (बयाणा रकमेसह) निविदा/प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**विक्रीच्या अटी व शर्ती :**

१) निविदा ही बयाणा रकमेसहीत बंद पाकिटात प्राधिकृत अधिकारी, सोलापूर जनता सहकारी बँक लि. यांचे नावाने जमा करावी. २) राखीव किंमतीपेक्षा कमी रक्कम आणि / किंवा कमी बयाणा रकमेची कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही. ३) शेड्युल मध्ये नमूद केल्यानुसार बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट/ पे ऑर्डर / RTGS / NEFT लिलावात सहभागी होण्यासाठी Authorized Officer, Solapur Janata Sahakari Bank Ltd. यांच्या नावे काढलेली असावी. ४) यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्याबरोबर विक्री किंमतीच्या २५% रक्कम (पंचवीस टक्के) त्यातून बयाणा रकमेपोटी भरलेली रक्कम वजा करून डीडी, पे-ऑर्डर किंवा RTGS/ NEFT द्वारे लगेच भरावी लागेल व उर्वरित रक्कम बँकेद्वारे विक्रीची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात किंवा बँकेने दिलेल्या मुदतवाढीच्या तारखेच्या आत भरावी लागेल. ५) विक्री 'जसे आहे, जेथे आहे व आधार विरहीत' तत्वावर केली जात आहे. ६) इतर अटी शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील.

**शेड्यूलमधील मालमत्तेची विक्री बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे खालील निर्धारित तपशिलानुसार जाहीर लिलावाद्वारे केली जाईल.**

| मालमत्ता पाहणी तारीख व वेळ | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | मालमत्ता लिलाव / विक्रीची तारीख व वेळ | लिलाव / विक्रीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| दि. १३/०८/२०२६ पासून स.११.०० ते दु. ३.००. पर्यंत | दि. ३१/०८/२०२६ स.११.०० पर्यंत | दि. ३१/०८/२०२६ वेळ - दु. १.०० वा | **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** मुख्य कार्यालय - गगनभरारी, शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर ४१३००७ |

| शाखा,कर्जदार व जामीनदार नाव, नोटीस दिनांक व रक्कम | तारण तपशिल | राखीव किंमत / बयाणा रक्कम |
|---|---|---|
| शाखा - मंगळवार पेठ<br>प्रेमचंद निमाणी कंपनी प्रोप्रा.श्री.रमेश तिलोकचंद निमाणी (HUF)<br>जामीनदार - १) सौ.विमलबाई तिलोकचंद निमाणी<br>२) श्री.रमेश तिलोकचंद निमाणी (गहाणकार)<br>३) श्रीमती विमलाबाई प्रेमचंद निमाणी<br>४) सौ. जयश्री राजेश निमाणी<br>५) श्री. श्रेयस रमेश निमाणी (गहाणकार)<br>कलम १३(२) दि. २९/१२/२०२१<br>कलम १३(४) दि. १२/०१/२०२३<br>रु.६७,७०,७२८=५६ + दि.०१/१२/२०२१ व्याज व इतर खर्च<br>DM पझेशन - दि. १५/०९/२०२३ | **समीर कन्स्ट्रक्शन कंपनी-भागीदार श्री.रमेश तिलोकचंद निमाणी व श्री.श्रेयस रमेश निमाणी** यांचे मालकीची जिल्हा व उपजिल्हा सोलापूर ता.उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील पश्चिम मंगळवार पेठ येथील मिळकत यांसी सिटी सर्व्हे नं.२६८७ याचे एकूण क्षेत्र १९९.०० चौ.मी.यावर बांधण्यात आलेल्या श्रेयस प्लाझा मधील तळमजला गोडाऊन याचे क्षेत्र २२.६५ चौ.मी. दुकान नं.१ याचे क्षेत्र २४.०२ चौ.मी. व दुकान नं.२ याचे क्षेत्र २१.०६ चौ.मी. असे एकूण ६७.७३ चौ.मी. यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे-<br>**गोडाऊन** - पूर्वस - पार्किंग, पश्चिम - सि.स.नं.२६८८/ब, दक्षिण - सि.स.नं.२६७७ उत्तर - पार्किंग<br>**दुकान नं.१ :** पूर्वेस- दुकान नं.२, पश्चिम - सि.स.नं.२६८८/ब, दक्षिण- पार्किंग, उत्तर - रस्ता<br>**दुकान नं.२ :** पूर्वेस - पार्किंग, पश्चिम - दुकान नं.१, दक्षिण - पार्किंग, उत्तर - रस्ता | ४०,००,०००<br>४,००,००० |

**टीप : वरील स्थावर मिळकतीचे वर नमूद राखीव किंमत म्हणजे विक्री किंमत नसून बोलीची सुरुवात त्या किंमतीपासून होईल.**

बँकेस ज्ञात असलेल्या बोजाचा तपशील - नाही.

मालमत्तेबाबत कोणताही दावा कोणी केला असल्यास किंवा त्या स्वरूपाचा व मूल्याचा कोणताही अन्य ज्ञात तपशील - नाही.

**दिनांक : १२/८/२०२६**
**ठिकाण : सोलापूर**
(टीप : स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी-स्टेट शेड्युल्ड को. ऑप. बँक)**



**जाहीर प्रसिद्धीकरण**

दि.कि. अर्ज नं. ४९/२०२६
नि.नं. ५

## बार्शी येथील मे. सिव्हील जज ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात

१) **सुनिता दिलीप गडगडे,** वय-७७ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. आगळगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **नुतन संजय अंदुरे,** वय-५२ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. शिखरवाडी, ता. पाटोदा जि. बीड
३) **सोनाली राजेंद्र गाडेकर,** वय-४४ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. सुतारनेट गल्ली, शिरुर कासार, जी बीड, **--अर्जदार**
४) **दिपाली नितीन गाडेकर** वय-४२ वर्षे,
धंदा-घरकाम, रा. विठ्ठल गल्ली, शिरुर कासार, जि. बीड
५) **नागनाथ दिलीप गडगडे,** वय-३९ वर्षे,
धंदा- शेती, रा. आगळगाव, ता. बार्शी जि. सोलापूर

**--- विरुद्ध ---**

कोणीही नाही **-- सा.वाला**

ज्या अर्थी यातील अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २ ते ५ यांची आई आहे. व अर्जदार नं. २ ते ५ हे एकमेकांचे सख्खे भाऊ बहीण आहेत यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ५ यांचे वडील मयत दिलीप दत्तात्रय गडगडे, हे दि. २८/०१/२०२४ रोजी आगळगाव, ता. बार्शी, येथे वृद्धपकाळाने मयत झाले आहेत. मयत दिलीप दत्तात्रय गडगडे यांना अर्जदार नं. १ ते ५ हेच कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ५ यांचे वडील मयत दिलीप दत्तात्रय गडगडे, यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ व इतर शासकीय सवलतीचा लाभ घेण्यासाठी दि. १६/१०/२०२५ रोजी शासकीय कार्यालयात गेले असता यातील शासकीय अधिकारी यांनी त्यांना मयत दिलीप दत्तात्रय गडगडे, यांचे मे. कोर्टातून वारस प्रमाणपत्र आणण्यासाठी सांगितले असता अर्जदारांचा सदरचा अर्ज आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत मयत दिलीप दत्तात्रय गडगडे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रसिद्धी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २४/४/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिद्धीकरण मे.कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. ११/४/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी**
**ता. बार्शी**



## जाहीर प्रसिद्धीकरण/जाहीरनामा

नि. ७
दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २८/२०२६

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सो. यांचे कोर्टात

**१) श्रीमती पुष्पा दत्तात्रय जाधव,**
वय - ६९ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. मु. कोनळी, पो. करजाळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.
**२) सौ. जगदेवी विजय गायकवाड**
लग्नापूर्वीचे नाव कु. जगदेवी दत्तात्रय जाधव,
वय - ४८ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. मु. पो. अक्कलकोट, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.
**३) सौ. सुमा संजय हनगल**
लग्नापूर्वीचे नाव कु. जयश्री दत्तात्रय जाधव, **-- अर्जदार**
वय - ४४ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. हुबळी, कर्नाटक.
**४) सौ. ज्योती प्रवीण गायकवाड**
लग्नापूर्वीचे नाव कु. ज्योती दत्तात्रय जाधव,
वय - ४२ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. पिंपरी चिंचवड, जि. पुणे.

**--- विरुद्ध ---**

**कोणी नाही** **-- सामनेवाला**

ज्याअर्थी, अर्जदार नं. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ याचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील नामे दत्तात्रय परशुराम जाधव हे दि. २८/०८/२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यांचे मृत्युपश्चात यातील अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. मयत दत्तात्रय परशुराम जाधव यांचे नावे डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट मधील अ) मौजे कोन्हाळी येथील गट नं. १२७/१ याचे क्षेत्र १ हेक्टर १५ आर असून आकारणी रू. २.४५/-, ब) मौजे कोन्हाळी येथील गट नं. १२७/२ याचे क्षेत्र १ हेक्टर असून आकारणी रू. १.४०/-, क) मौजे कोन्हाळी येथील गट नं. १३१/१/ब/१ याचे क्षेत्र १ हेक्टर ७ आर असून आकारणी रू. ०.९०/-, ड) मौजे कोन्हाळी येथील गट नं. १६५/१ याचे क्षेत्र ५ हेक्टर ३२.७० आर असून आकारणी रू. १५.६२/-, इ) मौजे हंजगी येथील गट नं. ३४१/३ याचे क्षेत्र १ हेक्टर २२ आर असून आकारणी रू. ०.८०/- या स्थावर मिळकती आहेत.

मयत दत्तात्रय परशुराम जाधव यांचे पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार असल्याने, अर्जदार यांनी त्यांचे नावे वारसा दाखला मिळणेकरिता सदर अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १६/०९/२०२६ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नांवे वारस प्रमाणपत्रास कोणाची काही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे.
ता. ११/०८/२०२६.

**सही/-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**हुकूमावरून**
**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**अक्कलकोट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### 'यूईएफए सुपर चषक' फुटबॉल आजपासून

**लंडन :** फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम सामन्यानंतर अवघ्या तीन आठवड्यांनी, नवीन युरोपियन फुटबॉल हंगामातील पहिले विजेतेपद जिंकण्याची संधी बुधवारी साल्झबर्ग येथे 'यूईएफए सुपर चषका'च्या निमित्ताने पॅरिस सेंट-जर्मेन (पीएसजी) आणि ॲस्टन व्हिला या संघांना मिळणार आहे. चॅम्पियन्स लीग आणि युरोपा लीगच्या ताज्या विजेत्यांमधील हा वार्षिक सामना, फिफाच्या तुलनेत यूईएफएचे वर्चस्व किंवा प्रभाव दर्शविण्याची आणखी एक संधीही उपलब्ध करून देतो. विशेषतः जियानी इन्फँटिनो यांच्या अलीकडील वागणुकीमुळे फुटबॉल क्षेत्रातील या दोन शक्तिशाली प्रशासकीय संस्थांमधील दुरावा वाढत असताना ही बाब महत्त्वाची ठरते. याचे कारण म्हणजे, या सामन्याचे पंच म्हणून सोमालियाचे ओमर आर्टन काम पाहणार आहेत. आर्टन यांना तपासणीशी संबंधित कारणांमुळे विश्वचषक सुरू होण्याच्या काही दिवस आधीच अमेरिकेने सामन्यांचे संचालन करण्यापासून रोखले होते. आर्टन यांचे दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचा दावा अमेरिकन अधिकाऱ्यांनी केला होता, मात्र त्यांनी त्यासाठी कोणताही पुरावा सादर केला नव्हता.

### ओडिशाने जिंकले राष्ट्रीय कनिष्ठ हॉकी विजेतेपद

**कोईम्बतूर :** येथे खेळल्या गेलेल्या '१६ व्या हॉकी इंडिया कनिष्ठ पुरुष राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेच्या (विभाग 'अ') रोमांचक अंतिम सामन्यात हॉकी असोसिएशन ऑफ ओडिशाने हॉकी मध्य प्रदेशचा २-१ असा पराभव करून विजेतेपद पटकाविले. तिसऱ्या स्थानासाठीच्या सामन्यात, पंजाबने आक्रमक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत झारखंडचा ६-३ असा पराभव केला आणि कांस्यपदक मिळविले. अंतिम सामन्यात दोन जिद्दी संघांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली; यात ओडिशाने दमदार सुरुवात करत सुरुवातीलाच आघाडी घेतली. दुसऱ्याच मिनिटाला मनदीप केरकेट्टा याने गोल करीत ओडिशाला आघाडी मिळवून दिली आणि मध्य प्रदेशवर दडपण निर्माण केले. हॉकी मध्य प्रदेशने जोरदार पुनरागमन करत गोल करण्याच्या संधी निर्माण करणे सुरूच ठेवले, परंतु ओडिशाची बचावफळी अभेद्य राहिली. दोन्ही संघांनी मध्य-मैदानावर वर्चस्व गाजविण्याचा आणि संधी निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यामुळे सामना अत्यंत चुरशीचा झाला. अखेरीस ३७ व्या मिनिटाला सोहिल अलीने गोल करून मध्य प्रदेशला बरोबरी साधून दिली, त्यामुळे सामन्याचा शेवटचा टप्पा रोमांचक बनला. मात्र, ओडिशाने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेत आघाडी मिळविली; कर्णधार दीपक प्रधान याने ४५ व्या मिनिटाला गोल करीत संघाला पुन्हा आघाडीवर नेले.

# गुरनूर भारतासाठी 'हुकमी एक्का' ठरू शकतो : महरूफ


गुरनूर ब्रार

**कोलकाता, ११ ऑगस्ट**

जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत नवोदित वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रार हा भारतासाठी 'हुकमी एक्का' ठरू शकतो, असे मत श्रीलंकेचा माजी अष्टपैलू खेळाडू फरवीझ महरूफने व्यक्त केले.

शनिवारी गॅले येथे सुरू होणाऱ्या श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या मालिकेत या २६ वर्षीय गुरनूरला कसोटी पदार्पणाची संधी देण्याचा विचार नक्कीच केला जाऊ शकतो, असेही त्याने म्हटले आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मायदेशातील मालिकेत पराभव पत्करावा लागल्याने दबावाखाली असलेला आणि क्रमवारीत पाचव्या स्थानावर असलेला भारतीय संघ, श्रीलंकेच्या दोन सामन्यांच्या दौऱ्यातून पुन्हा कसोटी क्रिकेटमध्ये उतरताना आपला प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहविना खेळणार आहे.

मोहम्मद सिराज वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळेल अशी अपेक्षा आहे, परंतु अफगाणिस्तानविरुद्धच्या गत कसोटीत खेळलेल्या प्रसिध कृष्णाच्या जागी अननुभवी ब्रारला कसोटी पदार्पणाची संधी मिळेल का, याबाबत चर्चा सुरू आहे.

सोनी स्पोर्ट्स नेटवर्कने आयोजित केलेल्या आभासी पत्रकार परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना महरूफ म्हणाला, 'विशेषतः जुन्या चेंडूने 'रिव्हर्स-स्विंग' करण्याची क्षमता बुमराहकडे आहे व भारताला त्याची मोठी उणीव भासेल. तिथेच मला वाटते की त्यांच्याकडे बळी मिळविण्याच्या क्षमतेची काहीशी कमतरता भासू शकते. मोहम्मद सिराज हा चांगला गोलंदाज आहे, त्याच्याबद्दल पूर्ण आदर राखून सांगतो पण जेव्हा तुम्ही या दोन वेगवान गोलंदाजांची तुलना करता, तेव्हा थोडा फरक जाणवतो. मात्र त्याच वेळी ब्रारला पदार्पणाची संधी देण्याचा विचार त्याला नक्कीच करावासा वाटेल. याचे कारण म्हणजे पंजाबच्या या उंच-पुरा वेगवान गोलंदाजाचा वेग, चेंडूला मिळणारा उसळीचा गुणधर्म व आक्रमक पवित्रा; विशेषतः सराव सामन्यादरम्यान कसोटी संघातील अनेक फलंदाजांच्या शरीरावर त्याने मारलेले चेंडू पाहता हे प्रकर्षाने जाणवले. त्याच्याकडे लढवय्या वृत्ती आहे, त्यामुळे तो प्रतिस्पर्ध्यांसाठी घातक ठरू शकतो, असेही या माजी वेगवान अष्टपैलू खेळाडूने सांगितले.

पंजाबचा उंच वेगवान गोलंदाज ब्रार याची निवड कसोटी संघात करण्यात आली, जरी त्याचा प्रथम श्रेणी क्रिकेटमधील अनुभव आणि आयपीएलमधील अनुभव मर्यादित होता. त्यानंतर २६ वर्षीय ब्रारने अफगाणिस्तानविरुद्ध एकदिवसीय सामन्यात पदार्पण केले आणि सहा सामन्यांत ११ बळी घेतले. ब्रारने गत महिन्यात 'भारत अ'च्या श्रीलंका दौऱ्यातही सहभाग घेतला होता आणि गॅले येथील पहिल्या सामन्यात १० बळी घेण्याची कामगिरी केली होती.

**तिसरा फिरकीपटू म्हणून सुथार**

भारताला आता निवृत्त झालेले रविचंद्रन अश्विन आणि दुखापतग्रस्त वॉशिंग्टन सुंदर यांची उणीव भासेल. सुंदर पहिल्या कसोटीतून बाहेर पडला आहे, कारण श्रीलंकेतील खेळपट्ट्यांवर फिरकीपटूंना केवळ चेंडू वळवण्यापेक्षा उसळी मिळण्याची शक्यता जास्त असते. रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव ही जोडी फिरकीपटू म्हणून पहिली पसंती असली, तरी तिसऱ्या फिरकीपटूबाबत चर्चा सुरू आहे. भारताकडे युवा डावखुरा फिरकीपटू मानव सुथार आहे. सुथारने अफगाणिस्तानविरुद्धच्या पदार्पणाच्या सामन्यात सात बळी घेतले होते. तसेच, ३१ वर्षीय ऑफ-स्पिनर सारांश जैनही उपलब्ध आहे व त्याने 'भारत अ'सोबत श्रीलंका दौरा केला होता व त्यात त्याने सात बळी घेतले व सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना नाबाद ७० धावा केल्या होत्या. सुथारकडे चेंडूला उसळी देण्याची क्षमता असल्याने त्याला प्राधान्य मिळायला हवे, असेही तो म्हणाला.

कोलंबोमध्ये झालेल्या सराव सामन्यात भारताने सहा गडी राखून विजय मिळविला. या सामन्यात पंतने २ व २८ धावा केल्या होत्या. मला ऋषभ पंतबद्दल खूप चिंता वाटली असती. तो असा खेळाडू आहे जो अवघ्या अर्धा किंवा पाऊण तासात सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलू शकतो, असा विश्वासही त्याने व्यक्त केला.

भारत हा एक अत्यंत मजबूत संघ आहे, तरीही ही कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत सुटेल असा अंदाज क्रिकेटपटू ते समालोचक बनलेल्या महरूफने वर्तविला. (वृत्तसंस्था)

# प्रज्ञानंद, सेव्हियन लढत बरोबरीत

**सिंकफील्ड चषक बुद्धिबळ**


आर. प्रज्ञानंद

**सेंट लुईस, ११ ऑगस्ट**

येथील चेस क्लबमध्ये आयोजित ग्रँड चेस टूरमधील प्रतिष्ठित 'सिंकफील्ड चषक क्लासिकल' बुद्धिबळ स्पर्धेत भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने अमेरिकन ग्रॅण्डमास्टर सॅम्युअल सेव्हियनविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात सहजपणे बरोबरी साधत आपल्या मोहिमेची सुरुवात केली. पहिल्या फेरीनंतर कारुआना गुणतालिकेत एकट्याने आघाडीवर आहे, तर प्रज्ञानंदसह इतर सर्व खेळाडू अर्ध्या गुणावर आहेत.

'ग्रँड चेस टूर'मधील ही उप-अंतिम (दोन प्रमुख स्पर्धांपैकी एक) स्पर्धा असून, यात १० खेळाडू नऊ फेऱ्यांच्या 'क्लासिकल चेस' प्रकारात एकमेकांशी भिडत आहेत. भारताचा आघाडीचा युवा बुद्धिबळपटू प्रज्ञानंदने सेव्हियनविरुद्ध संयमी पवित्रा स्वीकारला आणि कोणत्याही मोठ्या अडचणीशिवाय अर्धा गुण मिळविला. या दोघांनाही निर्णायक आघाडी घेता आली नाही आणि तुलनेने समतोल लढतीनंतर त्यांनी बरोबरी मान्य केली. या निकालामुळे प्रज्ञानंदला स्पर्धेत आगेकूच करण्यासाठी एक स्थिर सुरुवात मिळाली आहे. अजून आठ फेऱ्या शिल्लक असल्यामुळे भारतीय ग्रॅण्डमास्टरला आघाडीच्या खेळाडूंना आव्हान देण्याची आणि गुणतालिकेतील आपले स्थान सुधारण्याची संधी मिळेल.

पहिल्या फेरीत अव्वल मानांकित फॅबियानो कारुआना याने स्पर्धेची सर्वात दमदार सुरुवात केली. या अमेरिकन खेळाडूने नेदरलॅण्ड्सच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टचा पराभव करून आघाडी घेतली.

इतर सामने बरोबरीत सुटले, त्यावरून स्पर्धेतील खेळाडूंची ताकद किती समान आहे हे दिसून येते. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचा दावेदार असलेल्या उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हने आर्मेनियन-मूळच्या अमेरिकन ग्रॅण्डमास्टर लेव्हॉन अरोनियनसोबत गुण विभागून घेतले. जर्मन ग्रॅण्डमास्टर व्हिन्सेंट कीमरलाही अमेरिकेच्या वेस्ली सो विरुद्ध बरोबरीवर समाधान मानावे लागले. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रकुल तलवारबाजीत भारताला सात पदके

**लागोस, ११ ऑगस्ट**

नायजेरियातील लागोस येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धेत भारतीय संघाने आपली उत्कृष्ट कामगिरी कायम राखत दुसऱ्या दिवशी सात पदके जिंकली.

सिनियर वैयक्तिक प्रकारांमध्ये—महिलांची 'सेबर', महिलांची 'एपी' आणि पुरुषांची 'फॉइल' मध्ये भारतीय संघाने एक सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य पदके जिंकली. वरिष्ठ महिलांच्या 'एपी' प्रकारात तनिष्का खत्रीने शानदार खेळ करत सुवर्णपदक जिंकले, तर खुशी दाभाडेने रौप्यपदक पटकावले. प्राची लोहानने ऑस्ट्रेलियाच्या हॅरिसन ॲशलीसोबत संयुक्तपणे कांस्यपदक जिंकले; ज्यामुळे या प्रकारात भारताच्या खात्यात तीन पदके जमा झाली. वरिष्ठ महिलांच्या 'सेबर' वैयक्तिक प्रकारात भारताने तीन पदके जिंकून उल्लेखनीय कामगिरी केली. इंग्लंडच्या ब्रायर्लीने सुवर्णपदक जिंकले आणि तिच्यापाठोपाठ राहून आखरीने अत्यंत पात्र असे रौप्यपदक मिळवले.

जेफरलिन आणि श्रुती जोशी या दोघींनी भारतासाठी कांस्यपदके जिंकली. वरिष्ठ पुरुषांच्या 'फॉइल' प्रकारात तेजस पाटीलने इंग्लंडच्या डेव्हिड विल्यमसोबत संयुक्तपणे कांस्यपदक जिंकले. सायप्रसच्या ॲलेक्स टोफालिडासने सुवर्णपदक, तर इंग्लंडच्या ऑलिव्हर स्ट्रेंजने रौप्यपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

# क्रिकेटपटू अभिषेक पोरेलला लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली अटक


अभिषेक पोरेल

**कोलकाता, ११ ऑगस्ट**

बंगाल क्रिकेट संघ आणि इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मधील 'दिल्ली कॅपिटल्स' संघाकडून खेळणाऱ्या अभिषेक पोरेल या क्रिकेटपटूला पोलिसांनी मंगळवारी अटक केली. एका वैद्यकीय विद्यार्थिनीने केलेल्या तक्रारीवरून त्याच्यावर बलात्कार, गुन्हेगारी स्वरूपाची धमकी आणि इतर गंभीर गुन्ह्यांचा आरोप ठेवून हा गुन्हा दाखल करण्यात आला. हुगळी जिल्हा पोलिसांनी दमदम पोलिस ठाण्याच्या हद्दीतील 'इमामी सिटी' येथून अभिषेकला अटक केली, अशी माहिती हुगळी ग्रामीण पोलिस अधीक्षक कुंवर भूषण सिंग यांनी दिली.

यापूर्वी जून महिन्यात, पीडितेने पोलिसांत तक्रार केली होती. अभिषेकने लग्नाचे खोटे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले आणि त्यानंतर तिच्यावर अत्याचार व गुन्हेगारी स्वरूपाची धमकी दिली असा आरोप तिने या तक्रारीतून केला होता.

पोरेलवर 'भारतीय न्याय संहिता'च्या कलम ६९ (लग्नाचे खोटे आश्वासन देऊन लैंगिक संबंध ठेवणे) आणि 'माहिती तंत्रज्ञान कायदा' २००० च्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोगरा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या (केस क्र. ३४६/२६) संदर्भात मुख्य आरोपी अभिषेक पोरेल याला दमदम पोलिस ठाण्याच्या हद्दीतील 'इमामी सिटी' येथून अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर लग्नाचे आश्वासन देऊन एका महिलेसोबत लैंगिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे, असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

कर्नाटक येथील एका तरुण वैद्यकीय विद्यार्थिनीने २३ जून रोजी हुगळीमधील मोगरा पोलीस ठाण्यात अभिषेकविरुद्ध तक्रार दाखल केली होती. अभिषेकसोबत तिचे साडेतीन वर्षे नाते होते. त्यांनी लग्न करण्याचा निर्णयही घेतला होता, मात्र आता त्याने लग्न करण्यास नकार दिला, असा आरोप या महिलेने केला. हे प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचले होते, परंतु त्यावेळी कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली नव्हती. यावेळी मात्र त्या तरुणीने तक्रार दाखल केली. तरीही, अभिषेकने त्यावेळी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले होते.

तक्रार दाखल केल्यानंतर अनेक दिवस उलटूनही पोलिसांनी कोणतीही कारवाई न केल्यामुळे त्या महिलेने कलकत्ता उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर उच्च न्यायालयाने अभिषेकला अटक करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोलिसांनी कारवाई केली.

त्यानंतर, अभिषेक पोरेलला हुगळी जिल्ह्यातील चिनसुरा येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले. त्याच्या वकिलांनी जामिनासाठी अर्ज केला होता; मात्र न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला आणि पोरेलला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

अभिषेक पोरेल हा बंगाल क्रिकेटमधील एक प्रमुख खेळाडू असून त्याने इंडियन प्रीमियर लीगमध्ये 'दिल्ली कॅपिटल्स'चे प्रतिनिधित्व केले आहे. डावखुरा यष्टिरक्षक-फलंदाज असलेल्या पोरेलने २०२१-२२ च्या हंगामात बंगालसाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि त्यानंतर 'भारत अ' संघातही त्याची निवड झाली. २०२३ मध्ये तो 'दिल्ली कॅपिटल्स' संघात सहभागी झाला आणि तेव्हापासून तो या फ्रॅन्चायझीचा भाग आहे. (वृत्तसंस्था)

# हॉकी विश्वचषक आमचाच : सलिमा टेटे

## एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धा १५ ऑगस्टपासून

**ॲमस्टेलवीन, ११ ऑगस्ट**

यावेळी एफआयएच हॉकी विश्वचषक आमचाच असेल. आम्ही हुशारीने आणि आक्रमक हॉकी खेळू व पदक जिंकून आणू. मला माझ्या संघावर पूर्ण विश्वास आहे. आमच्यात हे साध्य करण्याची क्षमता आहे, अलिकडे एफआयएच नेशन्स चषक स्पर्धेतील विजयामुळे भारतीय महिला संघाचा विश्वचषकापूर्वी आत्मविश्वास उंचावला आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत पदक जिंकण्याचे आमचे ध्येय आहे, असे भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार सलिमा टेटे म्हणाली.

न्यूझीलंडमधील प्रभावी कामगिरीच्या जोरावर भारतीय संघ विश्वचषकात प्रवेश करीत आहे; तिथे भारताने एफआयएच नेशन्स चषकाचे विजेतेपद पटकावले होते आणि आता नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये होणाऱ्या एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेत प्रवेश करीत आहे. ही स्पर्धा १५ ते ३० ऑगस्ट दरम्यान होणार आहे. भारताचा पहिला सामना १६ ऑगस्ट २०२६ रोजी नेदरलँड्समधील ॲमस्टेलवीन येथील वागेनर स्टेडियमवर चीनविरुद्ध होणार आहे.

न्यूझीलंडमधील यशामुळे भारतीय संघाला केवळ मोलाची गतीच मिळाली नाही, तर जगातील सर्वोत्तम संघांना सर्वात मोठ्या मंचावर आव्हान देण्याची क्षमता आपल्यात आहे, हा खेळाडूंचा विश्वासही दृढ झाला, असेही सलिमा म्हणाली.

विश्वचषकांत भारताला एका आव्हानात्मक गटात स्थान मिळाले आहे, त्यामुळे स्पर्धेचा सुरुवातीचा टप्पा संघासाठी कठीण परीक्षा ठरणार आहे. तरीही, संघाची अलीकडील कामगिरी आणि वाढलेला आत्मविश्वास त्यांना हे आव्हान पेलण्यास मदत करेल, असा विश्वास सलिमा टेटेला वाटतो.


कर्णधार सलिमा टेटे

नेशन्स चषकातील विजय भारतासाठी विशेष महत्त्वाचा ठरला आहे, कारण तो बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध मिळविला गेला आणि त्याद्वारे संघाला विश्वचषकापूर्वीच्या तयारीची चाचणी घेण्याची संधी मिळाली. टेटे व तिच्या सहकाऱ्यांसाठी, या विजयाने हा विश्वास अधिक दृढ केला आहे की, संयम राखून आणि योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून भारत आघाडीच्या हॉकी राष्ट्रांशी स्पर्धा करू शकतो.

मोठ्या स्पर्धेच्या दबावामुळे संघाच्या खेळण्याच्या पद्धतीवर परिणाम होऊ न देता, हुशारीने हॉकी खेळण्याच्या महत्त्वावरही भारतीय कर्णधाराने भर दिला. टेटेचा आत्मविश्वास हा संघाच्या अलीकडील महिन्यांतील प्रगतीचे प्रतिबिंब आहे. भारत आपल्या खेळातील सातत्य सुधारण्यावर, बचावाची मजबूत फळी उभारण्यावर आणि आक्रमक खेळात अधिक प्रभावी होण्यावर काम करत आहे. आता खेळाडू या सुधारणांची हीच लय विश्वचषकातही कायम राखण्याचा आणि अलीकडील यशाचे रूपांतर आणखी एका दमदार आंतरराष्ट्रीय कामगिरीत करण्याचा प्रयत्न करतील. स्पर्धेतील दडपणाचा सामना करताना 'सलिमा टेटे'चे नेतृत्व आणि सहकाऱ्यांना प्रेरित करण्याची तिची क्षमता अत्यंत महत्त्वाची ठरेल. (वृत्तसंस्था)

### नॉर्थईस्ट युनायटेड उपांत्यपूर्व फेरीत

**गुवाहाटी :** मंगळवारी गुवाहाटी येथील इंदिरा गांधी ॲथलेटिक स्टेडियमवर झालेल्या १३५ व्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेत गट एफ मधील आपल्या शेवटच्या सामन्यात, नॉर्थईस्ट युनायटेड एफसीने एफसी वन संघाचा ३-१ असा सहज पराभव केला. या विजयासह त्यांनी गट फेरीतील सर्व सामने जिंकण्याचा पराक्रम करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

# स्वितोलिना, स्वियातेक उपांत्य फेरीत आमने-सामने


एलेना स्वितोलिना


इगा स्वियातेक

**कॅनेडियन ओपन टेनिस**

**टोरंटो, ११ ऑगस्ट**

कॅनेडियन ओपन टेनिस स्पर्धेत एलिना स्वितोलिनाने पुन्हा एकदा आपल्या जिद्दीचे दर्शन घडविले. नवव्या मानांकित स्वितोलिनाने एकातेरिना अलेक्झांड्रोव्हाविरुद्धच्या सामन्यात संथ सुरुवातीनंतरही जोरदार मुसंडी मारीत उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले. आता उपांत्य फेरीत तिचा सामना पोलंडच्या इगा स्वियातेकशी होणार असून, हा सामना स्पर्धेतील दोन दिग्गज खेळाडूंमधील संघर्ष ठरणार आहे.

२०१७ ची विजेती असलेल्या स्वितोलिनाला सुरुवातीला अलेक्झांड्रोव्हाच्या आक्रमक 'बेसलाइन' खेळाचा सामना करताना अडचण आली. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या आर्यना सबालेंकावर अनपेक्षित विजय मिळवून आलेल्या १६ व्या मानांकित अलेक्झांड्रोव्हाने अचूक फटक्यांच्या जोरावर पहिला सेट ६-३ असा जिंकला.

मात्र, पहिल्या सेटमधील पराभवानंतर सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलले. स्वितोलिनाने त्यानंतरच्या १२ पैकी ११ गेम्स जिंकत वर्चस्व गाजवले; तिने दुसरा सेट ६-० असा सहज जिंकला आणि निर्णायक सेटमध्ये ५-१ अशी आघाडी घेतली. अलेक्झांड्रोव्हाने गुणसंख्या ५-३ अशी करत पुनरागमनाचे संकेत दिले, पण स्वितोलिनाने संयम राखला आणि ९३ मिनिटांत ३-६, ६-०, ६-३ असा विजय साकारला.

**इगा स्वियातेकची श्नाइडवर मात**

उपांत्य फेरीत तिचा सामना स्वियातेकशी होईल. स्वियातेकने या स्पर्धेतील आपल्या सर्वोत्तम कामगिरींपैकी एक करत डायना श्नाइडरचा अवघ्या ६४ मिनिटांत ६-२, ६-१ असा पराभव केला.

कोर्टवर मला चांगली भावना जाणवत आहे. मी किती सराव केला आहे आणि सरावादरम्यान आम्ही काय केले, याची मला जाणीव आहे. यामुळे माझा आत्मविश्वास वाढला आहे. त्या दिवशी योग्य मानसिक स्थितीत असणे आणि त्याचा पुरेपूर वापर करणे हीच मुख्य गोष्ट आहे. त्यामुळे मी दररोज सर्वोत्तम कामगिरी करण्याचा, माझ्या दिनचर्येचे पालन करण्याचा आणि पूर्णपणे एकाग्र राहण्याचा प्रयत्न करत आहे. आणि अर्थातच, उपांत्य फेरीत पोहोचल्याचा मला खूप आनंद आहे, असे इगा स्वियातेकने सांगितले. (वृत्तसंस्था)

# शर्मिला, लवलिना, झंडू 'करोडपती'च्या हॉट सीटवर


शर्मिला धनकर


लवलिना बोरगोहेन


झंडू कुमार

**मुंबई :** भारताचे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेते शर्मिला धनकर, लवलिना बोरगोहेन आणि झंडू कुमार हे खेळाच्या मैदानातून थेट टेलिव्हिजन स्टुडिओमध्ये येणार आहेत. हे तिघेही लोकप्रिय क्विझ शो 'कौन बनेगा करोडपती' (केबीसी) मध्ये सहभागी होणार आहेत. या तिन्ही खेळाडूंना बॉलीवूडचे दिग्गज आणि केबीसीचे सूत्रसंचालक अमिताभ बच्चन यांच्या समोर प्रतिष्ठित 'हॉट सीट'वर बसण्याची संधी मिळणार आहे. ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्यांचा समावेश असलेला हा विशेष भाग १५ ऑगस्टनंतर प्रसारित होण्याची शक्यता आहे. ग्लासगोमधील भारताच्या मोहिमेत विशेष चर्चेत राहिलेल्या धनकर या शोमध्ये आपला प्रेरणादायी प्रवास मांडणार आहेत. त्यांनी महिलांच्या एफ५७ गोळाफेक प्रकारात सुवर्णपदक जिंकले. घरगुती हिंसाचाराचा सामना करण्यापासून ते राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विजेतेपद मिळवण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत उल्लेखनीय आहे. महिलांच्या ७५ किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकणारी मुष्टियोद्धा लवलिना बोरगोहेन देखील या शोमध्ये सहभागी होणार आहे. दुसरीकडे, पॅरा-पॉवरलिफ्टर झंडू कुमार याने पुरुषांच्या हेवीवेट प्रकारात कांस्यपदक जिंकून भारताच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा मोहिमेत आपले नाव कोरले. १९० किलो वजनाची त्याची सर्वोत्तम लिफ्ट (ज्यासाठी १३०.९ गुण मिळाले) भारतासाठी या स्पर्धेतील पहिले पदक ठरले. भारताने ग्लासगो मोहीम ३९ पदकांसह (१३ सुवर्ण, १७ रौप्य आणि नऊ कांस्य) चौथ्या स्थानावर पूर्ण केल्यानंतर ही घटना घडत आहे. (वृत्तसंस्था)

# पुण्यात १६ वी राष्ट्रीय कनिष्ठ महिला हॉकी स्पर्धा आजपासून

**३० संघांचा सहभाग**


पत्रकार परिषदेत माहिती देताना हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की व इतर पदाधिकारी

**पुणे, ११ ऑगस्ट**

पुण्यात बुधवारपासून सुरू होणाऱ्या 'हॉकी इंडिया १६ व्या राष्ट्रीय कनिष्ठ महिला अजिंक्यपद स्पर्धेत एकूण ३० संघ विजेतेपदासाठी झुंजणार आहे. ही स्पर्धा २३ ऑगस्टपर्यंत चालणार आहे.

स्पर्धेत सहभागी झालेल्या या तीस संघांना तीन विभागांमध्ये विभागण्यात आले आहे. संघ राष्ट्रीय विजेतेपदासाठी तसेच विविध विभागांमध्ये बढती (प्रमोशन) व अवनती (रेलिगेशन) मिळविण्यासाठी झुंज देतील.

या स्पर्धेत 'डिव्हिजन ए', 'डिव्हिजन बी' आणि 'डिव्हिजन सी' असे विभाग असतील. या तीन श्रेणींमुळे संघांना त्यांच्या संबंधित पातळीवर खेळण्याची व राष्ट्रीय स्पर्धा प्रणालीमध्ये प्रगती करण्याची संधी मिळेल. विभागांवर आधारित या स्वरूपामुळे संघ केवळ विजेतेपदासाठीच नव्हे, तर उच्च विभागात बढती मिळविण्यासाठीही स्पर्धा करतील.

१२ संघांचा समावेश असलेल्या 'डिव्हिजन ए'ची चार गटांत विभागणी करण्यात आली आहे. 'गट ए'मध्ये झारखंड, पंजाब आणि चंदीगड यांचा समावेश आहे, तर 'गट बी'मध्ये हरयाणा, ओडिशा आणि बंगाल हे संघ आहेत. 'गट सी'मध्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि मणिपूर यांचा समावेश आहे. छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि हिमाचल हे संघ 'गट डी'मध्ये आहेत.

'डिव्हिजन ए'च्या साखळी फेरीला १६ ऑगस्टपासून सुरुवात होईल आणि प्रत्येक संघ आपल्या गटातील इतर संघांविरुद्ध खेळेल. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील, जी २० ऑगस्ट रोजी होणार आहे. उपांत्य सामने २१ ऑगस्ट रोजी खेळविले जातील; त्यानंतर २३ ऑगस्ट रोजी तिसऱ्या-चौथ्या स्थानासाठीचा सामना आणि अंतिम सामना होईल.

'डिव्हिजन ए'मधील १२ संघ प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेच्या विजेतेपदासाठी स्पर्धा करतील, तर एकूण क्रमवारीत ११ व्या व १२ व्या स्थानावर राहणाऱ्या संघांना पुढील आवृत्तीसाठी 'डिव्हिजन बी'मध्ये खाली (रेलिगेट) पाठविले जाईल.

'डिव्हिजन बी'मध्ये १० संघ असतील आणि त्यांची दोन गटांत विभागणी केली जाईल. 'गट ए'मध्ये आंध्र प्रदेश, आसाम, दिल्ली, केरळ आणि मिझोराम यांचा समावेश आहे, तर 'गट बी'मध्ये कर्नाटक, उत्तराखंड, तामिळनाडू, बिहार आणि गोवा हे संघ आहेत. या विभागातील अव्वल दोन संघ 'डिव्हिजन ए'मध्ये बढती मिळवितील, तर तळाचे दोन संघ 'डिव्हिजन सी'मध्ये खाली पाठविले जातील.

'डिव्हिजन सी'मध्ये आठ संघ असतील व त्यांची दोन गटांत विभागणी केली जाईल. 'गट ए' मध्ये अरुणाचल, दादरा-नगर हवेली आणि दमण-दीव, राजस्थान व त्रिपुरा यांचा समावेश आहे, तर 'गट बी' मध्ये पुदुचेरी, गुजरात, जम्मू-काश्मीर आणि तेलंगणा यांचा समावेश आहे. या गटातील अव्वल दोन संघ पुढील आवृत्तीसाठी 'डिव्हिजन बी' मध्ये बढती मिळवतील.

तीन विभागांमध्ये संघ स्पर्धा करत असल्याने, या स्पर्धेमुळे युवा खेळाडूंना मौल्यवान स्पर्धात्मक अनुभव मिळेल आणि देशांतर्गत खेळाची रचना अधिक बळकट होईल, असे हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की म्हणाले. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# हायस्कूलचा परिसर बनला मद्यपींचा अड्डा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

विद्यामंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येथील एका हायस्कूलचा परिसर मद्यपींचा जणू अड्डा बनला असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. रात्रीच्या वेळी आणि सुट्टीच्या दिवशी शाळेच्या आवारात टवाळखोर व मद्यपी थेट शिरकाव करुन मद्यप्राशन करत असून, दारुच्या बाटल्यांचा खच आणि धुडगूस यामुळे परिसरातील नागरिक व पालकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आवारात मद्यपींचा धुडगूस, नागरिक व पालकांमध्ये तीव्र संताप

**प्रमुख मागण्या**

शाळेच्या आवारात रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवण्यात यावी. सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी. आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून मद्यपींवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पालक व नागरिकांतून केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळा सुटल्यानंतर व रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन काही टवाळखोर तरुण आणि मद्यपी शाळेच्या मैदानावर तसेच वर्गांच्या व्हरांड्यात एकत्र येतात. तेथे उघड्यावर मद्यप्राशन केले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा विद्यार्थी आणि शिक्षक शाळेत येतात, तेव्हा त्यांना आवारात दारुच्या फुटलेल्या बाटल्या, सिगारेटची थोटके आणि कचरा पसरलेला आढळतो.

शाळेचे पवित्र वातावरण या प्रकारामुळे पूर्णपणे गढूळ झाले आहे. यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी आणि पालकांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत, मात्र अद्याप कोणतीही कडक कारवाई झालेली नाही. ज्या ठिकाणी मुलांवर संस्कार होतात, तिथेच असे गैरप्रकार घडत असतील तर प्रशासनाने तात्काळ जागे झाले पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया एका पालकाने दिली.

या गंभीर प्रकाराकडे शाळा प्रशासन आणि स्थानिक पोलीस आता तरी लक्ष देऊन या मद्यपींचा बंदोबस्त करणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. काही मद्यप्राशन करणारे अल्पवयीन मुलास दमदाट्या करुन बळजबरीने मद्यप्राशन करायला भाग पाडतात. हा प्रश्न गंभीर स्वरुपाचा आहे. प्रशासनाने यावर लवकर उपाययोजना केली नाही तर भविष्यात मोठे व गंभीर गुन्हे होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## महत्वाचे...



### एमआयटी कॉलेज बार्शी येथे वसंत हंकारे यांचे समाजप्रबोधनावर मार्गदर्शन

**बार्शी, दि. ११ ऑगस्ट -**

एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्च, बार्शी यांच्यावतीने न समजलेले आई-बाप समजून घेताना या संवेदनशील व समाजप्रबोधनात्मक विषयावर वक्ते वसंत हंकारे यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन केले होते. या व्याख्यानातून आई-वडील आणि मुला-मुलींमधील नातेसंबंध, परस्पर संवाद, कुटुंबातील भावनिक बंध तसेच संस्कार व कौटुंबिक मूल्ये याबाबत उपस्थितांना प्रभावी मार्गदर्शन मिळाले. वसंत हंकारे यांनी आपल्या प्रभावी व ओघवत्या शैलीत विविध उदाहरणांच्या माध्यमातून पालक आणि विद्यार्थ्यांना भावनिक नात्यांचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमास बार्शी ग्रामीणचे सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, प्रशासकीय शिक्षण अधिकारी अनिल बनसोडे, विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, उबाळे क्लासेसचे संचालक उबाळे, लायन्स क्लब बार्शी टाऊनच्या संस्थापक सदस्या वैभवी बुडूख, डॉ. मंजुषा भानवसे, प्राचार्या प्रमिला माथपती यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन समन्वयक प्रा. दिपाली माळी व प्रा. अभिजित पवार, प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे, मार्गदर्शक प्रा. प्रभा कासलीवाल तसेच स्वाती कराड चाटे, विश्वस्त व सचिव जनरल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सूत्रसंचालन संस्थेच्या विद्यार्थिनी प्रेरणा कांबळे आणि वैष्णवी पवार यांनी केले आहे.



### रोटरी-इनरव्हीलच्या नव्या नेतृत्वाचा पदग्रहण सोहळा

**बार्शी, दि. १० ऑगस्ट -**

रोटरी क्लब ऑफ बार्शी व इनरव्हील क्लब, बार्शी यांच्या २०२६-२७ या वर्षाच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण व संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा आमदार दिलीप सोपल यांच्या उपस्थितीत झाला. आ. सोपल हे स्वतः रोटेरियन असून रोटरीशी त्यांचा जुना आणि जिव्हाळ्याचा ऋणानुबंध आहे. त्यांचे वडीलही रोटरी क्लबचे अध्यक्ष राहिले होते. त्यामुळे त्यांनी रोटरीशी निगडित आठवणींना उजाळा दिला. रोटरी क्लबने आपल्या पूर्वीच्या कार्यकाळात राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा उल्लेख करताना दुष्काळ निवारणाच्या काळात रोटरीने केलेले उल्लेखनीय कार्य, तसेच समाजाच्या गरजेच्या वेळी राबविलेले विविध सेवाप्रकल्प यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. कार्यक्रमाचे पदग्रहण अधिकारी क्षितिज झवेरी तसेच इनरव्हील क्लबच्या पदग्रहण अधिकारी स्मिता चाकोते यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला. रोटरी क्लब ऑफ बार्शीच्या अध्यक्षपदी रनवनाथ गुल्हाने तर सचिवपदी विशाल देशमुख यांनी पदभार स्वीकारला. तसेच इनरव्हील क्लब, बार्शीच्या अध्यक्षपदी शिल्पा सरवदे आणि सचिवपदी अर्पणा शाह यांनी पदभार स्वीकारला. नूतन अध्यक्ष नवनाथ गुल्हाने यांनी आगामी वर्षातील रोटरी क्लबच्या कार्याची दिशा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता शामराज व विनिता भानुशाली यांनी केले.



### गुणवंत विद्यार्थी हेच समाजाचे समाजाचे भूषण : रामप्पा चिवडशेट्टी

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट -**

तरुण पिढीचे भवितव्य हे त्यांच्यावर झालेल्या संस्काराचे फलित असते. देश,देव,समाज यांच्याप्रती जाणीव ठेवून काम केल्यास समाजाची प्रगती होते. समाज ऋण फेडण्याची व्रुत्ती विद्यार्थ्यांनी ठेवावी.असे आवाहन सोलापूर जि.प.क्रुषी विभाग सभापती रामप्पा चिवडशेट्टी यांनी वीरशैव सेवा मंडळ पूर्व विभाग, सोलापूर आयोजित गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभात केले. प्रास्ताविक प्रा.प्रभाकर हंजगे यांनी केले. यावेळी नगरसेवक शिवानंद पाटील, व भाजपा युवा आघाडी अध्यक्ष महेश बिराजदार यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवकर्णी पाटील यानी केले. श्रीशैल शिळ्ळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रकाश लोणी,विरुपाक्ष घेरडे, शिवराज चडचणकर, श्रीशैलट शिळ्ळे. अरविंद लोणी,यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमास काशिनाथ रुगे,संगमेश्वर पायमल्ले, सुरेश चिक्कळी, विजयकुमार हुल्ले, शंकर पावरगी,विश्वनाथ मेरकर, राजशेखर मळेवाडी, वसंतराव परांडकर आदि उपस्थित होते.

### नॅशनल रेल्वे मजदूर युनियनच्या शिबिरात १२६ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

क्रांती दिनानिमित्त नॅशनल रेल्वे मजूदर युनियनच्या रक्तदान शिबिरात १२६ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन अप्पर मंडल रेल प्रबंधक अंशुमाली कुमार, विपिन कुमार, डॉ.जी.एस. मंजूनाथ, जयेश पटेल यांच्या हस्ते करण्यात आले.

राजीव पुरुषोत्तम यांनी स्वागत केले. संभाजी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी अतुल सावंत, प्रिती ढवणे, दिनेश मीणा, संजय पवार, महबूब अल्लाबख्स, मोहम्मद, मोहन चव्हाण, अमसिध्द व्हनमाने, रफीक, रियाज शेख, प्रदीप गोरे यांनी परिश्रम घेतले.

# अवैध देशी-विदेशी दारु विक्रेत्यांवर छापा

**१० हजारांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनी अक्षय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली अवैध धंद्यांविरोधात सुरु असलेल्या विशेष मोहिम अंतर्गत बार्शी तालुका पोलिसांनी धडाकेबाज कारवाई केली. अवैधरित्या देशी-विदेशी मद्याची विक्री करणाऱ्या इसमावर छापा टाकून रुपये १०,३२५ किमतीचा मद्यसाठा जप्त करण्यात आला.



बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे पथक नियमित पेट्रोलिंग करीत असताना, बार्शी-जामगाव रोडवरील हॉटेल अश्विनी शेजारी एक इसम अवैधरित्या देशी-विदेशी दारुची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करुन पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाड टाकली.

विजय अर्जुन आवटे (वय ५० वर्षे, रा. जामगाव, ता.बार्शी) हा कोणताही वैध परवाना नसताना देशी-विदेशी मद्याची विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून विविध प्रकारच्या देशी व विदेशी मद्याच्या बाटल्या असा एकूण रुपये १० हजार ३२५ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध धंदे चालविणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

# पंढरपुरात मोफत नेत्र आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑगस्ट -**

**स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त ११ ते २२ ऑगस्टदरम्यान तालुक्यात १० ठिकाणी होणार शिबिरे**

कर्मयोगी श्रद्धेय स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच सर्व रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर तब्बल दहा दिवस चालणार असल्याची माहिती पांडुरंग परिवाराचे युवा नेते प्रणव परिचारक यांनी दिली.

पांडुरंग परिवार युवक आघाडी व प्रणव परिवार युवा मंच, पंढरपूर यांच्या वतीने हे नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून शंकरराव साळवे नेत्र रुग्णालय, सोलापूर (एच. व्ही. देसाई आय इन्स्टिट्यूटचा प्रकल्प)यांच्या सहकार्यातून तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील ज्या मदतीने हे शिबिर घेतले जाणार आहेत.

या आरोग्य उपक्रमांतर्गत ११ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट या कालावधीत तालुक्यातील विविध गावांमध्ये सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात येणार आहेत. दि. १२ ऑगस्ट रोजी गादेगाव, १३ ऑगस्ट रोजी खर्डी, १४ ऑगस्ट रोजी उंबरे-पागे आणि १६ ऑगस्ट रोजी रांजणी येथील आरोग्य केंद्रात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी कासेगाव, १९ ऑगस्ट रोजी रोपळे, २० ऑगस्ट रोजी पुळुज, २१ ऑगस्ट रोजी करकंब ग्रामीण रुग्णालय आणि २२ ऑगस्ट रोजी भाळवणी येथे आरोग्य तपासणी शिबिर होऊन समारोप होणार आहे. शिबिरामध्ये नागरिकांची नेत्र तपासणी करून मोतीबिंदू आढळल्यास पुढील मोफत शस्त्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. अद्ययावत अशा सर्वोपचार रुग्णालयात रुग्णांना मोफत घेऊन शस्त्रक्रिया करून दिली जाणार आहे.

# सांगली अर्बन बँकेच्या विश्रामबाग शाखेचे नूतनीकरण व विस्तारित लॉकरचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि. ११ ऑगस्ट-**

सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगलीच्या विश्रामबाग शाखेचे नूतनीकरण व विस्तारित लॉकरचा उद्घाटन समारंभ नुकताच आमदार सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते संपन्न झाला.



यावेळी रा.स्व.संघाचे महानगर संघचालक डॉ. प्रियदर्शन चितळे, बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ, उपाध्यक्ष संजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, संचालक सीए अनंत मानवी, हणमंतराव पाटील, संजय धामणगांवकर, कालिदास हरिदास, सागर घोंगडे, स्वाती करंदीकर, अश्विनी आठवले, रविंद्र भाकरे आणि मनोज कोरडे, तज्ज्ञ संचालक सीए सागर फडके, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर आदी उपस्थित होते.

हर्षल वैद्य यांनी सहकार गीत सादर केले. बँकेचे संचालक संजय धामणगांवकर यांनी प्रास्ताविक, स्वागत व कार्यक्रमाची भूमिका मांडली. यावेळी आमदार गाडगीळ यांचे स्वागत बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे यांनी, तर डॉ. प्रियदर्शन चितळे यांचे स्वागत व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ यांनी केले.

यानंतर नूतन विस्तारित लॉकरचे ग्राहक गणपती मंदिर ट्रस्टचे गजानन लोहगावकर यांना आ. गाडगीळ यांच्या हस्ते चावी प्रदान करण्यात आली. सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक श्री. वाडकर यांना ठेव पावती डॉ. प्रियदर्शन चितळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी बँकेशी दीर्घकाळ जोडलेल्या विविध क्षेत्रांतील ग्राहकांचा सत्कार करण्यात आला. उद्योजक श्रीकांत तारळेकर, केदार खरे, पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अभिजित पाटील यांचा आ.गाडगीळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बँकेच्या माजी संचालिका डॉ.संपदा कानिटकर यांचा संचालिका स्वाती करंदीकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. उद्योजक अमोल रास्ते, मोहन जगताप, जयवंत माने, बांधकाम व्यावसायिक तात्यासाहेब खोत, उद्योजिका वर्षा मालेदार, पार्थ चव्हाण, जयाताई जोशी यांचा सत्कार झाला. विश्रामबाग शाखेच्या वाटचालीत योगदान दिलेल्या माजी शाखाधिकारी नारायण पाटील, अरविंद पुराणिक, सुरेश कोटीभास्कर, प्रमोद गोसावी तसेच महावीर चौगुले यांचा सन्मान करण्यात आला. वास्तुविशारद सचिन साळुंखे, बांधकाम समिती सल्लागार अभियंता विवेक चौथाई, कंत्राटदार श्री. जोशी सत्कार झाला. ग्राहकांच्या वतीने श्रीकांत तारळेकर, जयवंत माने आणि तात्यासाहेब खोत यांनी मनोगत व्यक्त केले. शाखा सल्लागारांच्या वतीने अँड. योगेश कुलकर्णी यांनी आपले विचार मांडले. व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष गणेशराव गाडगीळ यांनी परिवर्तनच्या माध्यमातून बँकेला कशाप्रकारे प्रगतीपथावर आणले याबाबतची माहिती दिली. बँकेचे अध्यक्ष श्रीपाद खिरे यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला. डॉ. प्रियदर्शन चितळे यांनी संघ शताब्दी निमित्ताने पंच परिवर्तन विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्धी अधिकारी संदीप कुलकर्णी यांनी केले.संचालक सागर घोंगडे यांनी आभार मानले.



# वेंदात पडवळ, कृष्णा इंगळे प्रथम; सोजरमध्ये 'सोजर मास्टरशेफ स्पर्धा'

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

सोजर इंग्लिश स्कूल सांस्कृतिक विभागाच्यावतीने सोजर मास्टरशेफ स्पर्धेत इ. ५ ते ७ या गटातून वेदांत पडवळ प्रथम, अलविरा सय्यद द्वितीय व नम्रता शिंदे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. इ. ८ ते १० या गटातून कृष्णा इंगळे, अयान शेख आणि बिबीसारा मुजावर यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय स्थान संपादिले.

या स्पर्धेत कटोरी चाट, डेझर्ट, केक्स, सँडवीच, फ्रँकी, रोल्स, फ्रुट सॅलड, शीतपेये, भेळ, पाणीपुरी अशा जवळपास ११५ खाद्यपदार्थांचा समावेश होता. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून यशोदा प्रसारक मंडळाच्या सचिवा कल्पनाताई बारबोले उपस्थित होत्या. या स्पर्धेचे मुल्यमापन सोजर प्रशालेचा माजी विद्यार्थी, हॉटेल मॅनेजमेंट पदवीधारक, तसेच ताज, ब्लू डायमंड यासासारख्या पंचतारांकित हॉटेलमध्ये शेफ म्हणून कार्य केलेले स्वराज मोरे आणि हॉटेल मॅनेजमेंट पदवीधर, हॉटेल व्यवसायाचा अनुभव असलेले आणि सध्या बार्शीतील परांजपे उपहारगृहाचे सर्वेसर्वा म्हणून कार्यभार सांभाळणारे सौरभ परांजपे यांनी केले.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन शिक्षिका प्रमोदिनी गायकवाड व शिक्षक सचिन शिंदे यांनी केले. तसेच पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा शिक्षिका सविता कांबळे व शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे यांनी सांभाळली.

# धूत ट्रान्समिशन लिमिटेडचे बाजारपेठेतील स्थान भक्कम

**धूत ट्रान्समिशन लिमिटेडने १० ऑगस्ट २०२६ रोजी आपला ३,०६६.८९ कोटी रुपयांचा इनिशिअल पब्लिक ऑफरिंग खुली केली आहे. यासाठी प्रति इक्विटी शेअर ८२९ ते ८७१ रुपये अशी किंमत श्रेणी (प्राइस बँड) निश्चित करण्यात आली असून, ही प्रक्रिया १२ ऑगस्ट रोजी बंद होईल. या आयपीओमध्ये १,४०० कोटी रुपयांचे नवीन शेअर्स आणि सुमारे १,६६६.८९ कोटी रुपयांचे विक्रीसाठी उपलब्ध शेअर्स (ऑफर फॉर सेल) यांचा समावेश आहे.**

आयपीओपूर्वी, कंपनीने ७२ प्रमुख गुंतवणूकदारांकडून ९१८.२७ कोटी रुपये उभारले. यासाठी प्रति शेअर ८७१ रुपये या दराने १,०५,४२,६५७ शेअर्सचे वाटप करण्यात आले. अँकर वाटपापैकी ६१.२७% हिस्सा ४६ योजनांच्या माध्यमातून देशांतर्गत म्युच्युअल फंडांना मिळाला, तर आयुर्विमा कंपन्या आणि पेन्शन फंडांचा वाटा ८.७४% इतका होता. अँकर गुंतवणूकदारांच्या यादीत एसबीआय म्युच्युअल फंड, आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल म्युच्युअल फंड, एचडीएफसी म्युच्युअल फंड, ब्लॅकरॉक, अबू धाबी इन्व्हेस्टमेंट ऑथॉरिटी, निप्पॉन इंडिया म्युच्युअल फंड, एसबीआय लाइफ इन्शुरन्स आणि एचडीएफसी लाइफ इन्शुरन्स यांसारख्या गुंतवणूकदारांचा समावेश होता.

धूत ट्रान्समिशनच्या आयपीओला ब्रोकरेज कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. आनंद राठी, चॉईस सिक्युरिटीज, आयसीआयसीआय डायरेक्ट, कुंवरजी वेल्थ सोल्युशन्स, स्वस्तिका सिक्युरिटीज, व्हेंचुरा सिक्युरिटीज, बीपी इक्विटीज आणि सुशील फायनान्स यांनी गुंतवणूकदारांना या इश्यूमध्ये गुंतवणूक करण्याची शिफारस केली आहे. ऑटोमोटिव्ह इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीममधील कंपनीचे स्थान लक्षात घेऊन धूत ट्रान्समिशनच्या गुंतवणुकीचा हा प्रस्ताव प्रामुख्याने ठेवण्यात आला आहे. ही कंपनी आयसी इंजिन आणि इलेक्ट्रिक-वाहने या दोन्ही प्रकारच्या वाहनांसाठी वायरिंग हार्नेस, सेन्सर्स, इलेक्ट्रॉनिक कंट्रोलर्स, ऑटोमोटिव्ह स्विचेस आणि बॅटरी पॅक्सचे उत्पादन करते. वायरिंग हार्नेस हे वाहनाच्या इलेक्ट्रिकल ३९;मज्जासंस्थे३९;प्रमाणे काम करते; तारा, केबल्स, कनेक्टर्स आणि टर्मिनल्स यांचे हे एक गुंफलेले जाळे असते, जे विविध घटकांच्या माध्यमातून वीज आणि इलेक्ट्रॉनिक सिग्नल वाहून नेते. वायरिंग हार्नेसमध्ये कंपनीची अत्यंत मजबूत स्थिती आहे. आर्थिक वर्ष २०२६मध्ये, धूतने भारताच्या दुचाकी वायरिंग हार्नेस बाजारपेठेत ३७.५८% वाटा मिळवला होता, ज्यामुळे पहिल्या दोन कंपन्यांमध्ये तिचा समावेश झाला, तर तीनचाकी वाहनांमधील तिचा वाटा ७०% पेक्षा जास्त होता, ज्यामुळे ती बाजारपेठेतील अग्रणी ठरली. दुचाकी आणि तीनचाकी वाहनांमधील तिचा एकत्रित बाजार हिस्सा ४१.०३% होता. ऑटोमोटिव्ह उद्योगाच्या विद्युतीकरणाकडे होणाऱ्या संक्रमणामध्ये सहभागी होण्यासाठीही कंपनी सज्ज आहे. तिच्या ऑटोमोटिव्ह उत्पादन पोर्टफोलिओपैकी सुमारे ९५% उत्पादने ही एकतर ईव्ही-केंद्रित किंवा पॉवरट्रेन-न्यूट्रल आहेत, ज्यामुळे आयसीई, हायब्रीड आणि ईव्ही प्लॅटफॉर्मवर त्यांचा वापर करणे शक्य होते. यामुळेच ईव्हीच्या माध्यमातून मिळणाऱ्या महसुलात वाढ झाली असून आर्थिक वर्ष २०२४मधील एकूण महसुलाच्या १६.१९% वरून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये तो २४.१७% पर्यंत गेला आहे.

आर्थिकदृष्ट्या, धूत ट्रान्समिशनने सातत्यपूर्ण प्रगती केली आहे. कंपनीच्या कामकाजातून मिळणाऱ्या महसुलात वाढ होऊन आर्थिक वर्ष २०२४ मधील २,७९७.७३ कोटींवरून आर्थिक वर्ष २०२६मध्ये

४,५२४.९६ कोटींवर पोहोचला; यामध्ये आर्थिक वर्ष २०२६ मधील ३१.३५% इतक्या वार्षिक वाढीचा समावेश आहे. याच कालावधीत ईबीआयटीडीए ५१२.४० कोटींवरून ७१०.९९ कोटींपर्यंत

वाढला, तर करपश्चात नफा २९८.७५ कोटींवरून ३९६.८४ कोटींपर्यंत वाढला. वायरिंग हार्नेसच्या पलीकडे जाऊन व्यवसायाचा विस्तार करणे हा विकासाचा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा

ठरतो आहे. बॅटरी पॅक्स, सेन्सर्स, कंट्रोलर्स, स्विचेस आणि इतर उत्पादनांपासून मिळणारा महसूल आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १,०३७.२३ कोटींवर पोहोचला, जो एकूण महसुलाच्या २२.९२% इतका होता; त्याच

वेळी एकूण महसुलातील वायरिंग हार्नेसचा वाटा ७७.०८% इतका राहिला. भारत आणि परदेशात मिळून कंपनीचे २३ उत्पादन प्रकल्प होते, ज्यांना अभियांत्रिकी केंद्रे आणि गोदामांची जोड होती; तसेच, आणखी दोन प्रकल्प उभारणीच्या टप्प्यावर होते.त्यामुळे, बाजारपेठेतील आघाडी, सातत्यपूर्ण आर्थिक वाढ, ओईएम सोबतचे दृढ संबंध, उत्पादनांच्या श्रेणीचा विस्तार आणि विद्युतीकरणाच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण सहभाग ही कंपनीची बलस्थाने आहेत.












































**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# शाळेच्या वेळेत शिक्षकांनी बाहेर जाऊ नये

## शाळाबाह्य बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावीत

## सभापती चेतनसिंह केदार यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

शाळेच्या वेळेत शिक्षकांनी कोणत्याही कारणासाठी शाळेबाहेर जाऊ नये. विद्यार्थ्यांच्या अध्यापनाचा वेळ प्रभावीपणे वापरला जावा. शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण करुन त्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशा सूचना जिल्हा परिषदेच्या शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार यांनी सर्व संबंधितांना दिल्या.

सोलापूर जिल्हा परिषदेकडील शिक्षण विभागाच्या आढावा बैठकीत बोलताना ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांचे आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षितता या तीनही बाबींना केंद्रस्थानी ठेवावीत, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच त्यांच्या आरोग्याचीही काळजी घेऊन 'विद्यार्थीहित प्रथम' या भूमिकेतून शिक्षण विभागाने काम करावे. प्रत्येक योजना वेळेत व प्रभावीपणे राबवावी.

प्रलंबित कामांना गती द्यावी. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वय साधत शिक्षणाची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना, विद्यार्थी पटनोंदणी, मोफत गणवेश, शाळांमधील मुलभूत सोयी-सुविधा, शाळा दुरुस्ती व बांधकामे, शिक्षक समायोजन, प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे आदींविषयीही विशेष लक्ष द्यावेत, असेही त्यांनी सांगितले.




### हृदय शस्त्रक्रिया : ३९ पैकी २८ विद्यार्थी तयार

सर्व शिक्षा अभियानांतर्गत शाळानिहाय विद्यार्थ्यांची करण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणीदरम्यान हृदयविकाराची समस्या आढळलेल्या ३९ विद्यार्थ्यांची हृदय शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. त्यापैकी २८ विद्यार्थी मुंबई येथे उपचारासाठी जाण्यास तयार झाले आहेत. उर्वरित विद्यार्थी व पालकांचे समुपदेशन करुन त्यांना उपचारासाठी तयार करावे, अशा सूचनाही सभापती चेतनसिंह केदार यांनी दिल्या.

यावेळी शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्यासह विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.



# उड्डाणपुलांच्या अलाइनमेंट बदलले; महापालिकेचे २५ कोटी रुपये वाचले

## आयुक्त ओम्बासे यांचा निर्णय

## रेल्वे निवासस्थानेही वाचली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

शहरातील बोरामणी नाका व जुना पुणे नाका ते विजापूर रोडला जोडणाऱ्या प्रस्तावित उड्डाणपुलांच्या भूसंपादनाचा अडथळा आता दूर होण्याच्या मार्गावर आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या पुढाकाराने उड्डाणपुलाच्या अलाइनमेंटमध्ये बदल करून महापालिकेचे तब्बल २५ कोटी रुपये वाचविण्यात आले आहेत. आयुक्त ओम्बासेंच्या तांत्रिक निर्णयाने रेल्वे निवासस्थानेही वाचली. महापालिकेवरील कोट्यवधींचा आर्थिक भार टळला आहे.

उड्डाणपुलाचा प्रस्तावित मार्ग रेल्वे अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या परिसरातून जात असल्याने रेल्वे प्रशासनाने नुकसान भरपाईपोटी २५ कोटी रुपयांची मागणी केली होती. आयुक्तांच्या निर्देशानुसार नगररचना विभागाचे कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी प्रस्तावित मार्गात निवासस्थानाचा केवळ कोपरा येत असल्याचे स्पष्ट झाले.त्यानंतर तांत्रिक बाबींचा विचार करून उड्डाणपुलाचे अलाइनमेंट अवघ्या दोन फुटांनी बाजूला करण्यात आले. त्यामुळे रेल्वेची निवासस्थानेही वाचली आणि महापालिकेला २५ कोटींची भरपाई देण्याची गरज राहिली नाही. डीआरएम कार्यालयासमोरील दोन इलेक्ट्रिक ट्रान्सफॉर्मर उड्डाणपुलाच्या मार्गात अडथळा ठरत असून, ते स्थलांतरित करण्यासाठी रेल्वेकडून सुमारे तीन कोटींची मागणी करण्यात आली आहे. मात्र २०२२ मध्येच उड्डाणपुलाच्या मार्गाचे गॅझेट प्रसिद्ध झाले असल्याने या मागणीवर पर्याय शोधण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

### रेल्वे, बीएसएनएल, पोस्ट ऑफिसची जागा

रेल्वेची जागा ३५ वर्षांच्या करारावर घेण्याचा निर्णय झाला असून, बीएसएनएलच्या जागेची बाजारभावानुसार किंमत निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पोस्ट ऑफिसच्या जागेच्या बदल्यात पर्यायी जागा देण्याचा पर्यायही स्वीकारला जाणार आहे. त्यामुळे विविध जागांबाबत तोडगा निघत असून उड्डाणपुलासाठी आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.



सोलापूर : दै.तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त समूह मुख्य संपादक दिलीप पेठे व मुख्य संपादक प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना ज्येष्ठ पत्रकार राजा माने. यावेळी पत्रकारद्वय नारायण चव्हाण, महादेव आवारे.

## महत्वाचे...



### पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघाच्या वतीने कर्तृत्ववान, पदोन्नतीधारकांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

पद्मशाली समाज सेवानिवृत्त संघाचे वतीने समाजातील कर्तृत्ववान व पदोन्नतीधारकांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये 'एलएलएम'मध्ये सुवर्णपदक प्राप्त अमर जिंदम, इकॉनॉमिक्स विषयात पीएचडीप्राप्त स्वप्ना सादूल, नीट परीक्षेत यश संपादन केलेल्या श्रीलेखा गुंटुक, राष्ट्रीय पॉवललिफ्टींग स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त राजमहिंद्र येमूल, सौ.भू.म.पुल्ली कन्या प्रशालेच्या प्राचार्यापदी पदोन्नती मिळालेल्या उमा कोटा, अरकाल प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिकापदी पदोन्नती मिळालेल्या भाग्यलक्ष्मी जन्याराम, कनिष्ठ लेखापालपदी पदोन्नती मिळालेले श्रीकांत दासरी, भरत नाट्यम् स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर बक्षीस प्राप्त अनुष्का अरकाल यांचा समावेश आहे. सुरेश श्रीराम, श्रीहरी कुरापाटी, संगीता इंदापुरे, अरुणा कन्ना, भारती सग्गम यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. प्रारंभी श्रीमार्कंडेय महामुनी प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. यावेळी यशवंत इंदापुरे, सत्यनारायण बरदेपूर, उमापती मिठ्ठापल्ली, अंबादास इंदापुरे, श्रीनिवास वल्लाकाटी, अनिल जन्यारम, नागेश कोंगारी, लक्ष्मीबाई तुम्मा, वरलक्ष्मी गोटीपामूल, सुरेखा गोली, वरलक्ष्मी पल्ली, नागनाथ वड्डेपल्ली, अविनाश संगा, विवेकानंद कोटा, सुनिल माडा, चंद्रकांत गंजी आदी उपस्थित होते. अनिल कन्ना यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भास्कर अल्ली, देवीदास मेरगू, शाम बेनगिरी अंबादास कंची, श्रीनिवास बोलाबत्तीन, सुशिलकुमार चिलका आदींनी परिश्रम घेतले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील पद्मशाली बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### भाजपा ओबीसी मोर्चा देणार संघटनशक्तीवर विशेष भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

भारतीय जनता पार्टीच्या संघटनशक्तीवर विशेष भर देण्याचा एकमुखी निर्णय भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर व जिल्हा ओबीसी मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांची बैठकीत घेण्यात आली. भाजपा ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार योगेश टिळेकर हे अध्यक्षस्थानी होते. सोलापूर शहर ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विजय महिंद्रकर व सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्ष विनायक सुतार यांच्या पुढाकारातून या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी धाराशिवचे जिल्हाध्यक्ष विजय शिंगाडे, ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, अंबादास बिंगी, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, संदीप जाधव, नगरसेवक मेघनाथ येमुल, सत्यनारायण गुर्रम, भारत बडूरवाले, प्रशांत पल्ली, राजश्री धोत्रे, खांडेकर यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## वीरशैव समाजाला सामोरे जावे लागत आहे अनंत अडचणींना : सिध्दारुढ निंबाळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

वीरशैव समाजातील ओबीसी असणाऱ्यांना जात प्रमाणपत्रे व सवलतींचा लाभ मिळविणे, महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास मंडळाकडील प्रकरणे यांसह अनंत अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वीरशैव समाजबांधवांच्या अडचणी दूर करण्याकामी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जातीने लक्ष घालण्याची गरज बनली आहे, असे प्रतिपादन वीरशैव सेवा संघाचे संस्थापक सचिव सिध्दारुढ निंबाळे यांनी केले. वीरशैव सेवा संघाच्या वतीने विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. युवा भारत रोजगार पार्टीचे संस्थापक अध्यक्ष बसवराज येरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत जनगणना, मतदार नोंदणी, एसआयआर नोंदणी यांसह जनजागृतीपर कार्यक्रम आदींविषयी चर्चा करण्यात आली. यावेळी नागनाथ पाटील, सिध्दाराम कोनापुरे, भुजंग घोंगडे, संतोष वैरागकर, नागेश धरणे आदी उपस्थित होते.

## व्हॅलेंटाईन सर्कल स्कूलचा वर्धापन दिन साजरा

**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

व्हॅलेंटाईल सर्कल इंग्लिश मिडियम स्कूलच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कलाप्रेमी कलाध्यापक संघाचे खजिनदार संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा. देवेंद्र निंबर्गीकर यांच्या हस्ते कलाप्रदर्शनाचे उद्घाटन व सरस्वती पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ललिता मार्चला यांनी केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्याक्षा यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सुप्रिया बोम्मा उपस्थित होते. शाळेचे कला शिक्षण इंद्रजित चव्हाण यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनातून मुलांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे, संकल्पचित्रे, पेन्सिल स्केच, रचना चित्रे, निसर्ग चित्रे अशा अनेक कला प्रकारांचे प्रदर्शन करण्यात आले. सूत्रसंचालन श्वेता येमेकर, तेजश्री पगडीमल यांनी केले. आभार इंद्रजित चव्हाण यांनी मानले.

## 'एमएसईबी'च्या गलथान कारभारामुळे सत्यसाईबाबा नगर परिसरातील नागरिक संतप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड परिसरातील सत्यसाईबाबा नगर येथे महावितरणच्या गलथान कारभारामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

सोमवारी दुपारी सुमारे ४ वाजल्यापासून ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत या परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होणे तसेच काही क्षणांतच पुन्हा सुरू होणे, अशा प्रकारे अनेक वेळा वीज ये-जा झाल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वारंवार वीजपुरवठा सुरू-बंद झाल्यामुळे परिसरातील अनेक घरांमधील लाईट, ट्यूबलाईट, फ्रिज, कुलर, पंखे, एलईडी टीव्ही, लॅपटॉप, इतर इलेक्ट्रॉनिक व विद्युत उपकरणांचे नुकसान झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अचानक वीजपुरवठ्यात होणाऱ्या या चढ-उतारामुळे महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू खराब होण्याची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. काही घरांमध्ये उपकरणे बंद पडल्याने नागरिकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

वादळ, जोरदार वारा किंवा पाऊस नसतानाही सत्यसाईबाबा नगर परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. परिसरातील नागरिकांनी यापूर्वीही महावितरणच्या संबंधित कार्यालयाकडे तसेच तक्रार यंत्रणेकडे अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत. मात्र, वारंवार तक्रारी करूनही या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात महावितरणला अपयश आले असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

वारंवार तक्रारी करूनही समस्या कायम आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्याऐवजी वारंवार लाईट बंद-चालू होत असल्याने आमच्या घरातील महागडी उपकरणे खराब होत आहेत.

उपकरणांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल सत्यसाईबाबा नगरमधील रहिवाशांनी उपस्थित केला आहे.या परिसरातील वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मर, फिडर, केबल तसेच अन्य विद्युत यंत्रणेची तातडीने तपासणी करून वीजपुरवठ्यातील तांत्रिक बिघाड कायमस्वरूपी दूर करावा, कमी-जास्त होणारा व्होल्टेजचा प्रश्न सोडवावा आणि वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार थांबवावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## पीएसआय डांगे यांनी विविध स्पर्धेत मिळविले पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.११ ऑगस्ट**

कोल्हापूर येथे पार पडलेल्या २१व्या परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांनी विविध स्पर्धेत यश संपादन केला आहे. त्यांच्या या यशामुळे सोलापूर ग्रामीण पोलीस दलाची आणि जिल्ह्याची मान उंचावली आहे.

''फारेन्सिक सायन्स रिटन टेस्ट'' या स्पर्धेत प्रथम क्रमांक, ''क्रिमीनल इन्व्हेस्टीगेशन क्रिमीनल लॉ रूल अँड प्रोसेजर या स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर ''लेबलिंग ,हँडलिंग अँड पॅकींग टेस्ट'' या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला आहे. श्री. डांगे यांचे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक नीलोत्पाल आणि उपस्थित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



श्री. डांगे यांचे पोलीस सोलापूरचे अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सूरज जगताप, मंद्रूप पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, सहायक पोलीस निरीक्षक देविदास कारंडे, पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे आदींनी अभिनंदन केले.

# 'गुळव्वा'द्वारे जोपासण्यात आली माती अन् निसर्गाची परंपरा

### महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील अनोखी लोकपरंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

गुळवन मन्ना तरलीला... अशी गाणी म्हणत दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील मुले शेतातून माती आणत 'गुळव्वा'द्वारे माती अन् निसर्गाची परंपरा जोपासली. ही परंपरा सीमावर्ती भागातील दोन्ही राज्यांची संस्कृती, भाषा आणि ग्रामीण जीवन किती एकमेकांत मिसळलेले आहे, याचे उत्तम उदाहरण आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील या अनोख्या लोकपरंपरेच्या माध्यमातून घराघरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

गुळव्वा ही महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात विशेषतः सोलापूर, अक्कलकोट आणि लगतच्या कन्नड-मराठी भाषिक गावांमध्ये साजरी केली जाणारी एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण लोकपरंपरा आहे. माती, निसर्ग आणि शेती संस्कृतीशी एकोपा दर्शवणारा हा सण प्रामुख्याने लहान मुलांचा आणि आनंदाचा सण मानला जातो. हा खेळ



किंवा परंपरा नागपंचमीच्या सणाआधी येणाऱ्या चार मंगळवारी किंवा विशिष्ट दिवसांमध्ये साजरी केली जाते.

ग्रामीण भागात लहान मुले शेतातील काळी माती आणून त्यापासून लहान-लहान बैल, नागोबा किंवा मानवी आकृतींसारख्या खेळण्यांच्या मूर्ती तयार करतात. या मातीच्या रचनेला स्थानिक भाषेत 'गुळव्वा' असे म्हटले जाते. चारही आठवडे या मातीच्या मूर्तींची पूजा केली जाते. मुले एकत्र जमून पारंपरिक गाणी गातात. या सणादरम्यान मुले गावोगावी फिरताना विशिष्ट लोकगीते किंवा कन्नड-मराठी मिश्रित घोषणा देतात.

नागपंचमीच्या आधी किंवा नागपंचमीच्या दिवशी या सर्व मातीच्या गुळव्वा मूर्तींचे अत्यंत उत्साहात, गाणी म्हणत आणि नाचत शेतजमिनीत किंवा पाण्याच्या स्त्रोताजवळ विसर्जन केले जाते.

मातीतून जन्माला आलेली ही गुळव्वा पुन्हा मातीत विसर्जित करुन, पुढील सुगीच्या आणि शेतीच्या हंगामासाठी निसर्गाचे आभार मानले जातात. गावागावातील लहान मुले आणि बच्चेकंपनी एकत्र येऊन अत्यंत उत्साहाने या परंपरेत सहभागी होतात.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१५३०

**आपुलिया अज्ञानासाठीं । नव्हता थांवला किरीटी ।**
**तरी आतां आत्मज्ञानाचेनि लोटीं । खांडेनि गा ।।**

संसारवृक्ष हा आभास आहे. ज्याला हा आभास खरा वाटतो, तो अज्ञानी म्हणून ओळखावा असे भगवंत अर्जुनाला म्हणाले. या संसारवृक्षाला उत्पत्ती नाही व नाशही नाही, कारण मुळात तो नाहीच. या संसाराकडे विचारपुर्वक पाहण्याचे ठरविले तर आपणाला याचे खरे रुप सापडतच नाही. सहज विचार केला तर संसार आहेच असे वाटते. मिथ्याभासामध्ये माणूस अडकुन पडतो. माकड पाण्यात आपले प्रतिबिंब पाहून त्याच्याबरोबर खोडया करते. प्रतिबिंब हेच मुळात खरे नसल्याने त्या माकडाच्या चेष्ठा निरर्थक जात असतात. सागरात लाटा निर्माण होणे आणि नष्ट होणे, वीज चमकणे आणि नष्ट होणे यापेक्षाही विश्वाभासरुपी वृक्षाचे प्रगट होणे आणि लयाला जाणे अतिजलद वेगाने आहे. प्रत्यक्षात संसारवृक्षाची सुरुवात, मध्य, अंत हे कांहीही नाही. हा केवळ भ्रम असल्याने या भ्रमात अडकुन पडण्यापेक्षा बाहेर निघणेच योग्य आहे. संसारवृक्ष भ्रमानेच निर्माण झाला आणि निर्मीती नंतर त्यांने पुन्हा भ्रम निर्माण केला म्हणून हा भ्रम घालण्यासाठी, हा भ्रमरुप संसारवृक्षच उपटून टाकललेला बरा असे सांगतांना भगवंत म्हणाले, **आपुलिया अज्ञानासाठीं । नव्हता भावला किरीटी । तरी आतां आत्मज्ञानाचेनि लोटीं । खांडेनि गा ।।** अर्थात, मुळात नसलेला हा संसारवृक्ष केवळ आपल्या भ्रमामुळे म्हणजे अज्ञानामुळे तो वाढत असल्याने, याला आत्मज्ञानाच्या खडगाने नष्ट करावे. आत्मज्ञानामुळे याचा कायमचा बंदोबस्त करणे शक्य असल्याचे भंगवत म्हणाले. या संसारवृक्षाला नष्ट करण्यासाठी आत्मज्ञानाव्यतिरिक्त जेवढे उपाय केले जातील तेवढे सर्व उपाय संसारवृक्षाच्या नाशाऐवजी त्याच्या वाढीस कारणीभुत होत असतात. म्हणून आत्मज्ञानाचाच येथे वापर करावा. सुर्य या अंधाराचा नाश करतो, तसे आत्मज्ञान या संस्कार वृक्षाचा नाश करु शकेल. मुळात मी म्हणजे काय? हेच माणसाला आजपर्यन्त समजले नाही. तरी पण माणूस मी मध्ये गुरफटुन राहतो. या मी मुळे संसांरवृक्ष फोफावला जातो. हे माझे, ते माझे, मी करेन, मी करणार नाही वगैरे सर्व ठिकाणी मी-मी म्हणत गेल्याने हा खोटा संसारवृक्ष खरा वाटू लागतो. अशा ख-या वाटण्यामूळे माणूस मोह, दु:ख, स्वार्थ, अभिमान आदीमध्ये अडकतो. अर्थात मी म्हणणा-याला माया जखडुन ठेवते. एकदा का मायेने जखडले की तिच्यापासुन सुटका होणे शक्य नाही. ही सुटका केवळ आत्मज्ञानानेच होऊ शकते. सुखी जीवनासाठी आत्मज्ञानाच्या सहाय्याने आपण मायेपासून सुटका करुन घेतलीच पाहीजे. स्वत:ला आत्मज्ञान मिळविणे शक्य नसेल तर, ज्याला आत्मज्ञान प्राप्त झाले आहे, त्याच्या सहवासात जावे लागेल. त्याच्या मार्गदर्शनाने मायेला बाजुला सारुन, स्वत:चा शोध घ्यावा. माणसाला जेव्हा स्वत:चा शोध लागेल, तेव्हा तो ख-या अर्थाने मानवी जीवनाचे महत्व समजू शकेल. माऊलीची श्री. ज्ञानेश्वरी आपणाला आपला परिचय करुन देण्यास पुरेशी आहे, यात शंका नसावी. जय राम कृष्ण हरी।



**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार, | १७६५: अलाहाबादचा तह |
| दि. १२ ऑगस्ट २०२६ | झाला, ज्यामुळे भारतात |
| विक्रम संवत् २०८३ । | कंपनी राजवटीची सुरुवात |
| शके -१९४८ | झाली. |
| संवत्सर - पराभव | १८३३: अमेरिकेतील |
| मास - आषाढ कृ. अमावस्या | शिकागो शहराची स्थापना |
| ऋतु - वर्षा । | झाली. |
| नक्षत्र- पुष्य(०७.५९) | १८५१: आयझॅक सिंगर |
| योग - व्यतिपात (१५.२५) | यांना शिलाई मशीनचे पेटंट |
| करण - चतुष्पाद (१२.२७) | मिळाले. |
| राहू काल : बुधवार | १९०८: फोर्ड कंपनीची |
| दु. ०३.०० ते ०४.०० | पहिली 'मॉडेल टी' कार |
| दिनविशेष : | तयार झाली |



## चव्हाण मोटर्समध्ये ब्रेझाच्या नव्या व्हर्जनचे दिमाखात अनावरण

**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

सोलापूरच्या होटगी रोड येथील चव्हाण मोटर्स शोरूममध्ये मारुती सुझुकी ब्रेझाच्या नव्या व्हर्जनचे अनावरण आमदार देवेंद्र दादा कोठे व महापौर विनायक दादा कोंड्याल यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित राहून चव्हाण परिवाराच्या ३५ वर्षांच्या ऑटोमोबाईल क्षेत्रातील उल्लेखनीय वाटचालीचा गौरव करण्यात आला. शिवप्रकाश ऊर्फ बाबू चव्हाण यांनी चव्हाण मोटर्सच्या प्रगतीचा आढावा घेताना देशातील २० सर्वोत्तम उद्योजकांमध्ये कंपनीचा समावेश असून, १२०० तरुण-तरुणींना रोजगार उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. आमदार कोठे यांनी मारुती सुझुकीच्या परवडणाऱ्या किंमती, उत्तम मायलेज, कमी देखभाल खर्च व चांगली रिसेल व्हॅल्यूचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता बोल्ली-गोरंटला यांनी केले.

## प्रलंबित शासकीय देयकांचा मार्ग मोकळा; ३ लाख कंत्राटदारांना दिलासा

**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील शासकीय विकासकामे करणारे कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंते, मजूर संस्था व विकासक यांच्या प्रलंबित देयकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय झाला आहे. संबंधित प्रस्तावाला राज्यसभा व लोकसभेने ३ आणि ७ ऑगस्ट रोजी मंजुरी दिल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेचे राज्याध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले यांनी दिली. ऑक्टोबर २०२४ पासून या योजनेसाठी संघटनांनी पाठपुरावा केला. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी मंत्रालयात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रस्ताव स्वीकारण्यात आला. पुढील पाठपुराव्यानंतर केंद्रस्तरावर मंजुरी मिळाल्याने महाराष्ट्रातील सुमारे ३ लाखांसह देशभरातील लाखो कंत्राटदारांना प्रलंबित देयके मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# २०१ रोजंदारी, बदली कर्मचाऱ्यांना कायम सेवेचा मार्ग मोकळा

### स्थायी समितीची मंजुरी, ऑगस्टच्या मनपा सभेत येणार प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महापालिकेतील रोजंदारी आणि बदली कर्मचाऱ्यांच्या कायम सेवेच्या प्रश्नाला मुहूर्त मिळाला आहे. सोमवारी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत सध्या कार्यरत असलेल्या २०१ रोजंदारी व बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. स्थायी समितीची मंजुरी मिळाल्याने आता हा प्रस्ताव ऑगस्ट महिन्यातील सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येणार असून, त्यानंतर शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला जाणार आहे.

स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत एकूण नऊ विषयांना मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या विविध विभागांत सन १९९५ नंतर रोजंदारी व बदली पद्धतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. शहराची हद्दवाढ झाल्यानंतर मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाल्याने आरोग्य, नगर अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता तसेच उद्यान विभागात मोठ्या प्रमाणावर तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी घेण्यात आले.

२५७ कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात आली होती. त्यातील मृत, सेवानिवृत्त, दीर्घकाळ गैरहजर, न्यायालयीन आदेशानुसार कायम झालेले कर्मचारी वगळल्यानंतर सध्या २०१ कर्मचारी कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले. उपलब्ध कायम पदांचा आढावा घेतल्यानंतर विविध संवर्गातील प्रवर्गनिहाय ४५ कायम पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले. उर्वरित १५६ कर्मचाऱ्यांसाठी १५ अधिसंख्य आणि १४१ कायमस्वरूपी पदांची निर्मिती करावी लागणार आहे. महापालिका सेवकांच्या सेवानिवृत्ती उपदान व मृत्यू उपदानाची कमाल मर्यादा १४ लाखांवरुन २० लाख रुपये करण्यासही स्थायी समितीने मंजुरी दिली. स्थायी समितीच्या मंजुरीनंतर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने सभापती रंजिता चाकोते यांचा सत्कार करण्यात आला. **विविध विकासकामांनाही मंजुरी**

कुचननगर, दत्तनगर-गिरी झोपडपट्टी, एकतानगर, वीरशैव लिंगायत गवळी सांस्कृतिक भवन परिसर व पाटील चाळ येथील समाजमंदिर परिसरातील सभा मंडप, समाजमंदिर, नागरी सुविधा व हॉल बांधका, राजेंद्र स्वामीनगर येथील गार्डन सुशोभीकरण, अंत्रोळीकरनगर आणि शहानगर-लिमयेवाडी, समाधाननगर, ज्ञानेश्वर माऊली मंदिर व पंचमुखी हनुमान मंदिर परिसरातील सभा मंडप. तेलंगी पाच्छा पेठेतील श्री इच्छाप्राप्ती गणेश मंदिरासमोरील फरशीकरण. वाल्मिकी समाज व सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाजासाठी सांस्कृतिक समाजमंदिर. बुधवार पेठेतील प्रभाग क्रमांक ५ 'ड'मधील समाजमंदिर परिसरातील विविध विकासकामे. महेश थोबडे नगर, जयलक्ष्मी नटराज नगर व कुमारस्वामी नगर येथील सभा मंडप, अल्ली महाराज पटांगणाजवळ विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका आणि मनपा शाळा क्रमांक ५ करंजकर विद्यालयाच्या इमारतीचे काम.

**महापालिकेवर ७.२५ कोटींचा भार**

२०१ कर्मचाऱ्यांना कायम केल्यानंतर त्यांच्या वेतनापोटी महापालिकेवर ७ कोटी २५ लाख ७७ हजार २४८ रुपयांचा अतिरिक्त खर्च येणार असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना कायम सेवेचा लाभ मिळणार असला तरी महापालिकेच्या वेतन खर्चात वाढ होणार आहे.

## आदर्श समोर ठेवल्यास सदाचार घडेल

आचार म्हणजे आचरण, हातून घडणारी क्रिया, आपले वागणे, वर्तणूक. आपला आचार योग्य हवा, शुद्ध हवा, चांगला हवा. प्रत्येकाशी आपुलकीने वागावे. आपल्या मनाचा, संवेदनांचा भाव भावनांचा सदविचारांचा प्रतिबिंब आपल्या आचारातून म्हणजेच कृतीतून डोकावत असते. संतांच्या, महापुरुषांच्या चरित्रातून दिसणारे त्यांचे आचरण समजून घ्या. त्यांचा आदर्श समोर ठेवून वागा, म्हणजे हातून सदाचार घडेल, असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.




बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चतुमसित त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या, ''सुसंस्कार असतील तर वागणं ही उत्तम असेल. सदाचारी बना. मन शुद्ध, पवित्र, संतुलित, संयमी असेल. वृत्ती आनंदी असेल. विचार परिपक्क असतील तर वर्तन निर्मळ, शुद्ध,चोख असेल. आपल्या अंतर्मनातील भाव उत्तम हवेत.भाव उत्तम असतील तर हातून क्रियाही उत्तम घडतील, कर्म बंध होणार नाही. संयमात राहता येते, सम्यक दर्शन प्राप्त होते. मन, वचन आणि काया यामध्ये समता भाव प्रकट झाल्यामुळे आत्मानंदाचा अनुभव घेता येतो. भाव उत्तम असतील तर मन, वचन आणि काया प्रभावित होते, असे बोलताना त्या म्हणाल्या, भाव जर उत्तम नसेल तर कोणत्या ना कोणत्या कारणाने आणि मार्गाने त्याचा आपल्या वर्तनावर फरक पडतो. आपण अंतर्मनात जपून ठेवलेले आपले भाव प्रदर्शित होतात.चांगले वाईट, योग्य अयोग्य काय हे ठरल्यानंतर त्या विचाराला आचारातून किंवा उच्चारातून व्यक्ती प्रकट करत असतो.अविचाराने हातून नको ते घडते, नको ते बोलले जाते.म्हणून वागण्यापूर्वी विचार करायला हवा.आधी विचार मग आचार हे सूत्र लक्षात ठेवा. विचार परिपक्क असतील तर उत्तम कृती घडेल.

**- मल्लेश पुरवंत**

## संत नामदेव विठ्ठल मंदिरात मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

बाळीवेस परिसरातील संत नामदेव विठ्ठल मंदिरात श्री संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या ६७६ व्या संजीवनी समाधी सोहळ्या प्रित्यर्थ मिश्रीबाई गुलाबचंद तोष्णीवाल नेत्रपेढी व श्री नामदेव विठ्ठल मंदिर विश्वस्त मंडळ यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.



या शिबिरात तब्बल १०० पेक्षा जास्त लोकांनी सहभाग नोंदविला व त्यापैकी ४० नेत्र रुग्णांची मोफत नेत्र शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली प्रारंभी हभप सुधाकर महाराज इंगळे, डॉ. नवनीत तोष्णीवाल डॉ. निखिल तोष्णीवाल,श्री मुरलीधर रेळेकर यांच्या हस्ते श्री संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलनाने शिबिराची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी हभप सुधाकर महाराज इंगळे यांनी शुभ आशीर्वचन दिले. डॉ. नवनीत तोष्णीवाल, डॉ. निखिल तोष्णीवाल यांनी नेत्र रुग्णांना मार्गदर्शन केले. प्राध्यापक मुक्तेश्वर मुळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी जोधपूर येथील डॉ. गुफरान कामदार उपस्थित होते. बाळकृष्ण राशीनकर, पुरुषोत्तम राशिनकर, सचिन बारटक्के, गोवर्धन निकते मनोज भस्मे अनिल बोंडगे, अनिकेत जवंजाळ, राजेश केकडे, कृष्णा रेळेकर, गुरुनाथ पतंगे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शिवराज नगरकर, आभार नागेश राशिनकर यांनी मानले.

## स्वातंत्र्यदिनी कामगार हिताच्या घोषणांची भेट द्या

### महापालिका कामगार संघटना कृती समितीचे महापौर, आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर महापालिका कामगारांच्या विविध आर्थिक व सेवाविषयक मागण्यांबाबत १५ ऑगस्ट रोजी सकारात्मक घोषणा कराव्यात, अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने करण्यात आली. कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली महापौर आणि महापालिका आयुक्तांना याबाबतचे निवेदन देण्यात आले.

दरवर्षी महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला जातो. त्यानिमित्त महापालिका कामगारांना त्यांच्या आर्थिक हिताच्या मागण्यांबाबत घोषणा करून स्वातंत्र्य दिनाची भेट द्यावी, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. कृती समितीने पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महापालिका कामगार-कर्मचाऱ्यांना १० टक्के महागाई भत्ता जाहीर करून तफावत दूर करावी, अशी पहिली मागणी आहे. बालवाडी शिक्षिका, आशा वर्कर, लिंक वर्कर तसेच मानधनावरील कामगारांच्या मानधनात एक हजार रुपयांची वाढ करावी अथवा त्यांना किमान वेतन लागू करावे. महापालिकेतील २४९ रोजंदारी व बदली कामगारांना कायम करण्यासाठी ऑगस्टअखेर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची घोषणा करावी. पाचवा, सहावा व सातवा वेतन आयोगातील फरकाची रक्कम, थकीत महागाई भत्ता आणि अन्य फरकाची रक्कम मिळून सुमारे ३५० कोटी रुपयांची देय रक्कम आहे. ही रक्कम कामगारांना देण्यासाठी कालबद्ध नियोजन जाहीर करावे. महापालिकेने यापूर्वी जाहीर केलेल्या कॅशलेस उपचार पद्धतीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी आदेश निर्गमित करावेत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी लिंबराज जेटीथोर, शशिकांत शिरसट, बाबासाहेब क्षीरसागर, अजय क्षीरसागर, दत्ता तुळसे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विडी कामगारांच्या किमान वेतनाचा मार्ग मोकळा

### ३७९ व ३६१ वेतनाची अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य विडी कामगार संघ व भारतीय मजदूर संघाच्या सातत्यपूर्ण संघर्षाला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे १० नोव्हेंबर २०१४ रोजीची किमान वेतन अधिसूचना अद्याप वैध असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार विडी कामगारांना परिमंडळ-१ मध्ये ३७९, तर परिमंडळ-२ मध्ये ३६१ प्रतिदिन किमान वेतन देय ठरणार आहे.



१६ एप्रिल रोजी मुंबईत झालेल्या कामगार मोर्चात मागणी जोरदारपणे मांडण्यात आली होती. ६ मे व २ जून रोजी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत त्रिपक्षीय बैठका झाल्यानंतर भारतीय मजदूर संघाने ५ जून रोजी निवेदन सादर केले. या बैठकीत नामदार आकाश फुंडकर यांच्यासोबत मा कामगार आयुक्त ए .पी. तुम्मोड, कामगार उपायुक्त संकेत कानडे, कामगार सचिव, अपर कामगार आयुक्त, महाराष्ट्र बिडी उद्योग संघचे सुनील क्षेत्रीय, देवांग साबळे, ठाकुर- देसाई व इतर ३१बिडी कारखानदार आणी भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. अनिल ढुमणे, सरचिटणीस किरण मिलगीर, बीडी कामगार संघ सरचिटणीस उमेश विश्वाद, निलेश खरात, अर्जुन चव्हाण, चंद्रकला जाना, सुरेखा गुंडा, लता ढगे उपस्थित होते. कामगार आयुक्तांनी १० जून रोजी शासनास अहवाल दिला. आता २.५६ लाख विडी कामगारांमध्ये जनजागृतीसाठी राज्यभर दौरे व मेळावे घेण्यात येणार असून, अंमलबजावणीसाठी व्यापक लढा उभारणार असल्याचे भारतीय मजदूर संघाचे प्रदेश उपाध्यक्ष सचिन मेंगाळे यांनी सांगितले.

## भारतमाता नगरात थंडीतापाच्या आजाराने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

थंडी तापाच्या आजाराने एक ४५ वर्षीय महिला उचारापूर्वी मयत झाली. ही घटना होटगी रोडवरील भारतमाता नगरात सोमवारी दुपारच्या सुमारास घडली.

जयश्री अमर दिंडोरे (वय ४५ रा. ३७४ भारतमाता नगर) असे मयत महिलेचे नाव आहे. त्यांना रविवारी सायंकाळपासून घरात असताना थंडी-ताप आणि पाठीत दुखत होते. त्यांना हत्तुरेवस्ती येथील खासगी रुग्णालयात उपचार करून सोमवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास अमर दिंडोरे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.



## क्रांती म्हणजे विचारांच्या परिवर्तनाची प्रक्रिया

### एलबीपीएम महाविद्यालयात डॉ. महेश जाधव यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

सोलापूर क्रांती म्हणजे केवळ एका सत्तेचा अस्त आणि दुसऱ्या सत्तेचा उदय नाही. माणसाच्या विचारांमध्ये, समाजाच्या जाणिवांमध्ये आणि व्यवस्थेच्या मूल्यांमध्ये घडणारे मूलभूत परिवर्तन म्हणजे खरी क्रांती आहे. क्रांतीत अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य, समाजाला नवा विचार देण्याची ताकद आणि राष्ट्रहितासाठी स्वतःच्या स्वार्थाचा त्याग करण्याची वृत्ती सामावलेली असते. भारतीय स्वातंत्र्यलढा हा अशाच असंख्य ज्ञात-अज्ञात देशभक्तांच्या त्यागातून उभा राहिलेला लोकलढा होता असे प्रतिपादन परभणी येथील कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. महेश जाधव यांनी केले.

सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात ऑगस्ट क्रांती दिनाच्या औचित्याने स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाचा आणि क्रांतिकारी विचारांचा वेध घेणाऱ्या विशेष आभासी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर पवार होते. प्रास्ताविक डॉ. संतोष मारकवाड यांनी केले. तर आभार डॉ. दशरथ रसाळ यांनी मानले.

**स्वातंत्र्य हा जबाबदारीने जपण्याचा अमूल्य ठेवा**

यावेळी डॉ. महेश जाधव यांनी विद्यार्थिनींना जाणीव करून दिली की, अनेक ज्ञात-अज्ञात देशभक्तांच्या बलिदानामुळेच आज आपण मुक्तपणे विचार करतो, बोलतो आणि आपले भविष्य निवडतो. मिळालेल्या प्रत्येक स्वातंत्र्यामागे कोणाच्या तरी त्यागाची किंमत आहे. म्हणून स्वातंत्र्य हा आपल्याला वारशाने मिळालेला केवळ अधिकार नाही; तो जबाबदारीने जपण्याचा अमूल्य ठेवा आहे.

# सद्भावना तिरंगा केंद्रावर यंदा प्रथमच भारतमातेची आकर्षक मूर्ती

### दिव्यकांत गांधी; १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान तिरंगा वस्तू, मिठाई उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर सद्भावना वंदे मातरम् मंडळाच्या वतीने यंदाही 'एकता उत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. सद्भावना तिरंगा केंद्र (बंगला)यंदा प्रथमच ३.५ ते ४ फूट उंचीची फायबरची आकर्षक भारतमाता मूर्ती उपलब्ध करून देण्यात आली आहे. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान तिरंगा वस्तू , मिठाई उपलब्ध राहणार आहेत, अशी माहिती सद्भावना सेवा दलाचे दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



३४ व्या वर्षात पदार्पण केलेला आणि ६४ व्यांदा आयोजित करण्यात येणाऱ्या या उत्सवाची मोठी तयारी करण्यात आली आहे. या केंद्रावर ६ बाय ९ फुटांचा व ४ बाय ६ फुटांचा राष्ट्रध्वज, तिरंगा फ्लॉक-जॅकेटसह विविध देशप्रेमाच्या वस्तू तिरंगा केंद्रावर उपलब्ध असतील. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान सद्भावना तिरंगा केंद्रावरून तिरंगा वस्तू आणि मिठाईचे वितरण करण्यात येणार आहे. यंदा प्रथमच बालूशाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय ड्रायफ्रूट तिरंगा मिठाई, केशर लाडू, ड्रायफ्रूट मसाला चिवडा, मसाला शेव-दाळ आदी पदार्थ उपलब्ध असतील.

तिरंगा केंद्रावर राष्ट्रध्वजाबरोबरच देशप्रेमाचे प्रतीक असलेल्या डायमंड तिरंगा अंगठ्या, बॅचेस, कार्यालय किंवा वाहनात लावण्यासाठी आकर्षक क्रॉस-मेटल तिरंगा, क्रॉस अशोकस्तंभ, घड्याळ, भारताचा नकाशा, हातातील कापडी तिरंगा, बँड, मफलर, की-चेन, पताका, तिरंगा स्टिकर, तोरण, कॅप, तिरंगा टी-शर्ट, तिरंगा ओढणी आदी विविध वस्तू उपलब्ध आहेत.

१७ ऑगस्ट रोजी आश्रमशाळा, कॉलनीमध्ये काम करणारे कर्मचारी, वॉचमन, भाजी मार्केटमधील कर्मचारी तसेच सद्भावना कार्यात मदत करणाऱ्यांना देशप्रेमाचे लाडू आणि तिरंगा बर्फीचे वितरण करण्यात येणार आहे.

१८ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन उत्सवाच्या आयोजनात हातभार लावणाऱ्या रिक्षाचालकांना लाडू व बर्फीचे वाटप केले जाणार आहे. या पत्रकार परिषदेस ध्रुवेश गांधी, रोशन शेख, सोना गांधी, श्रुती गांधी, स्नेहा गांधी, रूपा पारेख, नारायण छाब्रिया, मयुर सोलनकर, प्रकाश लोढा, गणेश खेडकर आणि जयदेव बाहेरमठ उपस्थित होते.

**१५ ऑगस्टला भारतमाता पूजन**

स्वातंत्र्य दिन उत्सवांतर्गत १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते भारतमाता पूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर राष्ट्रीय उत्सवात सहकार्य करणाऱ्या विविध घटकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## चव्हाण ऑटोमोबाईल्सतर्फे १५१ वाहनांचा वितरण सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

चव्हाण ऑटोमोबाईल्सतर्फे १५१ वाहनांचा भव्य वितरण सोहळा चव्हाण लॉन, अक्कलकोट रोड, सोलापूर येथे नुकताच उत्साहात संपन्न झाला. हिरो विडा या वाहनांचे वितरण या सोहळ्यात ग्राहकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते ग्राहकांना वाहनांचे वितरण करण्यात आले. विडा इलेक्ट्रिक स्कूटरमध्ये आधुनिक आणि आकर्षक डिझाईन, स्मार्टफीचर्स उत्कृष्ट परफॉर्मन्स,आराम दायी सीटिंग आणि पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. कार्यक्रमास हिरो विडाच्या हनिषा कालरा, चव्हाण मोटर्सतर्फे शिवप्रकाश चव्हाण, घनशाम चव्हाण, लक्ष्मी चव्हाण, पुरुषोत्तम चव्हाण व ग्राहक, वाहनप्रेमी आणि नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सूत्रसंचालन ममता बोल्ली-गोरंटला यांनी केले. तर आभार पुरुषोत्तम चव्हाण यांनी मानले.



## बोरगाव येथे श्रीनाथ विद्यालयात 'नशामुक्त भारत' प्रतिज्ञा अभियान

**श्रीपूर, दि. ११ ऑगस्ट-**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीनाथ विद्यालय व कै.विजयकुमार उर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय बोरगाव (ता.माळशिरस) येथे नशामुक्त भारत' प्रतिज्ञा अभियान झाले. विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून देण्यात आले. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय सेवा केंद्र अकलूज यांच्या वतीने उपक्रमाचे आयाजन केले होते. कार्यक्रमात राजयोगिनी ब्रह्माकुमारी शिवरात्री दीदी यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक व शैक्षणिक जीवनावर होणारे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. अभियानात विद्यालयातील सुमारे ७०० विद्यार्थी तसेच शिक्षकवृंद सहभागी झाले. कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य आर.टी. लष्कर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन जी.एम. वाघमारे यांनी केले.



## माळशिरस येथे विरंगुळा केंद्राचे भूमीपूजन

**माळशिरस, दि. ११ ऑगस्ट-**

माळशिरस शहरात विकास कामाचे भूमिपूजन व शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी ५० लाखाच्या विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले. माळशिरस नगरपंचायत ही भाजपच्या विचाराची आहे. त्यामुळे माळशिरसचा शहराचा चेहरा बदलण्यासाठी भाजप कटिबद्ध आहे. शहराकडे पालकमंत्री गोरे यांचे विशेष लक्ष आहे. त्यामुळे विकासाच्या दिशेने माळशिरस पाऊल टाकत असल्याचे प्रतिपादन सातपुते यांनी केले. यावेळी डॉ आप्पासाहेब देशमुख, पी. इ. कुलकर्णी, डॉ. सुभाष देशमाने, एम.डी.सिद, नगरसेवक शिवाजी देशमुख, कैलास वामन, डॉ. शिंगाडे, रणजीत ओहोळ, वैभव जानकर, आबा धाईजे, दादासाहेब शिंदे, महादेव कोळेकर, अजिनाथ वळकुंदे, डॉ. सचिन केमकर, रावसाहेब देशमुख, बाबासाहेब माने, मतिन बिदरे, महादेव माने उपस्थित होते.



## करांडे स्कूलमध्ये ४७ पत्रकारांचा गौरव

**सांगोला, दि. ११ ऑगस्ट-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या तसेच ड्रीम फाउंडेशन सोलापूर, करांडे इंटरनॅशनल स्कूल जुजारपूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा-सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार कार्यशाळा व कृतज्ञता सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन पत्रकार अभय दिवाणजी यांनी केले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष व सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, निमंत्रक ड्रीम फाउंडेशनचे काशिनाथ भतगुणकी, करांडे इंटरनॅशनल स्कूलचे श्रीधर करांडे व समन्वयक मसाप प्रमुख कार्यवाह प्रा. धनाजी चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास सांगोला विद्यामंदिर येथे पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर करांडे स्कूल, जुजारपूर येथे विद्यार्थ्यांनी दांडपट्टा व मल्लखांबाचे सादरीकरण केले. प्रास्ताविक काशिनाथ भतगुणकी यांनी केले. मनोज उकळे यांनी संयोजकांचे कौतुक केले. याप्रसंगी सांगोला तालुक्यातील ४७ पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. सोहळ्यास सांगोला विद्यामंदिरचे प्राचार्य चारुदत्त जगताप उपस्थित होते. सूत्रसंचालन उन्मेष आटपाडीकर व सुनील जावंजळ यांनी केले.

**पत्रकारांची भूमिका मोलाची**

गेली सात दशके संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास, गुणवत्ता आणि शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी अविरत प्रयत्न केले आहेत. या प्रदीर्घ शैक्षणिक ज्ञानयज्ञात पत्रकारांनी नेहमीच सत्याची कास धरून संस्थेला मदत केली.

**-प्रा. प्रबुद्धचंद्र झपके,** संस्थाध्यक्ष

# करमाळा तालुक्यात फायनान्स रिकव्हरी एजंट्सचा सुळसुळाट

*** हप्त्याच्या नावाखाली ग्राहकांची उघड लूट**
*** बोगस पावत्या, धमक्या आणि कमिशनची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ११ ऑगस्ट-**




करमाळा शहर आणि तालुका परिसरात सध्या कार आणि बाईक फायनान्स करणाऱ्या कंपन्यांच्या रिकव्हरी एजंट्सनी उच्छाद मांडला आहे. थकीत हप्त्यांच्या नावाखाली सर्वसामान्य वाहनधारकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लूट सुरू आहे. गाडी जप्त करण्याची धमकी देऊन ग्राहकांकडून हजारो रुपये उकळले जात आहेत. या मागे नेमका कोणाचा वरदहस्त आहे, असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एखादा हप्ता चुकला किंवा उशीर झाला की हे रिकव्हरी एजंट ग्राहकांना गाठतात. त्यानंतर हप्त्याच्या रक्कमेव्यतिरिक्त एका गाडीमागे १० ते १५ हजारांची अतिरिक्त मागणी केली जाते. विशेष म्हणजे, यासाठी ग्राहकांना बोगस पावत्या दिल्या जातात किंवा पावती देण्यास साफ नकार दिला जातो. जेव्हा एखादा सजग ग्राहक या अतिरिक्त पैशांची पावती मागतो, तेव्हा त्याला ''हे पैसे तुझ्या गाडीचा हप्ता नसून, तुझी गाडी सोडण्याचे आहेत. हे आमचे कमिशन आणि गाडी ओढून आणल्याचा खर्च आहे,'' असे उद्धटपणे सांगितले जाते.

**पोलिस प्रशासनाचा धाक उरला नाही का?**

दिवसाढवळ्या रस्त्यावर किंवा ग्राहकांच्या घराबाहेर चालणाऱ्या या दादागिरीमुळे करमाळा तालुक्यात भीतीचे वातावरण आहे. कायद्याला धाब्यावर बसवून ग्राहकांना मानसिक त्रास देणाऱ्या या एजंट्सवर पोलीस प्रशासनाचा कोणताही वचक राहिला नसल्याचे चित्र दिसत आहे. रिकव्हरी संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट नियम असतानाही, गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा वापर करून ग्राहकांना धमकावले जात आहे. यावर पोलीस प्रशासन कोणती कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**काळ्या धंद्यामागे नेमका कोणता मोठा चेहरा?**

सर्वसामान्यांना वेठीस धरणाऱ्या या रिकव्हरी एजंट्सचे धागेदोरे नेमके कुठे जोडलेले आहेत, याबद्दल तालुक्यात उलट-सुलट चर्चा सुरू आहेत. कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता ही लूट सुरू असल्यामुळे, या टोळ्यांमागे करमाळ्यातील एखादा बडा राजकीय नेता किंवा वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्याचा वरदहस्त आहे का? अशी शंका आता नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

गोरगरीब आणि मध्यमवर्गीय ग्राहकांना लुटणाऱ्या या बोगस रिकव्हरी एजंट्सचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि वसुलीच्या नावाखाली सुरू असलेली ही गुंडगिरी थांबवावी, अशी तीव्र मागणी करमाळा तालुक्यातील वाहनधारकांमधून केली जात आहे.

**ग्राहकांची पिळणूक करणाऱ्यांची खैर नाही**



फायनान्सच्या नावाखाली ग्राहकांशी गैरवर्तन करणे आणि त्यांची पिळवणूक करणे हा गंभीर गुन्हा आहे. जो कोणी असे करत असेल त्यांची गय केली जाणार नाही. चुकीचे कृत्य करणारा व्यक्ती कितीही मोठा असला, तरी त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. कोणाबाबतही असा प्रकार घडत असल्यास नागरिकांनी न घाबरता थेट करमाळा पोलिसांशी संपर्क साधावा. वसुलीच्या नावाखाली दादागिरी किंवा शोषण अजिबात खपवून घेतले जाणार नाही.

**- रणजीत माने,** पोलिस निरीक्षक, करमाळा



## मुख्याध्यापक बनसोडे यांचा सेवाकाल प्रेरणादायी

**विलासराव देशमुख; निरोप समारंभात केला कार्याचा गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ ऑगस्ट-**

मुख्याध्यापक मानसिंग बनसोडे यांचा सेवाकाल असल्याचे गौरवोद्गार मराठा मंदिर संस्थेचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख यांनी काढले. मराठा मंदिर निर्मलराजे कन्या प्रशाला अक्कलकोट मुख्याध्यापक एम.एल. बनसोडे, यांचा निरोप समारंभ पार पडला.

याप्रसंगी देशमुख बोलत होते. वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, माजी मुख्याध्यापक शहाजी भोसले, सचिव आत्माराम घाटगे, जतचे पर्यवेक्षक पाटील, शरद जंगाले, मुख्याध्यापक आर. एस. पडवळकर, मुख्याध्यापक योगेश कबाडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी सहशिक्षिका प्रमिला नीळ-पाटील, अर्चना जाधव, स्मिता जगदाळे, मनीषा मोरे, रेखा चव्हाण, एस.डी. सावंत, संभाजीराजे गाटे, प्रकाश सोनटक्के-तेलगावकर, विकास गोडसे, राजेद्र गोंडाळ, एस.बी. साळुंखे, चेतन जाधव, अरविंद शिंदे उपस्थित होते.

## घरासमोरुन बुलेट चोरीला; चोरट्याविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**



बार्शी शहरातील राऊत चाळ, स्टेशन रोड परिसरात घरासमोर पार्क केलेली सुमारे १ लाख २५ हजार रुपये किमतीची बुलेट मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी प्रतिक चंदकांत पवार (वय २०, रा. राऊत चाळ, स्टेशन रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी प्रतिक पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी दि. २४ एप्रिल २०२६ रोजी धाराशिव येथील 'द बाईक झोन' या वाहन खरेदी केंद्राचे मालक असिफ राजू शेख यांच्याकडून प्रेम राजेंद्र ठाकरे यांच्या नावावर असलेली बुलेट ३५० एक्रख इसार पावतीद्वारे खरेदी केली होती. त्यानंतर सदर मोटारसायकल ते दैनंदिन वापरासाठी वापरत होते.

दि. ६ ऑगस्ट रोजी रात्री ११.४५ वाजता त्यांनी आपली मोटारसायकल घरासमोर पार्क करुन झोप घेतली. दुसऱ्या दिवशी ७ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता घरासमोर पाहिले असता मोटारसायकल आढळून आली नाही. यानंतर पवार यांनी बार्शी शहरासह आजूबाजूच्या परिसरात मोटारसायकलचा शोध घेतला. मात्र, शोध घेऊनही मोटारसायकल मिळून न आल्याने अज्ञात व्यक्तीने ती चोरुन नेल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी पोलिसांत तक्रार दाखुल केली. चोरीस गेलेल्या मोटारसायकलचा रंग काळा असून ती बुलेट ३५० एक्रख, मॉडेल २०२२ आहे. तिचा आरटीओ क्रमांक MH-२५-AY-२४७६ असून चेसी क्रमांक ME3U3K5F1N>M00७१४३ आणि इंजिन क्रमांक U३K५F$१NM३०७३६१ असा आहे. मोटारसायकलची अंदाजे किंमत १ लाख २५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, बार्शी शहर पोलीस या मोटारसायकल चोरीचा तपास करत आहेत.




## सुयश विद्यालयात राज्य गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

सुयश विद्यालय, बार्शी येथे इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या ११८ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात झाला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राजेंद्र राऊत, प्रशांत कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मीरा-भाईंदरचे प्रसाद नलावडे, कौरव माने, अनिल बनसोडे, शामसुंदर गवळी, संतोष सूर्यवंशी, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे व सचिव प्रियंका नलवडे यांची उपस्थिती लाभली. सुयश विद्यालयातील इयत्ता पाचवीचे ५८ व इयत्ता आठवीचे ६० असे ११८ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष शिवदास नलवडे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय मनोगतात आ. राजेंद्र राऊत यांनी विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रम, चिकाटी व जिद्दीचे कौतुक करत सुयश विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचेही अभिनंदन केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक संदीप येवले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन साखरे यांनी केले.

**विद्यार्थ्यांसह शिक्षकांचाही गौरव**

दोन्ही परीक्षांतील राज्य गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांना रोख रुपये ५,००१, सन्मानचिन्ह, शाल व मानाचा फेटा देऊन गौरविण्यात आले. मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांच्या योगदानाचीही दखल घेत बक्षिसाची रक्कम, मानाचा फेटा व शेला देऊन सन्मानित केले.

## चांदापूरी विकास सोसायटी चेअरमनपदी बापू लोखंडे; व्हाईस चेअरमनपदी अर्चना मदने



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ११ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यांतील चांदापूरी येथील चांदापूरी विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी बापू लोखंडे तर व्हाईस चेअरमन पदी अर्चना मदने यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

विद्यमान चेअरमन व व्हा. चेअरमन यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदांच्या निवडीसाठी सर्व संचालक मंडळाची बैठक झाली. निवडणूक निर्णय तथा सहाय्यक निबंधक कार्यालय अकलूजचे वरिष्ठ अधिकारी ए.एस.पाटील यांच्या अध्यक्षते खाली ही सभा झाली. सहाय्यक म्हणून सचिव अजित लोखंडे, हणमंत लोखंडे, आजिनाथ कवळे यांनी काम पाहिले.

चेअरमन पदासाठी संचालक बापू लोखंडे तर व्हा. चेअरमनपदी अर्चना मदने यांचे प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाला. परिणामी दोन्ही निवडी बिनविरोध घोषित केल्या. निवडणूक निर्णय अधिकारी ए.एस. पाटील यांनी बिनविरोध निवडी घोषित केल्या. यावेळी संचालक बापू लोखंडे. सुमन पाटील, जयवंत सूळ, दोहादखान पठाण, अहमद पठाण ,भीम ढेरे, तनवीर पठाण, इस्लाम पठाण, मनेश जगदाळे, विजय काळे, वसंत काळे, सर्जेराव कोपनर, अर्चना मदने हे सर्व संचालक उपस्थित होते. निवडी बिनविरोध करण्यासाठी सरपंच जयवंत सूळ ,चेअरमन भजनदास चोरमले, विजयसिंह पाटील शब्बीर पठाण यांनी विशेष प्रयत्न केले.

# इंदिरा गांधी भाजीमंडईची दूरवस्था; पालिकेकडून देखभालीची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ ऑगस्ट-**

शहरातील मध्यवर्ती असलेल्या इंदिरा गांधी भाजी मंडईची सध्या दूरवस्था झाली आहे. त्यामुळे या मंडईच्या दुरुस्ती आणि देखभालीची गरज असून पालिकेने तात्काळ याकडे लक्ष देवुन संबंधित काम हाती घ्यावे अशी मागणी मंडईतील भाजी विक्रेते आणि शहरातील सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.

पंढरपूरात गावभागात असलेली सर्वात जुनी भाजी मंडई म्हणजे इंदिरा गांधी भाजीमंडई. शहरातील मध्यवर्ती आणि सर्वांनाच सोयीची मंडई म्हणून देखील इंदिरा गांधी भाजी मंडईची ओळख आहे. मध्यंतरी ही मंडई पाडून या ठिकाणी दोन, तीन मजली नवीन भाजी मंडई बांधून त्या ठिकाणी भाजी मंडई आणि दुचाकी, चारचाकी गाड्यांच्या पार्किंगचा देखील घाट घालण्यात आलेला होता. मात्र मंडईतील कायमस्वरुपी व्यापाऱ्यांचा तसेच भाजीपाला विक्रेत्यांचा कमालीचा विरोध झाल्याने पालिकेने हा विषय बाजूला ठेवला. त्या नंतर कॉरिडॉरमध्ये या मंडईच्या ठिकाणी भव्य पार्किंग उभारले जाणार असे सांगितले गेले. मात्र दोन, तीन वर्षापासून कॉरिडॉरच्या चर्चेचे नुसते गुऱ्हाळ चालू आहे. प्रत्यक्षात कॉरिडॉर केव्हा होईल तेव्हा होवू द्यात, मात्र तो पर्यंत तरी या भाजीमंडईच्या देखभालीकडे पहा असे नागरिकांतून बोलले जात आहे.

अतिशय जुन्या असलेल्या या मंडईची सध्या अतिशय दूरवस्था झालेली आहे. या मंडईवर टाकण्यात आलेले पत्रे खूपच जुने झाले आहेत. पावसाळ्यात अनेक ठिकाणी पत्र्यांमधून अक्षरशः मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होताना दिसते. मंडईतील भाजी विक्रेत्यांसाठी असलेल्या दगडी कट्यांची देखील अनेक ठिकाणी पडझड झालेली आहे. या मंडईतील पावसाचे किंवा मंडई धुतल्यानंतर साठलेल्या पाण्याचा निचरा होण्याची सिस्टीम किंवा अंतर्गत गटारी बुजल्या गेल्यामुळे या ठिकाणी थोडे जरी पाणी आले तरी ते मंडईत साठुन राहते. त्याचा योग्य निचरा होत नाही. त्यामुळे सगळीकडे दलदल होवुन निसरडे होते.

तसेच मंडईत फ्लोरिंगच्या ठिकाणी असलेले घडीव दगड देखील अनेक भागात निघालेले आहेत. मंडईतून चालताना लहान मुले, वृध्द यांना अडचणीचे होत आहे. मंडईचे लोखंडी पत्र्यांचे छत ज्या मोठ्याला लोखंडी गर्डरवर पेललेले आहे ते गर्डर देखील पावसामुळे गंजत आहेत. त्यामुळे या गर्डरला देखील गंज लागणार नाही अशा प्रकारे ऑईलपेंट देण्याची गरज आहे. पावसाळ्यात गर्डरला तसेच लोखंडी गळणाऱ्या पत्र्यांना सततच्या पावसाच्या पाण्यामुळे इजा पोहचून एखादी दुर्घटना घडणार नाही, या बाबत पालिकेकडून सतर्कता बाळगली जावी. त्यामुळे पालिकेच्या वतीने या मंडईच्या देखभाल आणि दूरुस्तीची कामे हाती घेऊन गावभागातील नागरिकांसाठी मध्यवर्ती जुनी असलेली ही मंडई सुस्थितीत करुन द्यावी, अशी मागणी नागरिकांमधून तसेच भाजीविक्रेत्यांकडून केली जात आहे.



**स्वच्छतेबाबत पालिकेकडून कमालीची उदासीनता**

मंडईची पालिकेकडून पूर्वीप्रमाणे नियमित स्वच्छताही होत नाही. पुर्वी दर एक, दोन महिन्याला ही मंडई फिनेल टाकून पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांकडून स्वच्छ धुवून घेतली जात असे. मंडई धुण्यासाठी खास पाण्याच्या वॉल्व्हचीही मंडईत सुविधा होती. मात्र सध्या हा पाण्यासाठीचा व्हॉल्व देखील कुठे दिसेनासा झाला आहे. येथील छोट्या, मोठ्या यात्रां तसेच महिन्याच्या एकादशी झाल्यानंतर तर पालिकेकडून मंडई स्वच्छतेचा कार्यक्रम नियमितपणे केला जात असे. मात्र पालिकेकडून या मंडईच्या स्वच्छतेबाबत सध्या कमालीची उदासीनता दिसून येत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रा. रेखा पाटील यांना एमआयटीव्हीजीएस शाळेचा दुहेरी पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

एम.आय.टी.व्ही.जी.एस. शाळा, बार्शीच्या प्राचार्या रेखा दिलीप पाटील यांच्या प्रभावी नेतृत्वाची आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य राष्ट्रीय मानांकित प्राचार्य पुरस्कार' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याच सोहळ्यात शाळेच्या शिक्षकवृंदाला 'सर्वोत्कृष्ट शाळा तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम शिक्षक पुरस्कार २०२६' या पुरस्काराने गौरविण्यात आले. पीआय मीडिया सोल्युशन्स यांच्या वतीने पुणे येथे आयोजित 'शिक्षण नेतृत्व परिषद ७ वी आवृत्ती'मध्ये हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्राचार्या पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली ही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण अध्यापन आणि



आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे सातत्याने प्रगतीची नवी शिखरे गाठत आहे. प्राचार्या पाटील यांना मिळालेला सन्मान त्यांच्या समर्पित कार्याची व प्रेरणादायी नेतृत्वाची पावती असून, शिक्षकवृंदाला मिळालेला पुरस्कार हा त्यांच्या तंत्रज्ञानाधिष्ठित आणि नाविन्यपूर्ण अध्यापनाचा गौरव आहे.



### महत्त्वाचे...



## अन्नछत्र मंडळाकडून क्रीडा क्षेत्रातही भरीव काम : नीलेश भोसले

**अक्कलकोट, दि. ११ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक क्षेत्राबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात भरीव काम होत असल्याचे प्रशंसोद्गार मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव निलेश भोसले यांनी काढले. भोसले श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र,श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांची सुंदर,सुबक,रेखीव धातूशिल्प प्रतिमा देण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी शुभम सावंत, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, संतोष माने, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



## सांगोला महाविद्यालयात मुलांच्या वसतिगृहात युवा प्रबोधन कार्यक्रम

**सांगोला, दि. ११ ऑगस्ट-**

भारतीय स्त्रीशक्तीचे मैत्रीण कुटुंब सल्ला केंद्र, सांगोला व प्रवाह फाउंडेशन, पुणे यांच्या सहयोगाने सांगोला महाविद्यालयातील मुलांच्या वसतिगृहात युवा प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे श्रीनिवास सूर्यवंशी यांनी युवानच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ॲड.राजेश्वरी केदार यांनी अध्यक्षीय भाषणात मुलांना स्वतः कसे विकसित होऊ शकतो व याचा आपल्याला आणि समाजाला नेमका कसा फायदा होऊ शकतो याविषयी विचार मांडले. याप्रसंगी मैत्रीणच्या सचिव वसुंधरा कुलकर्णी, समन्वयक लवटे व पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे आयोजनासाठी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन डॉ.जगदीश चेडे यांनी केले. आभार डॉ.ओंकार घाडगे यांनी मानले.

## ज्योती पाटील यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जाहीर

**पंढरपूर,दि.११ ऑगस्ट -**



तालुक्यातील गोपाळपूर ग्राम पंचायतीच्या ग्रामसेविका ज्योती पाटील यांची सन २०२४-२५ च्या राज्यस्तरीय आदर्श ग्राम पंचायत अधिकारी पुरस्कारासाठी निवड झाली आहे. वीस वर्षांच्या सेवाकाळात ज्योती पाटील यांनी स्वच्छता, महिला सक्षमीकरण, डिजिटल ग्रामव्यवस्था आणि सर्वांगीण ग्रामविकासासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. तनाळी ग्रामपंचायतीत नियुक्तीनंतर त्यांनी गावाच्या विकासासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले. सन २०२१ ते २०२२ या कालावधीत तावशी ग्रामपंचायतीचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी गावाला संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून दिला. तसेच स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत तावशी गावाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ग्राम स्वच्छता पुरस्कार प्राप्त झाला.

## एकता महिला मंचतर्फे नागपंचमीनिमित्त 'श्रावणी क्वीन' स्पर्धा

**वैराग, दि. ११ ऑगस्ट-**

पारंपरिक संस्कृतीचे जतन, महिलांच्या कलागुणांना वाव आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्याच्या उद्देशाने 'एकता महिला मंच'च्या वतीने नागपंचमीच्या मुहूर्तावर एका विशेष व भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सोलापूर जिल्ह्यात पार पडणार आहे. नागपंचमीच्या सणानिमित्त महिलांच्या अंगभूत कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी एकता महिला मंचच्या सर्व सदस्यांसाठी विविध उपक्रम आणि स्पर्धा आयोजित केल्या आहेत. संपूर्ण सोहळ्यात 'श्रावणी क्वीन' ही विशेष स्पर्धा मुख्य आकर्षण ठरणार आहे.कार्यक्रमादरम्यान 'श्रावणी क्वीन' निवडीसाठी विशेष निकष ठेवण्यात आले आहेत. यामध्ये महिलांची पारंपरिक वेषभूषा, खमंग व मजेशीर उखाणे तसेच बुद्धिमत्ता चाचणी घेतली जाणार आहे. या सर्व फेऱ्यांमधून एका उत्कृष्ट सदस्याची राज्यस्तरीय 'श्रावणी क्वीन' म्हणून निवड केली जाणार आहे.

# हिंगणी तलावातील पाणीसाठा अद्यापही घटलेलाच

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग, दि. ११ ऑगस्ट-**




वैराग शहरासह परिसराची तहान हिंगणी मध्यम प्रकल्पातील पाण्याने भागते. मात्र यंदा पावसाळ्यातील अडीच महिने संपले तरी तलावातील पाणीसाठ्यात वाढ झालेली नाही. उलट दिवसेंदिवस पाणीसाठा कमीच होत आहे. परिणामी पावसाने पाठ फिरवल्यामुळे वैरागवर भीषण पाणीटंचाईचे काळे ढग आणखी गडद झाले आहेत. गेल्या १२ जुलै रोजी तलावातील घटत्या साठ्याबाबत इशारा दिला होता; मात्र त्यानंतर ऑगस्टचा दुसरा आठवडा उजाडला तरी प्रशासनाकडून योग्य उपाय योजना केल्या नाहीत.

पाणी मोजणीनुसार, रविवार दि. ९ ऑगस्टच्या तुलनेत सोमवार १० ऑगस्ट (दुपारी ३:४२ वा.) पाणी पातळीत अधिक घट नोंदवली गेली आहे. सध्या परिसरात रिमझिम किंवा बारीक पाऊस पडत असला, तरी या पावसाने तलावातील पाणी पातळीत काहीच वाढ झालेली नाही. हिंगणी तलावाची पाणी साठवण क्षमता सध्या धोक्याच्या पातळीवर खाली येत चालली आहे. एकीकडे 'अलनिनो' च्या कमी पावसाच्या काळात पुणे जिल्ह्यातील पावसाने उजनी धरण ओसंडून वाहत आहे. मात्र दुसरीकडे हिंगणी तलावात पाणी पातळीत घट होत आहे. महिनाभरापुर्वी इशारा देवुनही प्रशासनाने पुरेशा उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये हतबलतेची भावना आहे.

### या आहेत वैरागकरांच्या मागण्या

- नगरपंचायत आणि जलसंपदा विभागातर्फे तातडीने वॉटर ऑडिट करून पाणी वितरणाचे योग्य नियोजन जाहीर करावे.
- हिंगणी तलाव व मुख्य जलवाहिनीवरून होणारा अनधिकृत आणि व्यावसायिक पाणी उपसा रोखण्यासाठी भरारी पथके तैनात करावीत.
- खासगी विहिरी व बोअरवेलचे सर्वेक्षण करून अधिग्रहणाची पूर्वतयारी करावी तसेच टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा आपत्कालीन आराखडा तयार ठेवावा.

### शेतकरी आणि नागरिकांच्या चिंतेत वाढ

ऑगस्ट महिन्याच्या अखेरपर्यंत जर दमदार आणि समाधानकारक पाऊस झाला नाही, तर येणाऱ्या काळात वैराग शहरासाठी ही परिस्थिती अत्यंत भयावह आणि आव्हानात्मक ठरेल. येत्या काही दिवसांत वैरागवासीयांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागेल.

तलावात पुरेसा साठा निर्माण न झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचा आणि शेतीचा प्रश्न गंभीर बनेल. तसेच, शहराची बाजारपेठ आणि स्थानिक व्यापारालाही याचा मोठा फटका बसेल.

सध्या तरी नागरिकांना आणि शेतकऱ्यांना तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी मोठ्या आणि दमदार पावसाची तीव्र प्रतीक्षा आहे.ऑगस्ट अखेरपर्यंत चांगला पाऊस झाला तरच हिंगणी तलावात जलसाठा वाढण्याची शक्यता आहे. अन्यथा, भविष्यात पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी पाण्याचा भीषण तुटवडा निर्माण होऊन जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होऊ शकते.

## विद्यार्थ्यांकडून नाविन्यपूर्ण संशोधनाची अपेक्षा : प्रा. पाटील



**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ११ ऑगस्ट -**

येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात विज्ञान अभ्यास मंडळाचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागप्रमुख प्रा.व्ही.बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एन.जगताप हे होते. व्यासपीठावर समन्वयक प्रा.के.यू.गरड व सहसमन्वयक प्रा. एस.ए.निंबर्गी उपस्थित होते. डॉ. पाटील यांनी या विज्ञान अभ्यास मंडळाने विद्यार्थ्यांना संशोधनासाठी संधी निर्माण करुन दिली आहे.याचा फायदा सर्व विद्यार्थ्यांनी घेऊन नाविण्यपूर्ण संशोधन करावे अशी अपेक्षा असल्याचे सांगितले. यावेळी प्रा. ज्योती नादरगी यांचा महर्षी वेदव्यास राष्ट्रीय गुरु गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.एम.एन. जगताप यांनीही विद्यार्थ्यांनी वर्गात नियमित हजर रहा, ग्रंथालयाचा वापर करा आणि प्रत्येक उपक्रमात सहभागी व्हा. तरच संशोधनात नाव कमवाल, यासाठी आविष्कारमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.के.यू.गरड यांनी केले. अतिथी परिचय प्रा. ए. बी. तांबोळी यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण कांबळे यांनी केले. प्रा. एस.ए.निंबर्गी यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शेतकरी उतरला रस्त्यावर

### मागण्यांची पूर्तता न झाल्यास मंत्रालयावर आंदोलन

### शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

मागील खरीपामध्ये जमिनी खरडून जाणारा प्रचंड पाऊस होऊन देखील सॅटॅलाइटच्या चुकीच्या सर्वेमुळे शेतकऱ्यावर अन्याय होत असल्यामुळे हा सर्वे तात्काळ रद्द करुन एस.डी. आर.एफ. आणि एन. डी. आर. एफ. निकषाच्या आधारे खरीप २०२५ चा पीक विमा द्या, पीक विम्यातून वगळलेले ४ ट्रिगर पुन्हा घ्या, आजपर्यंतचा लुटलेला सर्व पीक विमा तात्काळ द्या, पीक विम्याचे राज्यप्रमुख विनयकुमार आवटे यांचेसह सर्व पीक विमा कंपन्यांची स्थापनेपासून संपत्तीची न्यायालयीन चौकशी करा आदी मागण्यासाठी बार्शी ते धाराशिव रस्त्यावरील चिखर्डे येथील बस स्थानकावर शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

यावेळी गायकवाड यांनी वरील मागणीची पूर्तता लवकरात लवकर न झाल्यास मंत्रालयावर आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी दिला, गायकवाड यांचे बरोबरच शरद भालेकर, रामभाऊ काटे आदींनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यावेळी गुलाब लोखंडे, मोहन कोंढारे, अण्णासाहेब कोंढारे, रघुनाथ कोंढारे, राहुल कोंढारे, अमर कोंढारे, लक्ष्मण भोसले, सुधीर सवणे, राजीव कोंढारे, सचिन नाटेकर, ज्ञानेश्वर पाचकवडे, औदुंबर कोंढारे, वैभव जाधव, नबीलाल शेख, सनी मोरे, योगेश कोंढारे, बालाजी मोरे, प्रज्वल कोंढारे, नानासाहेब हंडीबाग, हरी पाचकवडे, जगन्नाथ कोंढारे, संदीप कोंढारे, प्रकाश कोंढारे, जगन्नाथ मोदी, सुरज कोंढारे, तात्यासाहेब गलांडे, बाजीराव बदाले, संजय कोंढारे, शुभम क्षीरसागर, संकेत पाचकवडे, प्रथमेश मोरे, अक्षय कोंढारे, आदित्य कोंढारे, लक्ष्मण मोहिते, आदित्य जाधव, अभिषेक गवळी, मारुती डुकरे आदींसह पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

आंदोलनाचा चोख पोलीस बंदोबस्त पांगरी पोलीस ठाण्याचे श्री. माने व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी ठेवला होता.

## शिवसेनेतर्फे सुनील नगरमध्ये शालेय साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

प्रभाग क्रमांक १२ मध्ये सुनील नगर येथे गरजू विद्यार्थ्यांना शिवसेना पक्षातर्फे वह्या व पेनचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, नगरसेवक अमोल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सायबण्णा तेगेळ्ळी , डॉ. राजेश अनगिरे, अर्जुन सलगर यांच्या हस्ते ७०० विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्यांचे वाटप आदिशक्ती पॉलिक्लिनिक, न्यू सुनील नगर येथे करण्यात आले.

यावेळी जयराम न्यारम, मल्लेश सुतार, श्रीकांत कोंतम, निलेश आळगुंडगी, नागु म ुडोडगी, सिध्दाराम चिनगुंडी, नवीन यनगंटी, अमर कोनापुरे, अंबादास येरगुंटला, संतोष अष्टगी, जिहान बागवान, शिवानंद बेले, विशाल पाटील, दत्तात्रय डोपलवार, राजू लाळसंगी उपस्थित होते.

## माढ्यात पाण्यासाठी सुरू असलेले अन्नत्याग आंदोलन तात्पुरते स्थगित

### पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याचे दिले लेखी आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ११ ऑगस्ट-**

सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या पाण्यासाठी माढ्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव कानडे यांनी माढा तहसील ऑफिस समोर अन्नत्याग आंदोलन सुरू केले होते. पाटबंधारे विभाग सोलापूरचे कार्यकारी अभियंता सचिन पवार यांनी आंदोलकांना १७ ऑगस्टला पाणी सोडण्याचे लेखी आश्वासन दिले असल्याने ते आंदोलन २० ऑगस्टपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले आहे.

कानडे यांनी ३० जुलै रोजी भीमा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देऊन मनकर्णा ओढ्यांमध्ये सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून पाणी सोडल्यास चिंचोली, सापटणे (भोसे), शिंदेवाडी, जाधववाडी (मा.), महातपूर, दारफळ, उंदरगाव, रोपळे (खुर्द),उपळाई (बु), विठ्ठलवाडी, लोंढेवाडी,आदी गावांना याचा फायदा होईल माढा शहराच्या पिण्याच्या पाण्याला काहीअंशी मदत होणार असल्याने शिंदेवाडी, वेताळवाडी रणदिवेवाडी अंबुरे तलाव आणि माढा परिसरातील विविध तलाव तातडीने भरावेत,अशीही



मागणी केली होती. परंतु पाटबंधारे विभागाकडून १० ऑगस्टपर्यंत पाणी न सोडल्याने कानडे यांनी तहसील कार्यालय समोर सोमवारी अन्न त्याग आंदोलनाला सुरुवात केली होती. त्या आंदोलनाला टेंभुर्णीचे उपविभागीय अभियंता मंजुनाथ तुंबळ यांनी भेट देऊन उपोषण सोडण्याची विनंती केली. परंतु आंदोलकांनी उपोषण सोडण्यास नकार देत सोलापूरचे कार्यकारी अभियंता यांना या स्थळी बोलून लेखी आश्वासन देण्याची मागणी केली. त्यानुसार कार्यकारी अभियंता सचिन पवार व तहसीलदार संजय भोसले यांनी त्या ठिकाणी येऊन १७ ऑगस्ट रोजी मागणीनुसार पाणी सोडण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आनंदराव कानडे यांनी उपोषण तात्पुरते स्थगित करत असल्याचे घोषित केले.

या आंदोलनाला माढ्यातील आरपीआय गट, वेताळवाडी ग्रामपंचायत, जाधववाडी ग्रामपंचायत, माढा मुस्लिम संघटना, डॉक्टर असोसिएशन, माढा शहर मनसे आदी संघटनांनी आपला पाठिंबा जाहीर केला.

यावेळी गुरुराज कानडे , शंभू साठे, शरद भांगे,आबा साठे, तानाजी जाधव, सुधीर सुरवसे, अनिल लोंढे, सोमनाथ राऊत,अनिल शिंदे, दत्तात्रय अंबुरे,अक्षय खारे यांसह संघर्ष समितीचे सदस्य माढ्यासह परिसरातील गावचे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुढील काळात पाण्यासाठी तीव्र आंदोलन करणार

निसर्गाच्या लहरीपणामुळे बळीराजाला अनेक वेळा संकटाचा सामना करावा लागतो. यावर्षी माढा व परिसरात पावसाने चांगलीच विश्रांती घेतली आहे. त्यामुळे अनेक गावच्या लोकांना शेती व पिण्याच्या पाण्यासाठी हाल सोसावे लागत आहेत. पुणे व परिसरात पडलेल्या पावसामुळे सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेले उजनी धरण क्षमतेने भरले असल्याने सीना माढा उपसा सिंचन योजनेच्या लाभ क्षेत्रातील गावाना पाणी सोडण्यासाठी मी मागणी केली होती. त्या म ागणीला पाटबंधारे प्रशासनाने १७ ऑगस्टला पाणी सोडण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनावर मी विश्वास ठेवून हे अन्नत्याग आंदोलन २० ऑगस्टपर्यंत तात्पुरते स्थगित करत आहे. पाटबंधारे विभागाने त्यांचा शब्द न पाळल्यास पुढील काळात आम्ही शेतकरी पाण्यासाठी तीव्र आंदोलन करणार आहोत. तसेच मनकर्णा ओढा उपळाई व बेंद ओढ्याला कॅनॉलचा दर्जा देण्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव पाठवण्यास अधिकाऱ्यांनी सकारात्मकता दाखवली आहे.

**- आनंदराव कानडे, माजी जिल्हा परिषद सदस्य (आंदोलक)**